म. ग्रं. सं. ठाणे
...पद — चरित्र
...नं. ७९८
४६५५८



# स्मृति आणि ...

REFBK-0009498

मानवी दास्यांतून फुललेली जीवन चरित्रें.

२२४८०

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
१४९८
दा. क्र.
REFBK-0009498

# स्मृति आणि गौरव

'मॅजेस्टिक' बुक स्टॉल प्रकाशन

प्रकाशक : **केशव कोठावळे,** मॅजेस्टिक बुक स्टॉल,
गिरगांव नाका, मुंबई ४.

मुद्रक : **ह. म. गद्रे,** जनवाणी प्रिंटिंग प्रेस, ४५ बुधवार पुणें २.

**किंमत दोन रुपये**

प्रथमावृत्ति १९५७

Marathi Translation of : Famous American Negroes
by Langston Hughes

Published by permission of copyright owners.

# प्र स्ता व ना

अमेरिकन निग्रोंचा इतिहास गुलामगिरीपासून सुरू होतो, अशी सर्वसाधारण समजूत आहे; पण वास्तविक या इतिहासाची सुरुवात गुलामगिरीपासून होत नाहीं. अमेरिकेंतील अनेक निग्रो गुलाम नव्हते. या पाश्चात्य जगांत त्यांपैकीं कांहीं नवीन प्रदेशाच्या शोधार्थ म्हणून आले होते. खिस्तोफर कोलंबसच्या जहाजावरील एक खलासी पेड्रो अलोन्सो निनो हा काळा इसम होता, असें कांहीं इतिहासकारांचें मत आहे. बाल्बोआनें जेव्हां १५१३ मध्यें पॅसिफिक महासागराचा शोध लावला, तेव्हां त्याच्या तुकडींत बरेच निग्रो होते. आतां पनामांतील इस्थमस म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठिकाणाहून अटलांटिक ते पॅसिफिकचा मार्ग मोकळा करण्यास या निग्रोंनीं मदत केली. आणि चारशें वर्षांपूर्वीं नैर्ऋत्य अमेरिकेच्या लिखित इतिहासाशीं इस्टॅव्हॅनिको या आफ्रिकनाचें नांव निगडित झालें आहे. हा निग्रो प्रवासी कांहीं स्पॅनिश लोकांबरोबर अमेरिकेंत आला. त्यांची बोट फ्लॉरिडाच्या किनाऱ्याशीं फुटली, तेव्हां त्यांनीं येथील भूमीचा आश्रय घेतला. या वेळीं चौघे जण सोडून सर्व बुडाले. इस्टॅव्हॅनिकोसकट जिवंत राहिलेले हे चौघे जवळजवळ आठ वर्षें इंडियन लोकांत फिरत होते आणि दक्षिणेस मेक्सिको शहरापर्यंत त्यांनीं मजल मारली होती. १५३९ मध्यें इस्टॅव्हॅनिको हा फ्रायर मार्को द निझा याच्याबरोबर सुवर्णाच्या सात नगरांच्या शोधार्थ उत्तरेस निघाला. पण या ऐकीव सुवर्णनगरांचा कांहीं शोध त्यांना लागला नाहीं. जेव्हां हे लोक रिओग्रॅन्ड येथें आले, तेव्हां वाळवंटांतील उष्म्यानें स्पॅनिश लोक अगदीं गळून गेले व मग त्यांनीं या निग्रोला पुढें पाठविलें. त्याच्याबरोबर कांहीं इंडियन देण्यांत आले व इस्टॅव्हॅनिको जें शोधून काढील त्याची माहिती या इंडियनांनीं द्यावी, असें ठरलें. ॲरिझोना म्हणून आज जो समृद्ध भाग ओळखला जातो, त्याचा शोध इस्टॅव्हॅनिकोनें लावला व युरोपियन वसाहतवाल्यांना वसाहत करण्यास हा भाग मोकळा झाला. जेम्स टाउन येथें गुलामांना घेऊन पहिली बोट आली व उत्तर अमेरिकेंत माणसें

विकण्याची प्रथा सुरू झाली त्यापूर्वी ८० वर्षें अगोदर इस्टॅव्हॅनिकोनें हा शोध लावला होता.

अमेरिकेच्या इतिहासांत फार पूर्वींहि सर्वच गुलाम गुलामगिरीच्या जोखडाखालीं राहिले नाहींत. कांहीं लोक पळून जाऊन स्वतंत्र झाले. यांत पूर्वींच्या काळांतील खिस्पस अॅटकससारखा खलाशी येतो. तो नंतर अमेरिकन क्रांतियुद्धांत ब्रिटिशांविरुद्ध लढला व त्यांतच मरण पावला. कांहीं गुलामांना मोलमजुरी करण्यास परवानगी मिळत होती व त्यायोगें त्यांच्या खरेदीच्या किंमतीची भरपाई करणें त्यांना शक्य होत असे. कवयित्री फिलिस व्हिटलेसारख्या इतर कांहींना त्यांच्या मालकांनींच स्वातंत्र्य दिलें होतें. आणि ओजर्नर ट्रुथ, हॅरियट टबमन, फ्रेडरिक डग्लससारखे इतर कांहीं गुलामगिरीच्या शृंखला तोडून पळाले. एवढेंच नव्हे तर इतरांना स्वतंत्र करण्यासाठीं त्यांनीं आपलें आयुष्य वेंचलें. तथापि उत्तर-दक्षिणेंत युद्ध होण्यापूर्वीं सुमारें अडीचशें वर्षेंपर्यंत अमेरिकेंतील गुलाम वा स्वतंत्र निग्रोंच्या जीवनावर गुलामगिरीचा या ना त्या रीतीनें परिणाम होत होता. तर यादवी युद्धानंतर स्वातंत्र्योत्तर प्रश्नच या काळ्या नागरिकांच्या जीवनांत प्रभाव पाडूं लागले. हे निग्रो लोक स्वतंत्र झाले; पण त्यांना ना जमीन, ना पैसा, ना शिक्षण. १८६३ मध्यें अब्राहम लिंकननें स्वातंत्र्याच्या जाहीरनाम्यावर सही केल्यापासून संपूर्ण नागरिकत्व प्राप्त व्हावें म्हणून सतत चाललेली धडपड म्हणजेच निग्रोंचा इतिहास होय. अमेरिकेच्या कांहीं विभागांत जरी निग्रोंची प्रगति भरपूर झाली असली, तरीहि हें ध्येय साध्य झालेलें नाहीं.

या पुस्तकांत ग्रथित केलेल्या प्रसिद्ध अमेरिकन निग्रोंनीं आपल्या जीवनांत जें कांहीं मिळवलें, तें सर्वसाधारण अमेरिकनास ज्या अडचणी सोसाव्या लागतात त्या सोसूनहि शिवाय निग्रो म्हणून आलेल्या अडचणी सोसून साध्य केलें आहे. प्रथम त्यांना गुलामगिरींत रहावें लागे. या काळांत कोणताहि माणूस हा कांहीं आपल्या दर्जाप्रमाणें वागण्यास मोकळा नव्हता. स्वतःवर त्याचा स्वतःचा कांहीं हक्क नव्हता. पुढें त्यांना मतदानाचा हक्क नव्हता; विद्यापीठांत त्यांना प्रवेश मिळत नसे, सार्वजनिक ग्रंथालयांतून ग्रंथ

मिळत नसे, कांहीं विशिष्ट विभागांत घर विकत वा भाड्यानें घेण्याची त्यांना मनाई होती; आणि कांहीं भागांतील सभागृहांत संगीताचे कार्यक्रम करण्यास वा रंगभूमीवर येण्यास त्यांना बंदी होती. अशा प्रकारें वंशद्वेषाचे अनेक कटु अनुभव त्यांना मिळत होते. या अडचणी या ना त्या स्वरूपांत प्रस्तुत पुस्तकांत ग्रथित केलेल्या व्यक्तींच्या जीवनाचा एक भागच होऊन बसलेल्या दिसतील. या अडचणींवर त्यांना मात करावी लागली आहे. परंतु सामर्थ्य वा बुद्धीच्या जोरावर हे लोक अडचणींवर मात करूं शकले व लोकशाहींतील अपरिहार्य लवचिक परिस्थितींत हे स्त्री-पुरुष प्रभावशाली झाले, मोठे झाले. हें त्यांनीं कसें केलें, हा त्यांच्या जीवनाचा एक भाग झाला. ज्या परिस्थितींत त्यांनीं हें केलें, तो दुसरा भाग होय. पण वैयक्तिक प्रयत्न व लोकशाही समाजव्यवस्थेंत काय उपलब्ध होऊं शकतें, हें आपणांस समजावून घ्यावयाचें असेल, तर हे दोन्ही घटक एकमेकांत गुंफले गेले आहेत, हें लक्षांत घेतलें पाहिजे. कवयित्री फिलिस व्हिटलेपासून काव्याबाबत पलित्झर पारितोषिक मिळवणाऱ्या या काळांतील ग्वेनडोलिन ब्रुक्सपर्यंत; शंभर वर्षांपूर्वीं स्वातंत्र्यासाठीं झगडणाऱ्या फ्रेडरिक डग्लस्पासून आजच्या काळांत मुष्टियुद्धांत अजिंक्यपद मिळवणाऱ्या जो लुईपर्यंत; १८०० मध्यें शेक्सपियरच्या नाटकांतील भूमिका करणाऱ्या इरा ॲल्ड्रिजपासून चालू काळांत चित्रपट, रेडिओ, रंगभूमीवर चमकणाऱ्या एथेल वॉटर्स व ख्रिस्तवार्सा कॅनडा ली या कलावंतांपर्यंत; गुलामगिरीच्या काळांत नांव कमावलेल्या रिचर्ड ॲलन या धर्मोपदेशकापासून तों आजच्या बोस्टन विद्यापीठांतील चॅपेलचे डीन हॉवर्ड थर्मनपर्यंत; अनेक निग्रो नामवंत झाले आहेत. अमेरिकेंत लोकशाहीनें सर्वांत अधिक नामवंत निग्रो जगाला दिले आहेत. अमेरिकेंत अनेक निग्रो नागरिक प्रसिद्ध आहेत. विज्ञानापासून राजकारणापर्यंत, तसेंच कला, क्रीडा, धर्म व व्यवसाय इत्यादि अनेक क्षेत्रांत निग्रो नागरिक प्रामुख्यानें आहेत. यांपैकीं थोड्या लोकांसंबंधीं लिहिण्याची संधि मला लाभत आहे. पण ज्यांच्यासंबंधीं अमेरिकेला अभिमान वाटावा, अशा अनेक निग्रो नागरिकांचे ते प्रतिनिधि आहेत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

— लेखक

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | फिलीस व्हिटले | १ |
| २. | इरा ॲल्ड्रिज | ९ |
| ३. | डॅनियल हेल विल्यम्स् | १२ |
| ४. | हेन्री ओसावा टॅनर | १६ |
| ५. | जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर | २० |
| ६. | पॉल लॉरेन्स डनबार | ३१ |
| ७. | डब्ल्यू. सी. हॅन्डी | ३९ |
| ८. | रॉल्फ बुंच | ५१ |
| ९. | मरियन ॲन्डर्सन | ६० |
| १०. | रिचर्ड ॲलन | ६७ |
| ११. | फ्रेडरिक डग्लस | ७३ |
| १२. | हॅरियट टबमन | ८२ |
| १३. | बुकर टी. वॉशिंग्टन | ९२ |
| १४. | रॉबर्ट एस्. ॲबॉट | १०४ |
| १५. | चार्लस् स्पॉल्डिंग | ११० |
| १६. | ए. फिलिप रॅन्डॉल्फ | ११५ |
| १७. | जॅकी रॉबिन्सन | ११२ |

मराठी ग्रंथ संग्रहालय. ठाणें. स्थलप्रत.
२२४८० वि:
क्रमांक ....५९८.... नों: दि:
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे ९४९८

*कवयित्री*

# फिलीस व्हिटले

१७५३ : : १७८४

---

ती मुलगी सडपातळ, चॉकोलेटसारखी काळसर होती. वृत्तीनें ती लाजाळू होती. आणि आफ्रिकन सौंदर्याचा ती एक नमुना होती, असें म्हणावयास कांहीं हरकत नाहीं. तिच्या नाजूक चेहऱ्यांत व पाणीदार डोळ्यांत जॉन व्हिटले यास असें कांहीं आढळलें, कीं ती सेनेगलहून आलेल्या बोटींतून उतरतांच त्यानें तिला विकत घेतलें. आपली पत्नी, दोन मुलगे आणि मुलगी यांचें काम करण्यासाठीं व्हिटलेनें या मुलीला विकत घेतलें होतें. बोस्टनच्या गोदींतून व्हिटले तिला घेऊन जाऊं लागला तेव्हां या अपरिचित जगतांतील आश्चर्यें ती आपल्या नजरेंत सामावून घेत होती. ती अनवाणी जात होती; आपण कुठें चाललों आहोंत, हें तिला माहीत नव्हतें आणि हंसावें कीं रडावें, हें उमजत नव्हतें.

जॉन व्हिटले हा चांगला सुखवस्तु शिंपी होता. त्यानें आपल्या घरीं या मुलीला नेलें व तेथें तिचें प्रेमपूर्वक स्वागत झालें. या मुलीचें वय काय असावें, हें कोणालाच माहीत नव्हतें; पण तिचा शेवटचा दूधदांत पडण्याच्या बेतांत होता, तेव्हां ती सहा वा सात वर्षांची असावी, असें तिच्या मालकिणीचें मत बनलें. या मुलीला इंग्रजी येत नव्हतें, तर १७६१च्या सुमारास बोस्टनमधील कुणालाच सिंहली भाषा येत नव्हती. त्यामुळें या मुलीचा इतिहास कळला नाहींच; इतकेंच नव्हे तर तिचें नांवहि समजलें

नाहीं. तेव्हां व्हिटले कुटुंबानें तिचें फिलीस असें नांव ठेवलें व आपलेंच आडनांव तिच्यापुढें लावण्यास सुरुवात केली. ही मुलगी एकवीस वर्षांची होण्याच्या आंतच तिचें नांव अमेरिकेंतील सर्व वसाहतींत, इतकेंच नव्हे तर इंग्लंडमध्येंहि माहीत झालें होतें. ही आफ्रिकन गुलाम मुलगी त्या काळांत एक नामवंत कवयित्री म्हणून ओळखली जात होती.

फिलीसची मालकीण सौजन्यशील होती. ही मुलगी हुशार आहे, असें पाहतांच तिनें तिला लिहायला व वाचायला शिकविलें. त्या काळांत आफ्रिकन गुलामास वाचण्यालिहिण्यास शिकविणें हें अमेरिकेंतील बहुतेक वसाहतींत कायदा व परंपरा यांच्याविरुद्ध होतें. परंतु सुदैवानें अनेक गुलाम शिकले होते, शिकत होते. आणि फिलीसच्या कविता प्रसिद्ध होण्यापूर्वींच कांहींजण कवि म्हणून ओळखले जात होते. मॅसच्युसेट्स्मधील डीरफिल्ड येथील एक आफ्रिकन स्त्री लुसी टेरी हिनें १७४६ मध्यें 'बार्स फाइट' या नांवाची एक कविता लिहिली होती. ती ज्या शहरांत राहत होती, त्यावर रेड इंडियन लोकांनीं केलेल्या हल्ल्याचें काव्यमय वर्णन तिनें या कवितेंत केलें होतें. १७६० मध्यें लाँग आयलंडमधील क्वीन्स् व्हिलेज येथें राहणारा एक आफ्रिकन गुलाम जुपिटर हॅमंड यानेंहि आपल्या कविता प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली होती. अठरा वर्षांनंतर बोस्टनमधील या गुलाम मुलीच्या प्रशंसापर त्यानें एक कविता लिहिली होती. त्याची व तिची कधीं भेटहि झाली नव्हती. 'ए पोएटिकल ॲड्रेस् टू फिलीस व्हिटले' असें त्या कवितेचें नांव आहे.

फिलीस असें पुढें नांव पडलेल्या या नाजूक मुलीला व इतर गुलामांना घेऊन जेव्हां बोट बोस्टन बंदरांत आली, त्या वेळेला इंग्रजांच्या वर्चस्वाविरुद्ध तेरा वसाहतींत वाढता असंतोष निर्माण होत होता. तिसऱ्या जॉर्जचे सैनिक बोस्टनच्या रस्त्यावर पहारा करीत असत. फिलीस थोडी मोठी झाली तेव्हां ती राहत असलेल्या भागांत भररस्त्यावर कांहीं बंडखोर नागरिक आणि ब्रिटिश सैनिक यांच्यांत मारामारी जुंपलेली एकदां तिनें पाहिली. या नागरिकांत एक उंचापुरा निग्रो होता. त्याचें नांव ख्रिसपस ॲटकस. जेव्हां ब्रिटिश शिपायांनीं गोळीबार केला, तेव्हां ख्रिसपस हा पहिला बळी पडला. अमेरिकन स्वातंत्र्यासाठीं त्यानें आपलें रक्त

सांडलें. फॅन्युइल हॉलमध्यें त्याचें शव आहे व बोस्टनमध्यें त्याचें स्मारकहि उभारण्यांत आलें आहे.

पांच वर्षांनंतर जनरल जॉर्ज वॉशिंग्टनच्या नेतृत्वाखालीं स्वातंत्र्य-युद्धाला आरंभ झाला. त्या वेळेला बोस्टनला वेढा पडला असतां वॉशिंग्टन-बद्दल फिलीसनें एक कविता लिहिली. ' शांततेंत पहिला ' असें त्याचें तिनें त्या कवितेंत वर्णन केलें होतें. या कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत—

Proceed, great chief, with virtue on thy side,
Thy every action let the goddess guide,
A crown, a mansion, and a throne that shine,
With gold unfading, Washington ! be thine.

हे महान् नेत्या ! पुढें चल ! सद्गुण तुझ्याच बाजूला आहेत. तुझी प्रत्येक हालचाल देवता मार्गदर्शित करो ! मुकुट, प्रासाद आणि सदैव चमकणाऱ्या सोन्याचें सिंहासन, वॉशिंग्टन, तुझेंच होवो !

ही कविता वाचल्यानंतर त्या भावी ' राष्ट्रपित्या 'नें या तरुण निग्रो कवयित्रीला एक पत्र पाठवून तिचे आभार मानले. ' आपण या प्रशंसेला कितीहि अपात्र असलों ' तरी ही कविता केल्याबद्दल त्यानें तिचे आभार मानले होते व तिच्या कवित्वशक्तीचें कौतुक केलें होतें. आपल्या पत्राच्या शेवटीं वॉशिंग्टननें लिहिलें होतें —

जर तूं कधीं केंब्रिजला वा माझ्या छावणीच्या नजिक आलीस तर मला भेट. काव्यदेवतेनें जिच्यावर आपला वरदहस्त ठेवला आहे व निसर्गानें जिला उदार हातानें गुणसंपत्ति बहाल केली आहे, तिला प्रत्यक्ष भेटण्यास मला केव्हांहि आनंदच होईल.

तुझा आज्ञाधारक सेवक,
जॉर्ज वॉशिंग्टन

जेव्हां स्वातंत्र्ययुद्ध संपलें व अमेरिका स्वतंत्र झाली, तेव्हां फिलीस व्हिटलेनें ' लिबर्टी ॲन्ड पीस ' ( ' स्वातंत्र्य व शांतता ' ) या नांवाची एक उत्कृष्ट कविता केली.

Lo freedom comes. Th' prescient muse foretold
All eyes th' accomplished prophecy behold :
Her post described, 'She moves divinely fair'
Olive and laurel bind her golden hair !

स्वातंत्र्य आलें. तुझ्या भविष्यवादी वाग्देवतेनें हें अगोदरच वर्तविलें होतें. तुझें भविष्य खरें झाल्याचें सर्वांनीं पाहिलें. दैवी सौंदर्याच्या या पुतळीचे सोनेरी केस ऑलिव्ह व मानचिन्हांनीं गुंफले आहेत.

आणि या कवितेच्या शेवटच्या ओळी अशा आहेत —

Auspicious Heaven shall fill with fav'ring gales,
Where e'er Columbia spreads her swelling sails :
To every realm shall peace her charms display,
And heavenly freedom spread her golden ray.

मंगलदायक अवकाशांत अनुकूल वारे वाहतील आणि 'कोलंबिया' आपलीं शिडें उभारून जेथें जेथें जाईल तेथें शांतता नांदेल आणि स्वातंत्र्याचा सोनेरी प्रकाश पसरेल.

न्यू इंग्लंड वसाहतींतील लोकांनीं अमेरिकन क्रांतीनंतरहि गुलामगिरीची पद्धति चालू ठेवली होती; पण व्हिटले कुटुंबानें या तरुण कवयित्रीची प्रतिभा मान्य करण्याच्या हेतूनें १७७२ मध्येंच तिला मुक्त केलें. गुलामगिरीचा काळहि फिलीसला कष्टदायक नव्हता. एका सुसंस्कृत कुटुंबांत ती वाढली होती ; आणि एका गुलाम मुलीला स्वतंत्र खोली असणें हें त्या काळांत विचित्र असलें तरीहि फिलीसला एक स्वतंत्र खोली देण्यांत आली होती. या खोलींत उष्णतेची व दिव्याची व्यवस्था होती. काम झाल्यावर लिहितां व वाचतां यावें म्हणून फिलीसला व्हिटले कुटुंबानें ही खोली दिली होती. या औदार्ययुक्त वागणुकीमुळें फिलीसचा अतिशय फायदा झाला. त्याकाळची परिस्थिति अशी होती, कीं कोणत्याहि वंशाच्या स्त्रीला लिहितां वा वाचतां येणें हें अपवादभूत होतें. अशा काळांत फिलीसला चांगलें वाचन करतां येत होतें, तिला लॅटिनचा अभ्यास करतां येत होता आणि ती

कविता लिहीत असे. ती बायबल वाचीत असे, त्याचप्रमाणें मिल्टन, ड्रायडन वा इतर कवि व लेखक यांच्या साहित्याचेंहि वाचन करीत असे. अलेक्झांडर पोपनें भाषांतरित केलेलें होमरचें महाकाव्य तिला फार आवडत असे. त्याच्या छंदोबद्ध व सफाईदार रचनेचा तिच्यावर प्रभाव पडला होता. त्या काळांत कवितेची शैली ही व्यक्तीगाणिक निराळी नसे; ती विद्वत्ताप्रचुर असे व जुन्या देवदेवतांचा उल्लेख त्यांत वारंवार येत असे.

व्हिटले कुटुंबाच्या अनेक मित्रमंडळींच्या घरीं या तरुण आफ्रिकन कवयित्रीला पाचारण केलें जाई. ओल्ड साउथ चर्चची ती सभासद झाली होती. बोस्टनमधील कांहीं प्रमुख नागरिक तिचे आश्रयदाते होते आणि तिच्या काव्यावर बरीच चर्चा होत असे. कांहींजणांना एक गुलाम तरुणी अशा प्रकारचें काव्य करूं शकणार नाहीं असें वाटत असे; पण इतर कांहीं-जण वृत्तपत्रांना पत्रें पाठवून फिलीसच त्या कविता स्वतः करते, अशी हमी देत. तिला गुलाम म्हणून वागविलें जात नसल्यानें तिच्या काव्यांत गुलाम-गिरीबद्दल क्वचितच उल्लेख आढळतात. पण बोस्टनमध्यें आपल्यासारखे सुदैवी सर्व नाहींत, दुर्दैवी गुलाम आहेत, हें तिला अर्थातच माहीत होतें. अर्ल ऑफ डार्टमाउथला उद्देशून लिहिलेल्या कवितेंत तिनें गुलामगिरीचा निषेधच केला आहे —

I, young in life, by seeming cruel fate,
Was snatch'd from Afric's fancy'd happy seat :
What pangs excruciating must molest,
What sorrows labour in my parent's breast ?
Steel'd was the soul and by no misery mov'd
That from a father seiz'd his babe belov'd.
Such, such my case. And can I then but pray
Others may never feel tyrannic way ?"

क्रूर अशा दैवाचा आघात होऊन मला आफ्रिकेच्या आनंदी वातावरणांतून ओढून काढण्यांत आलें. यामुळें माझ्या मातापितरांना किती यातना झाल्या असतील? त्यांचें हृदय दुःखानें किती विदीर्ण झालें असेल? आपली लाडकी मुलगी

> ओढून नेत असतां बापाला होत असणाऱ्या यातना पाहूनहि ज्यांचें हृदय द्रवलें नाहीं, ते किती पाषाण-हृदयाचे असतील? माझें जीवन हें असें आहे. इतरांना या दडपशाहीची झळ लागूं नये म्हणून मी प्रार्थना करूं काय?

फिलीसनें आपली पहिली कविता लिहिली तेव्हां ती तेरा वर्षांची होती. 'ऑन् दि डेथ् ऑफ दि रेव्हरंड जॉर्ज व्हाइटफील्ड' ही कविता तिनें प्रसिद्ध केली, तेव्हां ती सोळा वर्षांची होती. तिची प्रकृति फार नाजूक असल्यामुळें तिच्या मालकिणीनें तिला बोटीनें इंग्लंडला पाठविलें, त्या वेळीं तिचें वय एकवीस होतें. 'पोएम्स् ऑन् व्हेरियस सब्जेक्ट्स् : रिलीजस् अँड् मॉरल' हा तिचा पहिला काव्यसंग्रह प्रसिद्ध करण्याची व्यवस्था इंग्लंडमध्येंच झाली. इंग्लंडमध्यें कौन्टेस ऑफ हटिंग्डनची ती पाहुणी होती व तिला अनेक विचारवंतांची गांठ घेतां येईल, अशी व्यवस्था या यजमानिणीनें केली होती. राजाशींहि तिची भेट करून देण्याची व्यवस्था या बाईनें केली होती; पण तेवढ्यांत तिची मालकीण मिसेस् व्हिटले ही फार आजारी पडली व तिला बोस्टनला परत जाणें भाग पडलें. स्वगृहीं परत जाण्यापूर्वी लंडनच्या लॉर्ड मेयरनें मिल्टनच्या 'पॅरडाइज् लॉस्ट' या काव्याची १७७० सालची एक सुंदर प्रत तिला भेट म्हणून दिली.

फिलीस बोस्टनला परत आल्यानंतर मिसेस् व्हिटले कांहीं फार दिवस जगली नाहीं. त्यानंतर थोड्याच वर्षांनीं व्हिटले स्वतःहि मृत्यु पावला. मेरी व नॅथॅनियल हीं दोघें घरीं राहत नव्हतीं; कारण मेरीचें लग्न झालें होतें आणि तिचा भाऊ युरोपांत होता. तेव्हां घर व सुरक्षितता मिळावी म्हणून तिनें एका माणसाशी लग्न केलें. याचे अनेक धंदे असत; पण 'एक ना धड भाराभर चिंध्या' अशी अवस्था होती. त्याचें नांव जॉन पेटर्स असें होतें. तो कधीं बेकरींत काम करी, तर कधीं न्हावी, दुकानांतला कारकून म्हणूनहि काम करी. केव्हां केव्हां तो सोनेरी मुठीची काठी हातांत घेई, टोप वगैरे चढवी व आपण वकील वा डॉक्टर असल्याचा बहाणा करी. फिलीस ही नामवंत झाली होती, म्हणून त्यानें तिच्याशीं विवाह केला असावा. शिवाय यामुळें आपण कांहीं न करतां 'कोणीतरी' आहोंत, याचें सुख त्याला भोगावयाचें असेल.

त्यांना तीन मुलें झालीं, पण त्यानें त्यांची कधीं काळजी घेतली नाहीं. त्यांपैकीं दोन मुलें लहान असतांनाच वारलीं. तिसऱ्या मुलाचा जन्म झाल्यानंतर जॉन पेटर्स फिलीसला सोडून गेला. तिला मग एका खाणावळींत मोलमजुरी करावी लागली. थंडीमुळें ती व तिचें मूल आजारी पडलें आणि मग नाताळपूर्वी थोडे दिवस दोघांचाहि अंत झाला. दोघांचें एकत्र दफन करण्यांत आलें. १७८४ मधील ही घटना आहे. त्याच सुमारास फिलीस व्हिटलेच्या कविता-संग्रहाची अमेरिकन आवृत्ति प्रसिद्ध झाली होती.

आतांप्रमाणेंच त्याहि काळांत कवितेसाठीं फार थोडा मोबदला मिळत असे. फिलीसला दारिद्र्यांतच मृत्यु आला. तिच्या मृत्यूनंतर तिच्या नवऱ्यानें केलेलें कर्ज फेडण्यासाठीं तिच्याजवळील 'पॅरडाइज् लॉस्ट 'ची सुंदर व दुर्मिळ प्रत विकावी लागली. सध्यां ही प्रत हार्वर्ड विद्यापीठाच्या ग्रंथालयांत जपून ठेवण्यांत आली आहे. फिलीस व्हिटलेच्या मरणानंतर तिच्या काव्यसंग्रहाच्या निदान आठ आवृत्त्या तरी प्रसिद्ध झाल्या आहेत. आज अमेरिकेंतील अनेक शाळा, महिला समाज व वाय्. एम्. सी. ए.च्या शाखांना फिलीस व्हिटलेचें नांव देण्यांत आलें आहे. आफ्रिका, बोस्टन व इंग्लंडच्या जीवनाचा तिनें अनुभव घेतला होता. गुलामगिरी व राज-घराण्याचा पाहुणचार, कीर्ति व दारिद्र्य, होमर, मिल्टन, पोप यांच्या काव्याचा रसास्वाद आणि खाणावळींतील कंटाळवाणी नोकरी यांचा अनुभव तिला मिळाला होता. आयुष्याच्या अखेरच्या काळांत लज्जा व गरिबीमुळें असेल; पण तिचा आपल्या अनेक मित्रमैत्रिणींशीं संबंध तुटला होता. तिच्या मृत्यूची छोटीशी वार्ता वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली, तेव्हां त्यांना धक्का बसला व आश्चर्यहि वाटलें.

पण फिलीसला तिच्या पूर्वायुष्यांत सुझाना व्हिटलेनें जी प्रेमळ वागणूक दिली होती व मार्गदर्शन केलें होतें, त्याबद्दल ती सदैव कृतज्ञच राहिली. जेव्हां मिसेस व्हिटले मृत्यु पावली तेव्हां तिनें एका पत्रांत लिहिलें :

"नुकतीच माझी मालकीण वारली, तेव्हां मृत्यूचें दिव्य मीं अनुभवलें. आईबाप, बहीण वा भाऊ जावा असें दुःख मला झालें. या सर्वांच्या प्रेमाचा परिपाक तिच्यांत झाला होता. ज्या वेळेला तिनें मला आपल्या

घरांत घेतलें, तेव्हां मी एक गरीब, अनाथ मुलगी होतें. तिनें मला केवळ घरांतच नव्हे तर सर्वत्र नोकराप्रमाणें न वागवितां स्वतःच्या मुलीप्रमाणें वागविलें. मला सदुपदेश करण्याची एकहि संधि तिनें घालविली नाहीं, पण हा उपदेश किती प्रेमळपणानें केलेला असे ! हें सर्व माझ्या सदैव स्मरणांत राहील. तिच्या सूचनांपेक्षां वा नियमांपेक्षां तिचें जीवनच अधिक अनुकरणीय होतें व तोच मोठा उपदेश होता. केवळ व्याख्यानापेक्षां प्रत्यक्ष आचरणच कसें प्रभावी असतें, याचा पडताळा आला."

गुलामगिरीच्या परिस्थितींत या संवेदनाक्षम आफ्रिकन मुलीवर दैवाचा यापेक्षां निराळा वरदहस्त तो कोणता ? व्हिटले कुटुंब फार चांगलें होतें. तें कितीहि चांगलें असलें तरीहि रात्रीच्या अंधारांत फिलीस लहान असतां आईची आठवण येऊन रडली असेलच. न्यू इंग्लंडमधील थंडीचा कडाका अनुभवतांना तिला दूर असलेल्या सेनेगलमधील सूर्यप्रकाश, ताडाचीं झाडें वगैरेंची आठवण येत असेल. मोठी झाल्यावर जेव्हां दिव्याच्या प्रकाशांत ती पोपचें काव्य वाचीत असेल, तेव्हां आफ्रिकेंतील ड्रम-वादनाची तिला आठवण होत असेल. तें परत ऐकूं येणार नाहीं म्हणून त्यांची आठवणच बुजविण्याचा प्रयत्न तिनें केला असेल काय ? आईविना मुलाला ज्याप्रमाणें अनाथ व एकाकी वाटतें त्याप्रमाणें तिला कधीं वाटलें असेल काय ? तिला वाटलें असलें तरीहि त्या काळांत काव्यांत वैयक्तिक भावना रंगविल्या जात नसल्यामुळें तिनें आपल्या या भावना काव्यबद्ध केलेल्या नाहींत.

⚜ ⚜ ⚜

*अभिनेता*

# इरा ॲल्ड्रिज

१८०७ : : १८६७

---

पहिल्या नाणावलेल्या निग्रो नटाचे वडील म्हणून रेव्हरंड डॅनियल ॲल्ड्रिज ओळखले जातात. न्यूयॉर्कमधील एका प्रेस्बिटेरियन चर्चचे ते धर्मगुरु होते. त्यांचा पहिला मुलगा १८०७ मध्यें जन्मला व त्याचें नांव इरा असें ठेवण्यांत आलें. इरा ॲल्ड्रिजचा जन्म मॅनहॅटनमध्यें झाला कीं मेरीलँडमध्यें कुठेंतरी झाला, हें त्या वेळच्या कागदपत्रांवरून कळत नाहीं. पण तो अगदीं लहान असतांनाच न्यूयॉर्कमधील आफ्रिकन फ्री स्कूलमध्यें त्याचें नांव दाखल झालें होतें. आणि तेव्हांपासून त्याच्या जीवनाची सार्वजनिक नोंद झाली आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं. तो लवकरच नट झाला.

तो शाळेंत असतांनाच 'आफ्रिकन ग्रोव्ह' या नाट्यगृहांत होणाऱ्या नाटकांतील सामुदायिक दृश्यांत भाले वगैरे घेण्याचें काम तो करी किंवा या गर्दीतील एक म्हणून काम करी. १८८० मध्यें कांहीं निग्रो नटांच्या कंपनीनें शेक्सपियरचीं व इतर नाटकें केलीं. जेम्स ह्युलेट या दिग्दर्शकानें तिसरा रिचर्ड व ऑथेल्लोचें काम केलें होतें. त्यानें एक नृत्य-नाटकहि लिहिलें होतें व त्यांत तो नृत्य करीत असे. 'फ्रॉन्सेस टॅव्हर्न' या निग्रो हॉटेलांत अनेकदां जॉर्ज वॉशिंग्टन खाना घेत असे. तेथून जवळच नाट्यगृह होतें. हें नाट्यगृह इरा ज्या आफ्रिकन फ्री स्कूलमध्यें शिकत असे, त्या शाळेच्या जवळच होतें. यामुळेंच इराला तेथें सहज रीत्या जातां आलें.

जेव्हां आफ्रिकन ग्रोव्हमधील निग्रोंचीं नाटकें बंद पाडण्यासाठीं कांहीं गोऱ्या गुंडांनीं हल्ले सुरू केले, तेव्हां हें नाट्यगृहच पोलिसांनीं बंद केलें. मग इरा ॲल्ड्रिज यानें चॅथम या नाट्यगृहांत नोकरी धरली. त्यामुळें नटांचीं भाषणें त्याला रंगपटांत राहून ऐकावयास मिळत. कांहीं हौशी नटांच्या नाटकांत त्यानें भाग घेण्यास सुरुवात केली व शेरिडनच्या ' पिझारो ' या नाटकांतहि त्यानें काम केलें. नाटकांसंबंधींच्या त्याच्या आवडीमुळें त्याच्या वडिलांना चिंता वाटली असेल. कारण नाट्यगृहें म्हणजे दुष्ट लोकांचे अड्डे, असें त्या काळांत मानलें जात असे व नटाचा व्यवसाय प्रतिष्ठित आहे असें कांहीं मानलें जात नसे. म्हणूनच रेव्हरंड ॲल्ड्रिज यांनीं आपल्या कुमारवयांतील मुलाला शिक्षणासाठीं परदेशीं पाठविण्याचा निर्णय घेतला असावा.

ग्लासगो येथील विद्यापीठांत निग्रोंना प्रवेश सुलभ असे व तेथें गुलामगिरीविरोधी अनेक नेत्यांनीं शिक्षण घेतलें होतें. स्कॉटलंडमध्यें गेल्यावर इरानें आपल्या अभ्यासाकडे लक्ष केंद्रित केलें ; पण पदवीधर होईपर्यंत त्यानें तेथें वास्तव्य केल्याचीं कांहीं नोंद नाहीं. लवकरच रंगभूमीची मोहिनी त्याच्यावर पुन्हा पडली आणि तो वीस वर्षांचा होतो न होतो तोंच लंडनच्या रॉयल्टी नाट्यगृहांत ऑथेल्लोचें कटींण काम करू लागला. त्याला लगेच यशःप्राप्तिहि झाली. नंतर युरोपांतील अनेक देशांच्या राजधान्यांचा त्यानें वारंवार दौरा केला. ज्या देशांतील लोकांना त्याची भाषा अवगत नव्हती, तेथेंसुद्धां त्याचें नाटक पाहण्यासाठीं शेंकडों-हजारों लोक एकच गर्दी करीत. वृत्तपत्रांतून त्याच्यासंबंधीं रकानेच्या रकाने भरून मजकूर येत असे. दोन पिढ्यांनीं त्याच्या नाटकांचा आस्वाद घेतला. चाळीस वर्षें इरा ॲल्ड्रिज हा रंगभूमीवर होता.

त्या वेळचा प्रख्यात इंग्रज नट एडमंड कीन यानें डब्लिनमध्यें एकदां ॲल्ड्रिजचें ऑथेल्लोचें काम पाहिलें. त्याच्या अभिनयाचा कीनवर इतका प्रभाव पडला, की त्यानें ऑथेल्लोचा प्रयोग करण्याची त्यास सूचना केली व आपण खलनायक अयागोचें काम करणार असल्याचें त्यानें जाहीर केलें. १८८३ मध्यें या दोघांनीं लंडनच्या ' कॉव्हेंट गार्डन ' नाट्य-गृहांत ऑथेल्लोचा प्रयोग केला. शेक्सपियरच्या या अभिजात नाटकाचा

हा प्रयोग संस्मरणीय असाच ठरला. हे दोघेहि महान् नट एकमेकांचे मित्र बनले व त्यांनीं मग इंग्लंडमध्यें व युरोपांत अनेक दौरे काढून नाट्यप्रयोग केले. शेक्सपियरच्या नाटकांतील काळ्या ऑथेल्लोचें काम करतांना ऑल्ड्रिजला मेक्‌अप करावा लागत नसे. तो काळा होता; उंच व भव्य होता आणि दिसायला चांगला होता. त्याचे उच्चार स्पष्ट व आवाज भरदार होता.

जरी ऑथेल्लोच्या कामामुळें ऑल्ड्रिजला सर्वांत अधिक मान्यता मिळाली होती, तरीहि त्यानें अनेक अभिजात नाटकांतील भूमिका आत्मसात् केल्या होत्या. 'टिटस अँड अॅन्ड्रोनिकस' हें नाटक इंग्लंडमध्यें दोन शतकें झालें नव्हतें, तें त्यानें रंगभूमीवर आणलें. 'दि कौन्ट ऑफ मॉन्टे ख्रिस्टो' या व इतर पुस्तकांचा कर्ता अलेक्झांडर डयूमा हा स्वतः मोठा ढंगदार होता. तो इरा ऑल्ड्रिजचा चाहता होता. रिचर्ड वॅगनर हा प्रख्यात संगीत-नियोजक त्याच्या नाटकांना नेहमीं हजर राहत असे. स्वीडनच्या राजानें ऑल्ड्रिजला स्वदस्तुरचें पत्र धाडून स्टॉकहोममध्यें नाट्यप्रयोग करण्याची सूचना केली होती. इराणच्या राजानें त्यास 'ऑर्डर ऑफ शेव्हॅलियर' हें पदक सन्मानपूर्वक दिलें. रशियाच्या झारनें त्याला 'क्रॉस ऑफ लिओपोल्ड' अर्पण केला. मॉस्को व पिटस्बर्ग येथें त्याच्या नाटकांचे प्रयोग अतिशयच गाजले. मॉस्को विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनीं खेळ संपल्यानंतर ऑल्ड्रिजच्या घोड्याच्या गाडीचे घोडे सोडले आणि स्वतः हॉटेलपर्यंत गाडी ओढली. विद्यार्थ्यांनीं केलेला हा सर्वांत मोठा सन्मान होय.

इरा ऑल्ड्रिज हा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा नट होता. त्या काळांतील त्याची कारकीर्द जितकी दीर्घ, तितकीच ढंगदार ठरली. जेथें जेथें तो गेला, तेथें त्याच्यावर प्रेमाचा व सन्मानाचा वर्षाव झाला. त्याची कीर्ति सर्वत्र झाल्यावर तो आपल्या जन्मभूमीस म्हणजे अमेरिकेस कधीं परतला नाहीं. त्यानें युरोपांतच विवाह केला व आयुष्य व्यतीत केलें. साठाव्या वर्षींहि तो नट म्हणूनच वावरत होता. आणि पोलंडमध्यें तो दौऱ्यावर असतां मरण पावला. स्ट्रॅटफोर्ड ऑन अॅव्हॉन येथील शेक्सपियर स्मारक नाटकगृहांत इरा ऑल्ड्रिजच्या नांवाचें एक सन्मानदर्शक आसन अजूनहि असलेलें दिसेल.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
22780
क्रमांक ... वि. ...
नोंः दिः ...

डॉक्टर

# डॅनियल हेल विल्यम्स्

१८५८ : : १९३१

---

ज्या वेळेला बुकर टी. वॉशिंग्टन दक्षिणेंत जन्माला आला, तेव्हां पुढें ख्यातनाम झालेल्या आणखी एका निग्रोचा जन्म उत्तरेंत झाला. पेन्सिल्व्हानियामधील हॉलिडेजबर्ग येथें डॅनियल हेल विल्यम्स् याचा जन्म १८५८ मध्यें झाला. त्याचे आई-वडील हे स्वतंत्र नागरिक होते. डॅनियल वक्तशीरपणें शाळेंत जाई आणि तो एक हुशार विद्यार्थी म्हणून गणला जात होता. परंतु त्याच्या वडिलांच्या मृत्यूनंतर इतर मुलांना घेऊन त्याची आई विस्कॉन्सिनमधील जेन्सव्हिल येथें वास्तव्य करण्यास गेली आणि डॅनियल आपल्या कुटुंबियांपासून वेगळा असा ॲनपोलिस येथें शिक्षण घेत राहिला. एक दिवस त्यानें आपले कपडे वगैरे गुंडाळले व सामान घेऊन तो रेल्वे-स्टेशनवर आला.

त्याला पाहतांच त्याच्या आईला अतिशय आनंद झाला व म्हणून तो पळून आल्याबद्दल तिनें त्याला दोष दिला नाहीं. परंतु त्यानें अभ्यासाचीं सर्व पुस्तकें मागें ठेवलीं होतीं आणि नवीं पुस्तकें घेण्यास त्याच्या आईजवळ तर पैसे नव्हते. म्हणून जेन्सव्हिल येथील शाळेंत हा दहा वर्षांचा मुलगा दाखल झाला, तेव्हां त्याच्याजवळ फक्त एक डिक्शनरी होती. रोज तो ती शाळेंत नेई आणि नवीन शब्द ऐकला रे ऐकला कीं लगेच तो डिक्शनरींत पाही व त्यावर खूण करून घरीं गेल्यावर

अर्थासह तो पाठ करी. त्यानें न ऐकलेले अनेक शब्द त्याच्या कानांवर येत; तेहि तो पाठ करीत असे. यामुळें लवकरच त्याचा शब्दसंग्रह वाढला. वाचनाची त्याला विलक्षण आवड होती आणि इतिहास व विज्ञान या विषयांचें त्याला आकर्षण होतें. ग्रामर स्कूलनंतर हेअरच्या क्लासिकल ॲकॅडमींत दाखल होण्यास त्याच्या आईनें त्याला प्रोत्साहन दिलें. तेथील शिक्षण संपल्यावर कॉलेजमध्यें जाण्यासाठीं डॅनियलजवळ कांहीं पैसा नव्हता. तेव्हां जेन्सव्हिल येथील कायदेविषयक कार्यालयांत त्यानें प्रवेश मिळविला. यामुळें आपणांस वकील होतां येईल असें त्याला वाटलें. पण अनेक फिर्यादींत अतिशय कडाक्याचीं भांडणें झालेलीं असत आणि हें त्याला कांहीं आवडलें नाहीं. म्हणून त्यानें हा व्यवसाय सोडून दिला.

विज्ञानांत त्याला रस असल्यानें डॉक्टर होण्याचा विचार डॅनियल करूं लागला. पण कुटुंब मोठें असल्यामुळें त्याला आर्थिक साहाय्य करणें त्याच्या आईला शक्य नव्हतें. या कुटुंबाचा ॲन्डरसन या नांवाचा एक न्हावी मित्र होता. त्याला या मुलाबद्दल आत्मीयता वाटूं लागली व तो त्याला शक्य तितक्या प्रकारें मदत करूं लागला. सुदैवानें लवकरच त्या संस्थानाचे सर्जन जनरल डॉ. हेन्री पामर यांच्याकडे त्याला नोकरी लागली. तेथें त्याला नोकरी करून शिक्षण घेतां येत होतें. डॉ. पामर यांच्याकडून त्याला वैद्यकशास्त्राची खूपच माहिती झाली. त्यामुळें दोन वर्षांनंतर परीक्षा पास होऊन त्याला इलिनॉइसमधील इव्हान्स्टन येथील नॉर्थ वेस्टर्न विद्यापीठाच्या वैद्यक विद्यालयांत प्रवेश मिळाला. तेथें एम्. डी. ही पदवी मिळेपर्यंत तो राहिला.

मिचिगन तलावावरील सफरीसाठीं निघालेल्या बोटींतील वाद्यवृंदांत उन्हाळ्याच्या दिवसांत भाग घेऊन तो शिक्षणासाठीं पैसे सांठवी. डॅनियल विल्यम्स्चा उत्तम विद्यार्थी म्हणून चांगला लौकिक झाला होता. म्हणून १८८३ मध्यें तो पदवीधर झाल्यानंतर त्याला त्याच विद्यालयांत शारीर-शास्त्राचा शिक्षक म्हणून काम करण्यासाठीं ठेवून घेण्यांत आलें. त्या वेळेला एवढ्या मोठ्या विद्यापीठांत निग्रो शिक्षक नेमला जाणें ही एक अपूर्व अशीच घटना होती ; पण याचवरून त्याच्या कर्तबगारीची साक्ष पटते.

शिकागो येथें हा तरुण डॉ. विल्यम्स् सर्जन म्हणून व्यवसाय करूं लागला. लवकरच प्रॉटेस्टन्टांतर्फें चाललेल्या अनाथाश्रमांत त्याला एक डॉक्टर म्हणून नेमण्यांत आलें. लेक मिचिगन येथें त्यानें आपला व्यवसाय सुरू करून थोडा काळ उलटतो तोंच त्यानें बराच लौकिक मिळविला व म्हणून इलिनॉइस राज्याच्या आरोग्यमंडळावर त्याची एक सभासद म्हणून नेमणूक झाली. त्या काळांत शिकागो येथें अनेक तरुण निग्रोंना डॉक्टर होण्याची इच्छा होती आणि डॉ. विल्यम्स् त्यांना शक्य तितकी मदत करीत असे. पण शिकागोमधील कोणत्याहि हॉस्पिटलमध्यें या निग्रोंना प्रवेश नव्हता आणि निग्रो स्त्रियांना परिचारिकेचें शिक्षण घेतां येत नव्हतें. परिचारिकेचें शिक्षण फक्त गोऱ्या लोकांनाच घेतां येत होतें. या निराशाजनक परिस्थितीची चर्चा त्यानें शिकागोमधील डॉक्टर व राज्याचे अधिकारी यांच्याबरोबर केली व या संबंधांत कांहीं करण्याचा विचार त्यानें केला. त्याच्या प्रयत्नांमुळें १८९१ मध्यें शिकागोच्या दक्षिण भागांत प्रॉव्हिडंट हॉस्पिटल उभारलें गेलें. त्याला लागूनच निग्रो स्त्रियांना परिचारिकेचें शिक्षण देणारें अमेरिकेंतील पहिलें विद्यालय सुरू झालें.

या प्रॉव्हिडंट हॉस्पिटलमध्यें डॉ. विल्यम्स् सर्जन झाला. त्यानें एकदां तेथें केलेल्या एका कठीण ऑपरेशनची प्रशंसा अनेक वृत्तपत्रांत झाली आणि वैद्यकीय नियतकालिकांतून त्याचे वृत्तान्त प्रसिद्ध झालें. त्यानें ज्या प्रकारचें ऑपरेशन यशस्वी रीत्या केलें होतें, तें तसें पहिलेंच होतें. एकदां एका माणसाला या हॉस्पिटलांत आणण्यांत आलें. त्याच्या छातीवर भोसकल्यामुळें जखम झाली होती व सारखें रक्त वाहत होतें. लगेच डॉ. विल्यम्सला बोलावण्यांत आलें. त्यानें या रोग्याची तपासणी केली, उपचार केले. पण दुसऱ्या दिवशीं या रोग्याची प्रकृति एकदम ढांसळल्याचें त्याच्या लक्षांत आलें. त्या माणसाच्या छातींतून त्या वेळेलाहि रक्त वाहतच होतें. म्हणून त्याचें कारण तपासण्यासाठीं डॉ. विल्यम्सनें जखम खोलली आणि ती अधिक खोल केली. तेव्हां डॉ. विल्यम्सला असें आढळलें कीं, त्या रोग्याच्या अगदीं हृदयापर्यंत जखम गेली असून तेथेंच बिघाड झाला आहे. अशा स्थितींत हा रोगी जगेल अशी कोणाची अपेक्षा नव्हती. पण त्याला जगवण्याचा प्रयत्न करण्याचा विचार डॉ. विल्यम्सनें केला. या रोग्याच्या

हृदयाच्या आजूबाजूचा भाग कापण्यांत आला व इतर डॉक्टरांनीं तो क्लांप्यांनीं धरून ठेवला आणि डॉ. विल्यम्सनें हृदयाला झालेली जखम शिवून टाकली. मग हृदयाचे ठोके पडत असतां बाकीचा उसवलेला भागहि पुन्हा जेथल्या तेथें शिवण्यांत आला. हें सर्व करण्यासाठीं मोठें कौशल्य, धैर्य आणि एकाग्रता यांची गरज होती. अखेरीस ऑपरेशन यशस्वी होऊन तो माणूस जगला आणि वैद्यकीय इतिहासांत हें ऑपरेशन गाजलें.

त्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष ग्रोव्हर क्लेव्हलॅन्ड यांनीं या तरुण निग्रो डॉक्टरला वॉशिंग्टनला बोलावून घेतलें. कोलंबिया येथें नव्यानेंच स्थापन झालेल्या फ्रीडमॅन्स हॉस्पिटलचा प्रमुख म्हणून अध्यक्षांनीं त्याची नेमणूक केली. शिकागोप्रमाणेंच वॉशिंग्टन येथेंहि निग्रो लोकांना डॉक्टर वा परिचारिकेचें शिक्षण घेण्यांत अडचणी आहेत, असें डॉ. विल्यम्स्‌ला आढळलें. म्हणून फ्रीडमॅन्स हॉस्पिटलला लागून त्यानें एक परिचारिका विद्यालय सुरू केलें. तेथें तो पांच वर्षें होता. त्या काळांत तो तरुण निग्रो डॉक्टरांना तेथें काम करण्याची संधि देत होता. तो केवळ कुशल सर्जनच नव्हता, तर कार्यक्षम प्रशासक होता. अनेक हॉस्पिटलचें प्रमुखपद स्वीकारावें वा शिक्षक म्हणून काम करावें म्हणून त्याला अनेकदां विनंती करण्यांत आली होती; पण शिकागो येथें खासगी व्यवसाय करणेंच त्यानें पत्करलें. परंतु दरवर्षी नॅशव्हिल येथील मेहारी मेडिकल कॉलेजांत तो प्रात्यक्षिक दाखवीत असे आणि अनेक राज्यांतील वैद्यकीय विद्यार्थी हीं ऑपरेशन्स् पाहण्यासाठीं त्या वेळीं जमत असत.

इलिनॉइस येथील कुक कौन्टी हॉस्पिटलच्या शस्त्रवैद्यांच्या मंडळांत त्याची १९०० मध्यें नेमणूक झाली; नंतर शिकागो येथील सैंट लुक हॉस्पिटलमध्येंहि सहकारी सर्जन म्हणून त्याची निवड झाली. अमेरिकन कॉलेज ऑफ सर्जन्सचा फेलो म्हणून १९१३ मध्यें त्याची नेमणूक होऊन त्याचा बहुमान करण्यांत आला. अमेरिकेंतील अनेक वैद्यकीय परिषदांना तो हजर राहिला व आरोग्यकेंद्रांना त्यानें भेटी दिल्या. जेव्हां डॅनियल विल्यम्स् मरण पावला, तेव्हां अमेरिकेंतील एक निष्णात शस्त्रवैद्य म्हणून त्याला कीर्ति मिळून बराच काळ लोटलेला होता.

*चित्रकार*

# हेन्री ओसावा टॅनर

१८५९ : : १९३७

---

हेन्री ओसावा टॅनर याची जीवनकथा कांहीं रोमांचकारी, नाट्यपूर्ण आहे असें नाहीं; पण त्यानें त्याच्यामागें आपली कीर्ति युरोप व अमेरिकेंतील अनेक वस्तुसंग्रहालयांत लावलेल्या त्याच्या चित्रांच्या द्वारें जिवंत ठेवली आहे. त्याला कलावंत व्हावयाचें होतें व तो तसा झाला. त्याचे वडील आफ्रिकन मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चचे बिशप होते व म्हणून जरी त्याचें कुटुंब श्रीमान् नसलें तरी लहानपणीं त्यास उपासमार व अज्ञानांधकार यांनीं पछाडलें नाहीं. पिटस्बर्ग येथें त्याचा जन्म झाला; पण लवकरच त्यास फिलाडेल्फिया येथें नेण्यांत आलें व तारुण्यांत पदार्पण करीपर्यंत तेथेंच त्याची वाढ झाली. लहान असतां फेअरमॉंट बागेंत तो फिरत होता, तेव्हां एक चित्रकार बागेचें चित्र काढीत असल्याचें त्याला दिसलें. तें पाहतांच तेथल्या तेथेंच चित्रकार बनण्याचा त्यानें निर्धार केला.

बाल हेन्री घरीं गेला व भूगोलाच्या जुन्या पुस्तकाच्या मलपृष्ठावर तो चित्रकार ज्याप्रमाणें दुपारीं चित्र काढीत होता तसें चित्र काढण्याचा त्यानें प्रयत्न केला. लवकरच फिलाडेल्फिया येथील प्राणीसंग्रहालयांतील जनावरांच्या मातीच्या प्रतिकृती तो तयार करूं लागला. नंतर त्याच्या पाहण्यांत समुद्राचीं चित्रें आलीं तेव्हां तो अटलांटिक सिटीला सागराचीं चित्रें काढण्यासाठीं म्हणून गेला. मुलाचे हे उद्योग बापाला निष्फळ वाटत. कला ही निरुद्योगी, भटक्या, वाह्यात लोकांसाठीं असते असें त्यास वाटत

असे. परंतु तरुण टॅनरनें पेन्सिल्व्हानिया ॲकॅडमीच्या कलाविभागांत आपलें नांव नोंदविलें. आणि लवकरच त्याचें चित्र त्यानें ४० डॉलर्सना विकलें. पांच, दहा वा पंधरा डॉलर्सना चित्र गेलें तरी तो स्वतःला नशिबवान समजत असे, अशा वेळेला ४० डॉलर्स मिळाल्यानें त्याला आश्चर्य वाटलें. त्याच्या पहिल्या पहिल्या चित्रांतहि कलागुण असले पाहिजेत म्हणून त्याचें एक चित्र प्रथम १५ डॉलर्सना विकलें गेलें होतें, तरी नंतर सार्वजनिक लिलांवाच्या वेळीं त्याच चित्राला २५० डॉलर्स मिळाले.

या ॲकॅडमींतील शिक्षणक्रम पुरा झाल्यावर त्यानें अटलांटा येथील क्लार्क विद्यापीठांत चित्रकला शिकविण्याचें काम पत्करलें. आपल्या तुटपुंज्या मिळकतींत भर टाकण्यासाठीं त्यानें फोटो स्टुडिओ काढला. फावल्या वेळांतहि तो चित्रें रंगवी. 'स्वगृहीं असलेला सिंह' या त्याच्या ऑईल पेंटिंगला ८० डॉलर्स मिळाले. हेन्रीच्या वडिलांचे सहकारी आणि फ्रेडरिक डग्लसचे मित्र बिशप डॅनियल ए. पेन यांना हेन्रीच्या कलेबद्दल बरीच आत्मीयता वाटत होती व म्हणून त्यांनीं त्याला अनेक प्रकारांनीं मदत केली. टॅनरनें बिशप डॅनियल यांचा अर्धा पुतळा तयार केला, तर डॅनियलनें या तरुण चित्रकाराचीं तीन चित्रें घेऊन तीं विल्बरफोर्स विद्यापीठास नजर केलीं. १८९१ च्या सुमारास टॅनरजवळ त्याचीं बरींच चित्रें जमलीं होतीं. म्हणून सिनसिनाटी येथें त्यानें या चित्रांचें प्रदर्शन भरविलें. पण तेथें एकहि चित्र विकलें गेलें नाहीं. तथापि या तरुण चित्रकाराला परदेशीं जावयाचें आहे हें एका धर्मोपदेशकाला कळलें, तेव्हां टॅनरला रोममध्यें जाऊन शिक्षण घेतां यावें म्हणून त्यानें त्यास ३०० डॉलर्स दिले.

इटलीस जाण्यापूर्वी तो पॅरिसला उतरला आणि बरींच वर्षे तो तेथून हललाच नाहीं! पॅरिस हें जगाचें कलाकेंद्र आहे. तेव्हां इतर कलावंतांप्रमाणेंच टॅनरवरहि त्याची मोहिनी पडली. म्हणून मग तो तेथेंच राहिला व प्रथम ॲकॅदमी जुलिएं या संस्थेंत व नंतर त्या काळच्या अनेक नामवंत चित्रकारांच्या हाताखालीं त्यानें शिक्षण घेतलें. कॉस्टंट, जेरोम, जीनपॉल लॉरेन्स व थॉमस एकिन्स यांचा त्याच्या कलेवर विशेष प्रभाव पडला. परंतु पॅरिसचें सौंदर्य आणि स्वातंत्र्य याचा त्याच्या मनावर विशेष परिणाम

झाला व त्यामुळें तो एकापाठोपाठ एक कलाकृति निर्माण करूं लागला. कांहीं वर्षांनंतर त्याच्या एका चित्राची फ्रेंच कलावर्तुळांत बरीच प्रशंसा झाली. त्याला अधिकृत रीत्या मान्यता मिळण्याचा हा पहिलाच प्रसंग होय. त्याच्या कुटुंबाचा चर्चशीं संबंध होता आणि लहानपणापासून बायबलमधील गोष्टी त्याला पाठ होत्या; त्यामुळें चित्रांसाठीं धार्मिक विषय निवडण्याकडे या चित्रकाराचा कल होऊं लागला. नंतर तो रोमला गेला. तेथील लोक, स्थापत्य, धार्मिक स्थळें व अवशेष यांचा त्यानें कसून अभ्यास केला आणि बरींच वर्षें मग बायबलमधील गोष्टी व प्रसंग हेच त्याच्या कलाकृतींचे विषय असत. १८९७ मध्यें 'दि रेसरेक्शन ऑफ लाझारस' हें त्याचें चित्र फ्रेंच सरकारनें विकत घेतलें आणि लक्झेम्बर्गच्या प्रख्यात चित्रसंग्रहालयांत तें ठेवण्यांत आलें. अनेक लोकांनीं तें पाहिलें, टीकाकारांनीं त्याची प्रशंसा केली आणि तेव्हांपासून गुणी कलावंत म्हणून त्याची कीर्ति प्रस्थापित झाली.

१९०० मध्यें पॅरिस येथील समारंभांत त्याच्या कलाकृतीला मान्यता मिळाली. याच वर्षीं फिलाडेल्फिया येथील वॉल्टर लिमिन्कॉट हें पारितोषिक त्यास देण्यांत आलें. नंतर लवकरच ज्या शहरांत तो लहानाचा मोठा झाला, तेथें प्रदर्शन भरविण्यासाठीं युरोपमधील आपलीं सर्व चित्रें त्यानें अमेरिकेंत आणलीं. पण आपल्या मायभूमींत टॅनर फार काळ राहिला नाहीं. आपण निग्रो असलों तरी युरोपांत फारसा त्रास भोगावा लागत नाहीं, तेथें मुक्तपणें प्रवास करतां येतो व करतांना मुद्दाम कोणी आपल्याला बाजूला काढीत नाहीं, असें मनोगत त्यानें आपल्या मित्राजवळ व्यक्त केलें होतें. जर ग्रामीण भागांतील दृश्यें रंगवायचीं असतील तर तो काळा आहे म्हणून खाणावळींत वास्तव्य करण्यास वा भोजन करण्यास त्याला कांहीं आडकाठी येत नव्हती. म्हणून इरा ऑल्ड्रिज या नटाप्रमाणें त्याचेंहि जीवन युरोपांतच विकसित झालें. मृत्यु येईपर्यंत तो पॅरिसमध्येंच वास्तव्य करून राहिला. त्याच्या सुंदर स्टुडिओंत अनेक जण येत. त्या काळचे कांहीं नामवंत कलावंत त्याचे मित्र बनले होते. त्याच्या चित्रांना चांगला मोबदला मिळत होता.

धार्मिक चित्रकृतींच्या क्षेत्रांत टॅनरचें कौशल्य विशेष होतें व त्याची कीर्ति त्यावरच मुख्यतः आधारलेली आहे. बायबलमधील गोष्टींतील त्यानें

नाट्यपूर्ण पविञ्यांत काढलेलीं चित्रें अतिशय जिवंत वाटत. परमेश्वराचें अस्तित्व तो प्रकाशयोजनेच्या द्वारें दाखवी. गूढवाद व वास्तववाद यांचा तो मिलाफ करी. या सर्वांचा लोकांच्या मनावर गाढ परिणाम होत असे. त्याच्या शैलीवर अभ्यासपूर्णतेचा ठसा होता; पण कलाकृति पाहूं जातां ती अतिशय नैसर्गिक दिसे. सर्वसाधारण माणसाला ही कलाकृति कळण्यास कठीण जात नसे. त्यांत तांत्रिक कौशल्य भरपूर होतें आणि कारागिरीमुळें एक प्रकारचें वजन येई. यामुळें समकालीन कलावंतांकडून त्यास मान्यता मिळाली होती. पाण्यावर चालणारा खिस्त, बेथानीच्या मार्गावरील शिष्य, इजिप्तकडे पलायन, इत्यादि धर्मग्रंथांतील विषयांवरील त्याच्या कलाकृति लोकांना अत्यंत आवडतात. फिलाडेल्फिया येथील फेअरमॉन्ट बागेंत, जेथें चित्रकार होण्याचा टॅनरनें प्रथम निर्धार केला तेथून जवळच असलेल्या स्मारकगृहांत त्याचें ‘ दि ॲनन्सिएशन ’ हें प्रसिद्ध चित्र लावलेलें आहे.

*कृषि-रसायन-शास्त्रज्ञ*

# जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर

१८६४ : : १९४३

---

बुकर टी. वॉशिंग्टननें सर्वांत मोठी जर कोणती गोष्ट केली असेल तर ती टस्केजी येथें जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर याची शिक्षक म्हणून नेमणूक होय. वॉशिंग्टनप्रमाणेंच कार्व्हरचा जन्म गुलामगिरींत झाला होता. त्याच्या जन्मानंतर मिसुरींतील डायमंड ग्रोव्हच्या शेतानजिक त्याचा बाप गाडीखालीं सांपडून ठार झाला. जॉर्ज वर्षाचा होतो न होतो तोंच रात्रीं छापा घालून गुलामांना दूर प्रदेशांत पळवून नेऊन विकणारे कांहीं टोळीवाले एका रात्रीं त्याच्या आईच्या खोलीला गराडा घालून उभे राहिले. जॉर्जचा मोठा भाऊ पळून गेला, पण जॉर्जला व त्याच्या आईला घोड्यावर बांधण्यांत आलें. आझार्थ डोंगर ओलांडून त्यांना अर्कान्सास येथें नेण्यांत आलें. त्याच्या आईचें पुढें काय झालें, हें कोणालाहि माहीत नाहीं. पण त्यांचा मालक मोझेस कार्व्हर यानें त्या दोघांना ज्यानें ताब्यांत ठेवलें होतें, त्याच्याकडे एक दूत पाठवून दिला. पैसे नसल्यामुळें हा मुलगा सांपडला तर घोडा देण्याचें व त्याची आई सांपडली तर कांहीं जमीन देण्याचें आश्वासन कार्व्हरनें या दूतास दिलें होतें. लहान जॉर्जला डांग्या खोकला जडला होता, म्हणून

टोळीवाल्यांनीं त्यास रस्त्यांतच टाकून दिलें व त्याच्या आईला घेऊन ते पुढें निघून गेले. ती मात्र परत कोठें दिसली नाहीं. या दूताला हें मूल दिसलें व त्यानें तें परत मालकाकडे आणून दिलें. मालकानें दूताला मूल परत आणण्याबद्दल घोडा दिला व आश्वासन पुरें केलें.

कार्व्हर कुटुंबानें छोट्या जॉर्जला ठेवून घेतलें व स्वतःचें नांव त्यास दिलें. हे लोक दयाशील होते. त्यांच्याजवळ इतर कोणी गुलाम नव्हते आणि त्यांना मूलबाळहि नव्हतें; म्हणून मग त्यांनीं जॉर्ज व त्याच्या भावास स्वतःचे मुलगे म्हणून वाढविण्यास सुरुवात केली. यादवी युद्ध संपल्यानंतर गुलामगिरीचा अंत झाला, पण हे दोन्ही मुलगे कार्व्हर यांच्याकडेच राहिले. मोठा भाऊ काम करीत असतां छोटा जॉर्ज आसपासच्या शेतांतून व जंगलांतून भरपूर फिरत असे. मिसेस कार्व्हरसाठीं तो वारंवार एखादें रोपटें आणी. तें कोणतें रोपटें आहे, त्याचे गुणधर्म काय, हें जाणण्यास तो उत्सुक असे. निरनिराळ्या फुलांच्या पाकळ्यांचा रंग वेगवेगळा कां असतो, पानें निरनिराळ्या आकाराचीं कां असतात, मधमाश्यांना विशिष्ट प्रकारचें गवत कां आवडतें, किंवा दवबिंदु कां चमकतात, असे प्रश्न त्याला पडत. सर्व-साधारण मुलांपेक्षां त्याची जिज्ञासाबुद्धि वेगळ्या प्रकारची होती. कार्व्हर पतिपत्नी कांहीं सुशिक्षित नव्हतीं; पण तीं त्याच्या प्रश्नांना त्यांच्या ज्ञाना-प्रमाणें उत्तरें देत. त्याची बुद्धि पाहून त्यांनीं त्याला धुळाक्षरांचा तक्ता आणून दिला. रात्रीं तो व त्याचा भाऊ हा तक्ता घेऊन बसत असत. परंतु दिवसां तो बाहेरच एकटा भटकत राही. या वाढणाऱ्या वनस्पतींच्या अक्षरशः मुळाशीं जाण्याचा प्रयत्न तो करीत होता. धान्याच्या बीमधून झाड कसें उगवतें आणि सूर्यफुलाच्या बीपासून फूल कां उगवतें, याचा शोध तो घेत होता. रोगट रोपट्यांना संजीवन देण्याचा प्रयत्न तो करी. आपल्या छोट्या हातांत मातीचीं ढेकळें घेतलीं कीं त्याला आनंद होत असे. बऱ्याच वर्षांनंतर त्यानें असे उद्‌गार काढले कीं, "लोक जेव्हां मुलांना मातीपासून बाजूस राहण्यास शिकवितात, तेव्हां ते त्यांची हत्या करीत असतात. घाणींतच जीवन आहे."

जॉर्ज दहा वर्षांचा असतां त्याच्या भावानें शेतावरील काम सोडून इतरत्र काम पाहण्यास जाण्याचा निश्चय केला. त्याचा भाऊ निघून गेल्यावर

हा मुलगा अगदींच एकाकी पडला. कार्व्हर कुटुंबाला मदत करतांना तो गुंतलेला असे; एरवीं तो एकाकी होता. मिसेस कार्व्हरनें त्यास पाकशास्त्र, स्वच्छता, इतकेंच नव्हे तर शिवणकामहि शिकविलें. हिंवाळ्यांत तो शेकोटी करण्यास शिकला व साबू कसा तयार करावा, हेंहि शिकला. वसंत ऋतूंत झाडाची तोड करावी व औषधें तयार करण्यासाठीं निरनिराळ्या वनस्पति जमवाव्या, असा त्याचा उद्योग होता. भांडीं वा लोकर तयार करण्याच्या कामींहि तो मदत करी. पादत्राणांसाठीं लागणारें कातडें कमाविण्यांत किंवा रंग तयार करण्यास त्याची मदत होत असे. या वेळेपर्यंत त्यानें पहिल्या पुस्तकांतील शब्द घोकले होते. आठ-दहा मैलांवर निओशा येथें काळ्या मुलांसाठीं शाळा आहे, हेंहि त्याच्या कानावर आलें होतें. त्या शाळेंत जाण्याची परवानगी त्यानें कार्व्हर कुटुंबाजवळ मागितली व त्यांनीं ती दिलीहि. निओशापर्यंत तो चालत गेला. मारिया वॉटकिन्स या एका काळ्या धट्टयाकट्टया स्त्रीनें त्याला आश्रय दिला आणि राहण्या-जेवण्याचा खर्च भागावा म्हणून त्याला काम दिलें. ती त्याच्यावर मातेप्रमाणें प्रेम करी. त्यामुळें त्याच्या आयुष्यांतला हा काळ अतिशय आनंदाचा ठरला. एका खोलींत इतर सत्तर-एक मुलांबरोबर लाकडी बाकावर बसून एकाच शिक्षका-कडून धडे घ्यावयाला मिळत, त्यामुळें त्याला विशेष सुख वाटत होतें.

मारिया वॉटकिन्स ही धोबी काम करीत होती. तिनें त्याला कपडे धुणें, इस्त्री करणें वगैरे कामें शिकवलीं. पुढील जीवनांत त्याला याबद्दल कृतज्ञता वाटत असे. मारिया वॉटकिन्सनें त्याला बायबल दिलें होतें व ती त्याची एक अमोल ठेव बनली होती. निओशा येथें हायस्कूल नव्हतें, तेव्हां तो सुमारें तेरा वर्षांचा झाल्यावर कान्सास येथें गाडींतून गेला. तेथें फोर्ट स्कॉट येथील हायस्कूलमध्यें त्यानें नांव दाखल केलें. गांवांतील एका अत्यंत श्रीमन्त कुटुंबांत तो नोकर म्हणून कामहि करीत असे. एकदां त्याच्या मालकानें त्याला शहरांत औषधांच्या दुकानांत औषध आणण्यासाठीं पाठविलें. रस्त्यांत एका ठिकाणीं गोरे लोक जमाव करून पळत असल्याचें त्यानें पाहिलें. या लोकांनीं तुरुंगावर हल्ला केला; आणि एका गरीब व निराश्रित निग्रो मुलाला तुरुंगांतून बाहेर काढून त्यांनीं त्याला रस्त्यावर खेचलें व मरेपर्यंत बेदम मारलें. तेवढ्यांत रस्त्यावरच्या चौकांत कांहीं लोकांनीं व

मुलांनीं शेकोटी पेटविली आणि रक्तबंबाळ व मृत्तवत् झालेल्या त्या निग्रो मुलाला त्यांनीं त्या शेकोटींत टाकून दिलें. कार्व्हरनें तें दृश्य पाहिलें तेव्हां भीतीनें त्याचें हृदय बंद पडण्याची वेळ आली व पोटांत कळा मारूं लागल्या. त्या रात्रीं आपल्याजवळील चीजवस्तु त्यानें गुंडाळल्या व त्या घेऊन त्यानें तें शहर सोडलें.

नंतर जवळ जवळ दहा वर्षें तो पश्चिम प्रदेशांत या गांवांतून त्या गांवांत असा फिरत राहिला. गव्हाच्या पिकाची कापणी, लाकूडतोडी, बागकाम, स्वयंपाक अशीं विविध प्रकारचीं कामें तो करीत असे. कधीं गवताच्या गंजीवर, तर कधीं कोठल्या शेडमध्यें, तर कधीं तबेल्यांत तो झोप घेई. जेव्हां जमेल तेव्हां झाडें, फुलझाडें वाढविण्याचें काम तो करीत राही. पण फुलझाडें वाढविण्यासाठीं त्याची स्वतःची कांहीं बाग नव्हती. तेव्हां इतरांच्या बागेंतील फुलें पाहून तो त्यांचीं चित्रें काढून ठेवी. कान्सासमधील मिनिऑपॉलीस येथें तो आपलें हायस्कूलमधील शिक्षण पुरें करण्यासाठीं कांहीं काळ राहिला होता. तेथें एका स्त्रीनें तिच्या धोबिणीच्या घरीं भिंतीवर त्याचीं चित्रें पाहिलीं व तिला तीं आवडलीं म्हणून ही कला वाढविण्यास तिनें त्याला सांगितलें. या वेळपर्यंत तो तारुण्यांत आला होता. तो उंच होता आणि हाडकुळा होता. बरेच श्रम व खाण्यापिण्याचे हाल यामुळें तो कांहींसा वाकून चाले. फुलांबद्दलची त्याची जिज्ञासा मात्र कमी झाली नव्हती व म्हणून तो चित्रें काढीतच होता. आतां त्याला वनस्पतिशास्त्र शिकण्याची इच्छा निर्माण झाली होती.

एक दिवस कान्सासमधील ओलान्थ येथील एका धार्मिक कॉलेजची जाहिरात त्यानें एका वृत्तपत्रांत वाचली. त्यानें आपल्या शाळेंतील प्रगति-पुस्तक या कॉलेजकडे धाडलें, तेव्हां त्याच्या अभ्यासांतील नैपुण्याबद्दल त्याला धन्यवाद मिळाले व त्याचें नांव कॉलेजांत दाखल करण्यांत आल्याचेंहि त्यास चालकांतर्फे कळविण्यांत आलें. तेव्हां तो त्या शहरीं शिक्षण पुढें चाल-विण्यासाठीं गेला. पण जेव्हां तो कॉलेजच्या कचेरींत आपलें नांव नोंदण्या-साठीं गेला तेव्हां प्राध्यापक त्याच्याकडे आश्चर्यानें पाहतच राहिला; आणि म्हणाला, "आम्ही निग्रोंना या कॉलेजांत प्रवेश देत नाहीं!" त्यानें कार्व्हरचें नांव कॉलेजांत दाखल करून घेतलें नाहीं. तेव्हां मग निराश

झालेला हा तरुण पश्चिमेकडील या प्रदेशांत बराच फिरला व अखेरीस सरकारनें नुकत्याच वाटलेल्या जमिनींपैकीं एका शेतावर तो राहूं लागला. ती जमीन त्यानें घेतली होती, तिची लागवड करण्यासाठीं साधनसामुग्री हवी होती; पण त्यासाठीं त्याच्याजवळ पैसे नव्हते. जमिनीचा साराहि भरण्यासाठीं त्याच्याजवळ कांहीं नव्हतें. तेव्हां त्याला ती जमीन परत करावी लागली. त्याचें वय आतां पंचवीसच्या पलीकडे गेलें होतें; परंतु तरीहि आपलें शिक्षण पुरें करण्याचा निर्धार त्यानें केला होता. शेवटीं आयोवामधील सिम्प्सन कॉलेजांत त्याला प्रवेश मिळाला. तो जेव्हां कॉलेजमध्यें आला, तेव्हां दारिद्र्याचें गांठोडें त्याच्याजवळ होतें, पण ज्ञानाची भयंकर तृष्णा त्याला लागलेली होती, असें वर्णन त्याच्या एका शिक्षकानें नंतर केलें आहे.

प्रवेश-फी दिल्यानंतर कार्व्हरजवळ फक्त दहा सेंट्स् शिल्लक राहिले. त्यांतून त्यानें आठवड्याला कसेंबसें पोट भरतां येईल एवढे खाद्यपदार्थ विकत घेतले. पत्र्याचीं दोन मोठी घमेलीं, साबू, नीळ, धुण्याचा फळा वगैरे वस्तु त्यानें दुकानदाराकडून कशाबशा उधार मिळविल्या. आपण आतां लॉन्ड्री चालविणार, असें नंतर त्यानें आपल्या सहाध्यायी विद्यार्थ्यांना सांगितलें. मारिया वॉटकिन्सनें त्याला धोबीकाम शिकविलें होतें, त्याचा उपयोग करून कॉलेज-शिक्षणाचा पहिल्या वर्षांचा खर्च त्यानें भागविला. त्याचा आवाजहि चांगला होता व पियानो आणि ऑर्गन त्याला वाजवितां येत होतें. म्हणून तो विज्ञानाचे धडे घेत होता, त्याचप्रमाणें संगीताचेहि घेत होता. त्याला चित्रकलेची आवड असल्यानें तेंहि शिक्षण त्यानें घेतलें. चित्रकलेच्या या शिक्षणानें त्याला पुढील उच्च शिक्षण घेण्याचा मार्ग मोकळा झाला. त्याला वनस्पति व माती यांविषयीं विशेष आस्था आहे, असें चित्रकला शिकविणाऱ्या त्याच्या अध्यापिकेला आढळलें. तेव्हां तिनें एम्स येथील आयोवा स्टेट कॉलेजमध्यें वनस्पतिशास्त्राचें शिक्षण देणाऱ्या आपल्या भावाला त्याच्याविषयीं पत्र लिहिलें. या कॉलेजांत शेतीचें शिक्षण देणारें खास खातें आहे. या प्राध्यापकामुळें या कॉलेजांत कार्व्हरला प्रवेश मिळाला. या संस्थेंतून पदवी घेऊन बाहेर पडणारा तोच पहिला निग्रो होय.

परंतु आयोवा येथें निग्रो विद्यार्थी तुरळक असत व तेथेंहि जीवन मोठें सुखकारक नव्हतें. हॉस्टेलमध्यें त्याला झोंपण्यासाठी परवानगी मिळाली

नाहीं. जेव्हां विद्यार्थ्यांच्या भोजनगृहांत तो गेला, तेव्हां त्याला बाहेर हाकलण्यांत आलें. पण हताश न होण्याचें त्यानें ठरविलेंच होतें. म्हणून त्यानें वेटरचें काम धरलें. त्यामुळें त्याला स्वयंपाकघरांत बसून मोफत शिक्षण घेतां येत असे. कांहीं दयाळू विद्यार्थ्यांना व प्राध्यापकांना त्याला पैसे वा कपडे वगैरे देऊन मदत करावी असें वाटे; पण कोणाकडूनहि धर्मादाय म्हणून कांहींहि घेण्यास तो तयार नसे. कोणीं कांहीं देऊं केलें कीं त्याची परतफेड करण्याचा त्याचा नेहमींच आग्रह असे. त्याला वनस्पतीं-बद्दल प्रेम होतें, तसेंच चित्रकलेबद्दल होतें. आणि आयोवा राज्य चित्रकला-प्रदर्शनांत त्याच्या चित्रांना अनेक बक्षिसें मिळालीं. त्याची चार चित्रें शिकागो येथें भरलेल्या जागतिक प्रदर्शनांत पाठविण्यांत आलीं होतीं. पदवीसाठीं त्यानें 'मानवानें सुधारलेल्या वनस्पति' या विषयावर प्रबंध लिहिला होता. शिष्यवृत्तीसाठीं घेतलेल्या परीक्षेंत तो त्याच्या वर्गांत पहिला आला. १८९४ मध्यें तो पदवीधर झाला. त्या सुमारास आपल्या सहाध्यायांत तो इतका लोकप्रिय झाला होता कीं, त्याला वर्गाचा कवि म्हणून निवडण्यांत आलें. ज्या भोजनगृहांतून त्याला पहिल्यांदां बाहेर काढण्यांत आलें होतें, तेथेंच पदवीधर झाल्यावर त्याला खाना मिळाला.

पदवी घेतल्यावर जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर आणखी दोन वर्षें एम्स येथें राहिला व त्यानें एम्. ए.ची पदवी मिळवली. ही पदवी मिळाल्यावर वनस्पतिशास्त्राचा दुय्यम अध्यापक म्हणून त्याची नेमणूक झाली. त्या सुमाराला दक्षिणेंतील अनेक निग्रो कॉलेजांकडून त्याला प्राध्यापकाच्या नोकरीसाठीं बोलावणीं येत. तेव्हां एका आमंत्रणाला त्याच्या प्रोफेसरानें असें उत्तर पाठविलें की, "आमच्या नोकरवर्गांतून श्री. कार्व्हर यांना मुक्त करण्याची माझी इच्छा नाहीं. निरनिराळ्या जातींच्या वनस्पतींचीं एकमेकांवर कलमें करण, वनस्पतींचें संगोपन व संवर्धन करणें या बाबतींत तो आमच्या कॉलेजांतील अग्रेसर विद्यार्थी आहे. वनस्पतींवर त्याचें निरतिशय प्रेमच आहे— मग त्या बागेंतील असोत वा आणखी कोठल्या असोत. या बाबतींत त्याची बरोबरी करणारा आमच्याजवळ कोणी नाहीं." परंतु १८९६ मध्यें त्यानें एम्. ए.ची पदवी घेतल्यानंतर थोड्याच दिवसांत आयोवा स्टेट कॉलेजांत बुकर टी. वॉशिंग्टन स्वतः आला व त्यानें जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हरची भेट

घेतली. टस्केजी येथील कॉलेजांत शेतीखातें, शेतीसंशोधन व निसर्गविज्ञान यांचा प्रमुख म्हणून त्यानें यावें, अशी सूचना बुकर टी. नें केली. या जबाबदाऱ्या बऱ्याच होत्या. पण दक्षिणेंतील या वाढत्या संस्थेबद्दल आत्मीयता वाटून कार्व्हर टस्केजीला गेला व अखेरपर्यंत तेथेंच राहिला. तेथेंच त्याला बुकर टी. वॉशिंग्टनप्रमाणें प्रसिद्धि मिळाली.

या दोघांचे स्वभाव वेगवेगळे होते, पण तरीहि त्यांच्यांत साम्यहि तितकेंच होतें. दोघेहि मोठ्या कष्टानें वर चढले होते. दोघांचाहि अंगमेहनतीवर विश्वास होता व ती ते करीत होते. दोघांनाहि भूमीबद्दल आणि प्रत्येक वाढणाऱ्या वस्तूबद्दल विलक्षण आत्मीयता होती. आपण जें शिकलों तें इतरांना देण्याची त्यांना आस्था होती. परंतु जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर हा अतिशय लाजाळू व शांत माणूस होता; तर बुकर टी. वॉशिंग्टन मोठा सार्वजनिक कार्यकर्ता होऊन बसला होता. हजारों श्रोत्यांवर प्रभाव टाकणारा प्रभावी वक्ता आणि शेंकडों लोकांचे प्रश्न हाताळणारा कार्यक्षम प्रशासक म्हणून त्याचें नांव झालें होतें. कॉर्व्हरला एकांतांत काम करणें व नतर आपलें कार्य जगासमोर ठेवणें आवडे. टस्केजी येथील कॉलेजच्या प्रिन्सिपॉलनें हें ओळखलें व म्हणून त्यानें त्याला प्रयोग करण्यासाठीं खास रसायनशाळा व झोपण्यासाठीं खोली दिली. मग या रसायनशाळेंत काम करावें व दुसऱ्या खोलींत रहावें, असा त्याचा जीवनक्रम अखेरपर्यंत चालू होता. मारिया वॉटकिन्सनें त्याला दिलेलें बायबल येथेंहि त्याच्याबरोबर होतें व त्याच्या बिछान्याजवळील टेबलावर तें असे. कॉलेजची अभ्यासाचीं पुस्तकेंहि त्याच्याबरोबर होतीं. परंतु कार्व्हर जेव्हां त्याच्या प्रयोगशाळेंत काम करी, तेव्हां कोणतेंहि पुस्तक स्वतःजवळ ठेवीत नसे. रोज सकाळीं आपल्या रसायनशाळेच्या पिछाडीस असलेल्या जंगलांत एका ओंडक्यावर तो बसे आणि अध्यात्मचिंतन करी. नंतर वर्ग सुरू होईपर्यंत तो रसायन-शाळेंत काम करीत राही. कार्व्हरच्या या रसायनशाळेंतून बाहेर पडलेल्या शेतीविषयक अनेक रसायनांमुळें व शोधांमुळें दक्षिणेंतील, इतकेंच नव्हे तर सर्व अमेरिकेंतील शेती संपन्न होण्यास कमालीची मदत झाली.

टस्केजी हें कापूस पिकविणाऱ्या प्रदेशांत येतें. तेथें प्रत्येकास आपल्या अगदीं घरापर्यंत कापसाची लागवड करण्याची शिकवण मिळाली आहे.

कपाशीच्या या पिकामुळें जमिनीचा सगळा कस काढून घेतला गेला होता. शिवाय पूर्वीं कापसाला जेवढी किंमत येत होती, तेवढी नंतर राहिली नाहीं. त्यांतच कपाशीचें पीक अत्यंत जोखमीचें आहे. तेव्हां टस्केजीच्या शेतकऱ्यांना इतर पिकें काढण्यास आणि पाळीपाळीनें वेगवेगळीं पिकें काढण्यास शिकविणें अत्यंत आवश्यक होतें. या बाबतींत कार्व्हरची अनमोल मदत झाली. रताळीं, हरबरा हीं पिकें काढण्यांत व त्यांचे निरनिराळे पदार्थ बनाविण्यांत कसा फायदा आहे, हें त्यानें दाखवून दिलें. टस्केजी येथेंच त्यानें त्या भागांतील जमिनींतून मोठ्या प्रमाणावर निघणाऱ्या रताळीं व हरबऱ्याच्या पिकांचा जास्तींत जास्त कसा उपयोग होईल, यासंबंधींचा प्रयोग सुरू केला. मरणापूर्वीं त्यानें हरबऱ्यापासून अनेक वस्तु करतां येतात, हें यशस्वी रीत्या दाखवून दिलें. यांत लिनोलियम, भांड्यांना करावयाचें पॉलिश, वनस्पति दूध, शाई, ग्रीज, स्वयंपाकासाठीं लागणारीं तेलें, निरनिराळे एकोणीस रंग, सॉस, शाम्पू, लोणी व चीज इत्यादींचा अंतर्भाव होतो. याखेरीज हरबऱ्यापासून खाण्याचे १०० पदार्थ करतां येतात, हें त्यानें दाखवून दिलें. सूपपासून सर्व भोजन या पदार्थांचा उपयोग करून करतां येतें.

आपल्या प्रयोगशाळेंत प्रयोग करून रताळ्यांचा उपयोग खळ, कृत्रिम आलें, बूटपॉलिश, दोर, पीठ इत्यादि शेंकडों वस्तु तयार करण्यासाठीं होतो हेंहि त्यानें दाखवून दिलें. कृत्रिम लादी, प्लास्टिक, लिहिण्याचा कागद वगैरे असंख्य पदार्थहि निरनिराळ्या वस्तूंपासून कसे करतां येतात, हें त्यानें आपल्या विद्यार्थ्यांना शिकविलें. तेथल्या मातीपासून अनेक प्रकारचे रंग बनवतां येतात आणि जगांतील सर्व लोकांच्या कापडास वाटेल त्या प्रकारचा रंग यांतून पुरविण्याइतकाहि तो निघूं शकेल असें त्यानें दाखवून दिलें. तुम्ही जेथें असाल तेथें तुम्ही तुमच्या गुणांचा उपयोग करून द्या, हें तत्त्व कार्व्हर शेतीच्या क्षेत्रांतहि अमलांत आणीत होता. आपल्याजवळ जें असेल तें घेऊन आपल्याला जें हवें तें पदरांत पाडून घेणें, हें ध्येय त्यानें आपल्यापुढें ठेवलें. टस्केजीच्या जवळपास असलेल्या वस्तु घेऊन त्यांचे विविध प्रकारचे उपयोग केवळ अल्वादालाच नव्हे तर सर्वत्र होऊं शकतात, हें त्यानें दाखवून दिलें. वाटाण्याबद्दलच्या त्याच्या संशोधनामुळें दाक्षिणेंत लाखों डॉलर्सचे उद्योगधंदे सुरू झाले.

एकदां सीनेटच्या आयव्यय समितीपुढें त्याला बोलावण्यांत आलें. वाटाण्याबद्दलचे प्रयोग त्यानें दहा मिनिटांत सांगावे, असें प्रथम त्याला सांगण्यांत आलें होतें. पण एकदां तो प्रयोग समजावून देऊं लागतांच सीनेटर्सनीं त्यास दोन तास दिले. त्यानें दिलेल्या माहितीमुळें परदेशांची स्पर्धा होऊं नये म्हणून त्यांनीं वाटाण्याच्या आयातीवर जबर कर लादले.

अनेक विद्यापीठांनीं जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हरला सन्माननीय पदव्या बहाल केल्या. रोचेस्टर विद्यापीठानें त्याला ' डॉक्टर ऑफ सायन्स ' ही पदवी दिली व मग तो डॉक्टर कार्व्हर म्हणून ओळखला जाऊं लागला. ब्रिटिश सोसायटी ऑफ आर्ट्‌स्‌नें त्यास फेलो म्हणून नेमलें, तर त्यानें लावलेल्या अनेक शोधांबद्दल स्पिंगार्न पारितोषिकहि त्यास मिळालें. याखेरीज अनेक प्रकारें त्याचा सन्मान झाला. परंतु सार्वजनिक आयुष्यांत त्याला कांहीं रस वाटत नसे आणि रसायनशास्त्र सोडून भाषण करण्यासाठीं त्याचें मनहि नेहमीं वळवतां येत असे असें नाहीं. १९३९ मध्यें अध्यक्ष फ्रॅन्कलीन डी. रूझवेल्ट दौऱ्यावर असतां मुद्दाम टस्केजीला उतरले व त्यांनीं कार्व्हरला धन्यवाद दिले. हेन्री फोर्डनेंहि त्याची टस्केजी येथेंच भेट घेतली व मग ते एकमेकांचे जिवलग मित्र बनले. वर्षाला पन्नास हजार डॉलर्स देण्याचें कबूल करून थॉमस ए. एडिसननें त्याला आपल्या रसायनशाळेंत काम करण्यास बोलाविलें परंतु त्यानें नकार दिला. त्यानें आपल्या शोधासाठीं पेटंट मिळावें म्हणून कधीं अर्ज केला नाहीं. " परमेश्वरानें ते मला दिले आहेत, त्यावर मीं हक्क कां सांगावा ? " असें तो म्हणे. त्याला पैशाची मातब्बरी वाटत नसे आणि टस्केजी येथें त्यानें पगारवाढ मान्य केली नाहीं. अनेकदां पगाराचा चेकहि तो वटवीत नसे. एकदां कोणत्या तरी निधीसाठीं त्याच्याजवळ पैसे मागितले तेव्हां आपल्याजवळ पैसाहि नसल्याचें त्यानें सांगितलें. नंतर खोलीच्या कोपऱ्यांतील चटईखालीं कांहीं पैसे असतील असें त्याला आठवलें. तेथून त्यानें अनेक न वटविलेले चेक बाहेर काढले व तो म्हणाला, " हे घ्या. अजूनहि ते चालतील असं मला वाटतं."

त्याला नवे कपडे घालावे असें कधीं वाटत नसे आणि चांगला पोषाख करून तो कधीं वावरला नाहीं. पण रसायनशाळेंत काम करतांना कपड्यांभोंवतीं गुंडाळण्याचें फडकें दूर केलें कीं तो आपल्या कोटावर

एक गुलाबाचें फूल अडकविण्यास मात्र विसरत नसे. गाण्याप्रमाणेंच त्याचें बोलणेंहि चांगलेंच उच्च स्वरांतील असे. एकाच वेळीं विद्यार्थ्यांपुढें भाषण करणें आणि गाणें ज्याला जमेल असा हा एकच माणूस आहे, असें मत विल रोजर्सनें व्यक्त केलें आहे. चित्रकलेचा त्याचा नाद शेवटपर्यंत चालू होता आणि अनेक वस्तुसंग्रहालयें त्याचीं चित्रें विकत घेण्याचा प्रयत्न करीत. पण त्यानें आपल्या चित्रांची विक्री कधीं केली नाहीं. तथापि बहुतेक वेळां तो तीं शेतकरी व विद्यार्थ्यांना वांटून टाकीत असे. तो म्हातारा झाला तेव्हां कांहींना तो एक विचित्र म्हातारा माणूस आहे असें वाटे. त्याची कीर्ति सर्वांना ठाऊक होती. तेव्हां कीर्ति व हा विचित्रपणा एकत्र करून ते त्याला अलौकिक बुद्धीचा समजत. ‘ रताळ्याचा जादूगार ’ म्हणून तो ओळखला जाई. तसेंच शेतीविषयक रसायनशास्त्रज्ञांतील अग्रेसर म्हणून त्याला मान मिळे. रसायनशास्त्राचा प्रत्यक्ष जीवनांत उपयोग करण्याच्या कामीं त्यानें जेवढे प्रयत्न केले, तेवढे दुसऱ्या कोणींच केले नाहींत. ‘ प्रोग्रेसिव्ह फार्मर ’ या नियतकालिकानें एका वर्षीं दक्षिणेंतील लोकांसाठीं केलेल्या कामगिरीच्या गौरवार्थ ‘ महत्त्वाची व्यक्ति ’ म्हणून कार्व्हरची निवड केली; तेव्हां बहुतेक वृत्तपत्रांनीं हें वृत्त प्रसिद्ध केलें. त्यावर भाष्य करतांना ‘ शेतीच्या बाबतींत वा दक्षिणेंतील प्रगतीबाबत दुसऱ्या कोणीं एवढें कार्य केलें आहे ?’ असा सवाल ‘ न्यूयार्क टाइम्स ’नें विचारला.

कार्व्हरच्या मृत्यूनंतर दहा वर्षांनीं मिसुरी येथें ज्या शेतावर त्याचा जन्म झाला होता, तें अमेरिकन सरकारनें विकत घेतलें आणि १९५३ मध्यें अंतर्गत खात्याच्या मंत्र्यांनीं डॉ. कार्व्हरची स्मृति म्हणून तें राखून ठेवलें असल्याचें जाहीर केलें. त्या वेळेला ‘ न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून ’नें लिहिलें आहे :

“ डॉ. जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर यांचें राष्ट्रीय स्मारक उभें रहावें हें अत्यंत उचित होय. गुलामगिरींतून निघून ते प्रख्यात बनले. मानवजातीवर त्यांनीं किती उपकार केले आहेत, याची गणतीच करतां येणार नाहीं. परंतु केवळ शास्त्रज्ञ म्हणून नव्हे, तर मानवाच्या आत्मिक शक्तीचा एक नमुना म्हणून त्यांची स्मृति नेहमींच कायम राहील.—सर्वांना माहीतच आहे कीं, ते निग्रो होते. परंतु वंशभेदापासून सर्व प्रकारच्या अडथळ्यांवर त्यांनीं मात

केली. निरनिराळ्या वंशांत समझोता होऊन एकमेकांना एकमेकांची ओळख पटण्यासाठीं डॉ. कार्व्हर यांच्या कार्यांचा जेवढा उपयोग झाला आहे, तेवढा या शतकांत क्वचितच कोणाचा झाला असेल. जे शाश्वत गुण आहेत त्यांचा वारसा मिळाल्यानेंच असा मोठेपणा प्राप्त होतो. वाटाणे वा रताळीं यांतील गुणधर्म शोधण्याचेंच कार्य डॉ. कार्व्हर यांनीं केलें नाहीं, तर अमेरिकन लोकांची आत्मिक शक्ति वाढविण्याचेंहि कार्य त्यांनीं केलें आहे.''

*निग्रो 'रॉबर्ट बर्न्स'*

# पॉल लॉरेन्स डनबार

१८७२ : : १९०६

---

पॉल लॉरेन्स डनबारचा बाप कॅनडांत 'भूमिगत रेल्वे'नें पळून आलेला गुलाम होता, पण यादवी युद्धांत लढण्यासाठीं तो एक सैनिक म्हणून दाखल झाला होता. केन्टुस्की येथें गुलामाचें जीवन जगणाऱ्या एका स्त्रीशीं त्यानें विवाह केला होता. यादवी युद्ध संपल्यावर सात वर्षांनंतर ओहियोंत डेटन येथें त्यांना एक मुलगा झाला. "हा मुलगा पुढें मोठा नामवंत होणार आहे, तेव्हां बायबलमधील सेंट पॉलचें नांव आपण त्यास ठेवूं" असें त्याचा बाप म्हणाला. पण बाप हें पाहण्यास कांहीं जिवंत राहिला नाहीं. पॉल बारा वर्षांचा असतांना त्याचा बाप वारला; तथापि त्याचें भाकीत मात्र खरें ठरलें. पॉल लॉरेन्स डनबार पुढें खरोखरच मोठा माणूस झाला.

पॉलचा जन्म झाला तेव्हां त्याच्या आईला वाचतां येत नव्हतें, पण नंतर ती वाचायला शिकली आणि पॉल मोठा होतांच त्याला तिनें शाळेंत धाडलें. विधवा झाल्यावर तिला उपजीविकेचें साधन पाहावें लागलें तेव्हां तिनें धुलाई व इस्त्रीचें काम पत्करलें. पॉल दर आठवड्यास ग्राहकांकडे

जाई, त्यांचे मळलेले कपडे घेऊन येई आणि धुतलेले पोंचते करी. रात्रीं हीं दोघें अभ्यास करीत. पॉल आपल्या आईला लिहा-वाचायला मदत करीत असे. परंतु तिला बरेंच काम पडत असे, तेव्हां तिला यांत विशेष प्रगति करतां आली नाहीं. नंतर जेव्हां तिचा मुलगा मोठा झाला व दुसऱ्या शहरांत राहूं लागला, तेव्हां एकदां तिचा एक शेजारी तिच्याशीं बोलण्यासाठीं थांबला असतां ती म्हणाली, "मला हें धुण्याचें काम लवकर आटोपलें पाहिजे; कारण नंतर कामाचें ओझें मला उचलायचें आहे."

त्या शेजाऱ्यानें विचारलें, "तुला काय काम आहे?"

"मला माझ्या मुलाला पत्र लिहावयाचें आहे." तिनें उत्तर दिलें.

हायस्कूलमधील शिक्षणक्रम पुरा झाला तेव्हां पॉल हा वाङ्मय-मंडळाचा अध्यक्ष असल्यानें त्याला गाणें लिहिण्यास सांगण्यांत आलें. त्या वर्गांत तो एकटाच निग्रो विद्यार्थी होता. सात वर्षांपासूनच तो छोट्या छोट्या कविता करी. हायस्कूलमध्येंहि तो कविता करीत होता व शाळेच्या नियतकालिकाचा संपादक होता. तो तेरा वर्षांचा असतांना ईस्टरच्या सणाच्या कार्यक्रमांत त्यानें स्वरचित कविता म्हणून दाखविली. 'डेटन हेरल्ड'मध्यें त्याची पहिली कविता छापून आली तेव्हां तो सोळा वर्षांचा होता. पॉलच्या या काव्यशक्तीचें त्याच्या एका शिक्षिकेला भारी कौतुक वाटे. म्हणून शाळेचा अभ्यासक्रम संपविल्यावर डेटन येथें वेस्टर्न असोसिएशन ऑफ रायटर्स या संस्थेची बैठक झाली, तेव्हां तिनें पॉलला स्वागतपर गीत रचण्यास सांगितलें व त्याला स्वतःच तें गायला लावलें. त्या वेळेला मेन स्ट्रीटवरील काल्लाहान इमारतींत तो लिफ्टमनचें काम आठवड्याला चार डॉलर्स मजुरी घेऊन करीत होता. त्यामुळें या बैठकीला हजर राहण्यासाठीं त्याला कांहीं तासांची सुटी मागावी लागली. या बैठकीला जमलेल्या लेखकांनीं जेव्हां एक निग्रो तरुण व्यासपीठावर चढून काव्यांत आपलें स्वागत करीत असल्याचें पाहिलें, तेव्हां त्यांना आश्चर्य वाटलें. त्याच्या काव्यावर ते बेहद्द खूष झाले आणि बैठक संपल्यावर त्याची गांठ घेण्याचा अनेकांनीं प्रयत्न केला. त्या सभागृहांत जमलेल्या कुणालाच पॉल आढळला नाहीं; कारण तो आपलें काम करण्यास रुजू

झाला होता. परंतु कांहीं लेखकांना तो लिफ्ट चालवितांना आढळला तेव्हां त्यांनीं त्याचें अभिनंदन केलें.

एक पुस्तक निघूं शकेल एवढ्या कविता जमल्याची त्याची खात्री झाली तेव्हां त्यानें हस्तलिखित तयार केलें व डेटन येथील एका प्रकाशन-संस्थेंत तो गेला. कविता-प्रकाशन हें फायदेशीर नाहीं, तो आंतबट्ट्याचा व्यवहार आहे, म्हणून 'प्रकाशनाचा खर्च करण्याची तयारी आहे काय?' अशी पृच्छा त्याच्याजवळ करण्यांत आली. हा खर्च १२५ डॉलर्सच्या घरांत जाणार होता. पॉलजवळ एक डॉलरसुद्धां नव्हता. म्हणून निराश होऊन तो परत फिरण्याच्या बेतांत होता. पण तेवढ्यांत ज्या व्यवस्थापकानें त्याच्या काव्यशक्तीबद्दलची ख्याति ऐकली होती, त्यानें त्याला बोलाविलें. शेवटीं पहिली आवृत्ति खपल्यानें जे पैसे मिळतील त्यांतून परतफेड करण्याच्या बोलीवर या व्यवस्थापकानें पुस्तक-प्रकाशनाचा खर्च करण्यास अनुमति दिली. पॉलनें तसें आश्वासन दिलें व आपलें हस्तलिखित त्यानें त्यास दिलें. मग १८९३ च्या नाताळांत त्याचा 'ओक अॅन्ड आय्व्ही' हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. त्याच्या लिफ्टमधून जाणाऱ्या-येणाऱ्या लोकांना त्यानें एका डॉलरला एक याप्रमाणें प्रती विकण्यास सुरुवात केली व दोन आठवड्यांत प्रकाशनाचा खर्च भागेल एवढी रक्कम जमा केली. पुढें आफ्रिकन मेथॉडिस्ट चर्चचा बिशप झालेल्या रेव्हरंड आर्. सी. रॅन्समनें आपल्या रविवारच्या प्रार्थनेच्या वेळीं शंभर प्रती विकल्या.

त्या वर्षीं शिकागो येथें वर्ल्ड्स् कोलंबियन एक्स्पोझिशन भरलें होतें व फ्रेडरिक डग्लस उद्घाटनासाठीं आला होता. चांगली नोकरी मिळवण्याच्या उद्देशानें पॉलहि शिकागोला गेला होता. डग्लसनें त्याला आपला एक सहाय्यक नेमून आठवड्याला पांच डॉलर देण्याचें कबूल केलें. कलर्ड अमेरिकन डे (अमेरिकन निग्रो दिना) च्या समारंभांत डग्लस व पॉल एकाच व्यासपीठावर आले. एक्स्पोझिशन संपल्यावर पॉल डेटनला परतला व कोर्ट हाउसमध्यें शिपायाचें काम करूं लागला. जेम्स व्हिटकॉम्ब रिले यांनीं त्याच्या काव्याबद्दल ऐकलें होतें व म्हणून त्यांनीं त्याला



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
22780 वि:
क्रमांक २९८ नों: दि:

उत्तेजनार्थ एक पत्र लिहिलें. स्वरचित कविता गाऊन दाखविण्याबद्दल पॉलची डेटन व आसपासच्या गांवांत कीर्ति झाली होती. तेव्हां वेड्यांच्या हॉस्पिटलचे प्रमुख डॉ. एच्. ए. टोबे यांनीं टोलेडो येथें त्याचा कार्यक्रम ठरविला. या कार्यक्रमाच्या यशामुळें त्याला अनेक मित्र लाभले व त्यांच्यामुळें १८९५ मध्यें टोलेडो येथें त्याचा 'मेजर्स अॅन्ड मायनर्स' हा दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला. पॉलच्या चोविसाव्या वाढदिवशीं या काव्यसंग्रहाचें एक पानभर परीक्षण 'हार्पर्स विकली' या फार मोठा प्रसार असलेल्या नियतकालिकांत प्रसिद्ध झालें. त्या वेळचा प्रसिद्ध लेखक विल्यम डीन हॉवेल्स यानें तें परीक्षण लिहिलें होतें. या परीक्षणामुळें पॉल लॉरेन्स डनबार एका दिवसांत सर्व अमेरिकेबाहेर माहीत झाला. हा लेख प्रसिद्ध झाला तेव्हां पॉल व त्याची आई घर सोडून कांहीं दिवस दूर राहण्यास गेलीं होतीं. हीं दोघें घरीं परतलीं तेव्हां खिडकींत पोस्टमननें दोनशेंच्यावर पत्रें टाकलेलीं त्यांना आढळलीं. त्यांत त्याच्या नव्या पुस्तकासाठीं आलेल्या मनी-ऑर्डरीहि होत्या.

त्यानंतर ठिकठिकाणाहून त्याला काव्यगायनासाठीं आमंत्रणें येऊं लागलीं. त्याच्या आईबापाप्रमाणें नव्यानें स्वतंत्र झालेल्या गुलामांच्या तोंडीं एक विशिष्ट प्रकारची भाषा होती. पॉलच्या कवितेंत त्यांतील अनेक शब्द येत. डनबार या कवितांचें वाचन चांगल्या प्रकारें करीत असे. कांहीं वेळां तो अभिनयसुद्धां करी. 'The Cornstalk Fiddle' या कवितेंतील

"Take your lady and valance down the middle
To the merry strains of the Cornstalk Fiddle .."

या ओळी म्हणतांना तो जुन्या काळांतील एक लोकनृत्य करून दाखवी. श्रोते त्याच्यावर खूष असत. लवकरच त्याचे कार्यक्रम ठरविण्यासाठीं त्याला एक व्यवस्थापक नेमावा लागला. न्यूयॉर्कमध्यें या व्यवस्थापकानें पॉलची 'डॉड, मीड अॅन्ड कंपनी'च्या चालकाशीं गांठ घालून दिली. या प्रख्यात प्रकाशन-संस्थेनें १८९६ मध्यें त्याचा काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. मोठ्या व खऱ्या अर्थाच्या प्रकाशन-संस्थेनें प्रसिद्ध केलेला त्याचा हा पहिलाच काव्यसंग्रह होय. या संग्रहाचें नांव 'लिरिक्स ऑफ् लोन्ली लाइफ्' असें आहे.

त्याला विल्यम डीन हॉवेल्सनें प्रस्तावना लिहिली. पुढील वर्षी व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहण-समारंभाच्या रौप्यमहोत्सव-प्रसंगीं काव्यगायन करण्यासाठीं डनबार लंडन येथें गेला. तेथें त्याचें स्वागत चांगलें झालें, पण त्याच्या व्यवस्थापकानें जवळ जवळ सर्व पैसा गडप केला. त्यामुळें अमेरिकेंतील आपल्या मित्रांना तारा करून त्याला प्रवासखर्चाकरितां पैसे मागवावे लागले.

तो अतिशय कष्टाळू होता व म्हणून लंडनमध्यें असतांना इकडे तिकडे भटकण्यांत वेळ न घालवितां त्यानें 'दि अन्कॉल्ड' ही आपलीं कादंबरी लिहून पुरी केली आणि एका मासिकास ती क्रमशः प्रसिद्ध करण्यास दिली. पुस्तकरूपानें ती प्रसिद्ध व्हावयाचें ठरलें. इंग्लंडमधील अमेरिकन वकील जॉन हे यांनीं पॉलसाठीं लंडन येथें एक कार्यक्रम ठेवला. त्या वेळीं पॉलची व अनेक प्रतिष्ठित लोकांची गांठ पडली. शंभर वर्षांपूर्वी फिलीस व्हिटले या निग्रो कवयित्रीचें ब्रिटिशांनीं स्वागत केलें होतें, तसेंच डेटनच्या या निग्रो कवीचेंहि त्यांनीं स्वागत केलें. त्याच्यासाठीं खान्याचे व चहापानाचे समारंभ झाले. रॉयल जिऑलॉजिकल सोसायटीच्या चिटणिसांचा तो एकदां पाहुणाहि होता. त्या काळीं बरेच ब्रिटिश एका कांचेची आरशी (मोनॉकल) वापरीत. तेव्हां पॉलनें स्वगृहीं पाठविलेल्या एका पत्रांत लिहिलें कीं, "येथें या बिचाऱ्या लोकांना पुरतील एवढ्या चष्म्याच्या कांचा नाहींत, म्हणून ते एकच कांच आपल्या डोळ्यांना लावतात."

लंडनला येण्यापूर्वी तो एका सुंदर मुलीच्या प्रेमांत पडला होता. त्याला बोटीवर निरोप देण्यासाठीं ती न्यू ऑर्लियॅन्सहून पळून आली होती. तेव्हां अमेरिकेला परतल्यावर त्याला तिच्याशीं विवाह करावयाचा होता. म्हणून एका ठिकाणीं स्थायिक होऊन नोकरी करण्याचा विचार त्यानें केला. कर्नल रॉबर्ट जी. इंगरसॉल यांच्या साहाय्यानें त्याला वॉशिंग्टन येथें अमेरिकन कॉंग्रेसच्या ग्रंथालयांत वर्षाला ७५० डॉलर्स या पगारावर नोकरी मिळाली. तेथें पहिल्या कांहीं महिन्यांत त्यानें 'कॉस्मॉपॉलिटन'साठीं गोष्टी लिहिल्या व पुढें त्या 'फोकस फ्रॉम डिक्सि' या नांवानें संग्रहरूपानें प्रसिद्ध झाल्या. टोलेडो येथील ज्या डॉक्टरनें त्याला प्रत्यक्ष साहाय्य केलें होतें, त्याला त्यानें हा संग्रह अर्पण केला आहे. वॉशिंग्टन येथें त्याचा थाटानें

विवाह झाला व मग हीं पतिपत्नी एक घर विकत घेण्याचा विचार करूं लागलीं. कदाचित् त्या वेळेलाच त्यानें लिहिलें असावें :

A little dreaming by the way
A little toiling day by day
A little pain, a little strife
A little joy—and that is life.
A little short-lived summer's morn
When joy seems, all so newly born
When one day's sky is blue above
And one bird sings—and that is love.

[ रोजच्या रोज थोडीं स्वप्नें पहावीं, रोजच्या रोज श्रम करावेत, थोडा त्रास सहन करावा, थोडा झगडा करावा आणि मग थोडा आनंद उपभोगावा, यालाच जीवन म्हणतात. अल्पकाळ टिकलेल्या वसंतांतील सकाळच्या वेळीं आनंद जणूं नव्यानेंच जन्म घेत आहे असें वाटतें. आकाश निळें असतें व एकच पक्षी गात असतो आणि यालाच प्रेम म्हणतात. ]

कांहीं महिने तीं दोघें मोठ्या सुखांत होतीं; पण कांहीं महिनेच. नंतर पॉलची प्रकृति बिघडली व त्याला सारखा खोकला येऊं लागला. ग्रंथालयांतील पुस्तकांवरील धुळीमुळें खोकला येत असावा असा प्रथम त्यानें तर्क बांधला; पण थोड्याच दिवसांत आपल्याला क्षय लागला आहे, हें डनबारला कळून आलें.

प्रकृति बिघडल्यामुळें त्याला कॉंग्रेसच्या ग्रंथालयांतील नोकरीचा राजीनामा द्यावा लागला; आणि नंतर आठ वर्षें तो या दुखण्याशीं झगडत होता. कांहीं काळ असा जायचा कीं, त्याच्या हातून कांहींसुद्धां लिखाण होत नसे. तर कांहीं काळ बरेंच लिखाण त्याच्याकडून होई. त्याचीं गद्य व पद्य पुस्तकें बरींच प्रसिद्ध झालीं. अनेक शहरांतून त्याचें काव्यवाचन झालें. बुकर टी. वॉशिंग्टनच्या आमंत्रणावरून त्यानें टस्केजीला बऱ्याच वेळां भेट दिली आणि तेथें विद्यार्थ्यांपुढें भाषणेंहि केलीं. शेतकऱ्यांच्या वार्षिक परिषदेसाठीं एक कविता लिहिण्याची विनंती बुकर टी. नें पॉलला केली.

त्यानें त्याप्रमाणें कविता केली व जमलेल्या शेतकऱ्यांपुढें ती वाचून दाखविली. टस्केजी विद्यालयाच्या पंचविसाव्या वाढदिवसानिमित्त त्यानें कविता रचली :

The fields smile to greet us, the forests are glad,
The ring of anvil and hoe
have a music as thrilling and sweet as a harp,
Which thou taught us to hear and know....

[ शेतें हंसून आपलें स्वागत करीत आहेत व रानें आनंदित झालीं आहेत. ऐरणीचे घाव व कुदळीचे आवाज यांतहि एखाद्या वाद्यांतून निघावें तितकेंच मंजूळ संगीत आहे हें संगीत ऐकण्यास व ओळखण्यास तूंच आम्हांला शिकविलेंस. ]

पंधराशें विद्यार्थ्यांनी एका आवाजांत ही कविता म्हटली. दक्षिणेंतील निग्रो शाळा व कॉलेजमधील विद्यार्थी डनबारचें काव्य वाचूं लागले होते व त्यांना तें आवडूं लागलें होतें. १८९९ मध्यें न्यूयॉर्क येथें तो रुग्णाईत असतां अटलांटा विद्यापीठानें त्याला पदवी देण्याचें ठरविलें. पण या सभारंभासाठीं तो दक्षिणेंत जाऊं शकला नाहीं. उलट प्रकृति सुधारण्यासाठीं पश्चिमेंत रॉकी मॉन्टसमध्यें त्याला जावें लागलें. जरी तो आजारी असे तरी त्याचें लिखाण थांबलेलें नव्हतें. डेन्व्हरनाजिकच्या एका झोपडींत त्यानें कोलोरॅडो येथें सुरू केलेली ‘ दि लव्ह् ऑफ् लॅन्ड्री ’ ही कादंबरी संपविली.

पॉल लॉरेन्स डनबार यानें चार कादंबऱ्या, चार कथासंग्रह व अनेक लेख प्रसवले आणि हें सर्व लिखाण पहिल्या प्रतीच्या मासिकांतून प्रसिद्ध होऊन तें मोठ्या प्रमाणावर वाचलेंहि गेलें. पण काव्यामुळें तो प्रसिद्ध झाला. हें काव्यच त्याच्या मृत्यूनंतरहि वाचलें जात आहे व तें लोकांना प्रियहि आहे. त्याच्या कवितांना गाण्याच्या चाली देऊन त्यांची संगीत रचना झाली आहे. १८९८ मध्यें विल मॅरियन कुक या संगीत-रचनाकारासाठीं डनबारनें ‘ क्लोरीन्डी : दि ओरिजिन ऑफ् केकवॉक ’ ही संगीतिका लिहिली. ती न्यूयॉर्कमधील लोकप्रिय संगीत-सभागृहांत त्या वर्षी संबंध हंगामांत चालू

राहिली. डनबारच्या अनेक सुंदर कविता स्वच्छ, शुद्ध इंग्रजींत आहेत. पण त्याच्या लोकप्रिय ठरलेल्या व रम्य कविता एक प्रकारच्या निग्रो बोलींतील आहेत. ही बोली आतां नाहींशी झाली आहे व म्हणून त्या कविता आज वाचतांना अवघड वाटतात. यादवी युद्धानंतर ही सर्व जमातच लिहायला-वाचायला लागली होती. त्यांच्या त्या मोडक्या-तोडक्या इंग्रजीं-तील गंमत आणि विनोद अजूनहि हृद्य वाटतो.

१९०६ मध्यें पॉल लॉरेन्स डनबार डेटन येथें मरण पावला तेव्हां त्याचे मित्र व टोलेडोचे मेयर ब्रॅन्ड व्हिटलॉक यांनीं लिहिलें आहे :

"माणसापेक्षां निसर्गाला सर्व कांहीं समजत असतें. आणि म्हणून समाजांतील श्रेणी व पदवी, वंश व जन्मभूमि वा धर्म यांबद्दलचा आपला तिरस्कार व्यक्त करण्याची संधि तो नेहमींच साधीत असतो. निसर्गदेवतेनेंच बर्न्सला नांगरापासून आणि पॉलला लिफ्टमधून उचलून बाजूला केलें. बर्न्सनें आपल्या स्कॉटलंडमधील लोकांसाठीं केलें, तेंच पॉलनें आपल्या लोकांसाठीं केलें. त्यानें या लोकांच्या भावना त्यांच्या शब्दांत व त्यांच्या पद्धतीनें व्यक्त केल्या आहेत. पॉलच्या काव्यांत परकीय, दुसरीकडून उसने आणलेलें, नकली असें कांहीं नाहीं. हें काव्य जातिवंत, या भूमींतील व स्वजातीय आहे. अशा प्रकारें तो केवळ आपल्या वंशाच्या लोकांचाच कवि नाहीं, तर तो तुमचा, माझा आणि जगांतल्या कोठल्याहि लोकांचा कवि आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे."

लिंकनच्या जन्मादिवशीं पॉल लॉरेन्स डनबार याचा दफनविधि झाला आणि त्याच्या प्रेतयात्रेला शेंकडों लोक जमले होते. त्याच्या थडग्याच्या शेजारीं त्याच्या आईनें विलो वृक्षाचें रोपटें लावलें. कारण 'ए डेथ सॉंग' या त्याच्या कवितेंत वर्णन केल्याप्रमाणें या थडग्याची जागा निवडलेली होती.

> विलोवृक्षाच्या खालीं, गवताच्या खालीं मला ठेवा. या वृक्षाच्या फांद्या मग गाणें गातील. आणि मी अशा प्रकारें झोंपलों कीं मला हें गाणें ऐकूं येईल : "माझ्या लाडक्या, झोंप; तूं आंता विश्रांति घे."

*गायक*

# डब्ल्यू. सी. हॅन्डी

१८७९ : :

---

युरोपांतील हॉटेलांत जेव्हां अमेरिकन पाहुणे जेवण घेतात तेव्हां तेथील वाद्यवृंदां-वर बहुधा ' दि सेंट लुइ ब्ल्यूज 'चे सूर निघूं लागतात. जगांत अनेक ठिकाणीं हीं अमेरिकन गीतें लोकप्रिय आहेत आणि तीं अनेकदां वाजावलीं जात असतात. कांहीं परकीयांचा असा गैरसमज झाला आहे कीं, अमेरिकेचें हेंच राष्ट्रगीत आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत हिटलरच्या सैन्यानें फ्रान्स पादाक्रान्त करून अमेरिकन झाज संगीताला बंदी केली, तेव्हांसुद्धां ' सेंट लुइ ब्ल्यूज 'चे सूर निघतच होते. या गीतास ' ला ट्रिस्टसी द सेंट लुइ ' असें नामाभिधान पडलें होतें. जर्मन सेन्सॉरनें जेव्हां हें गीत अमेरिकन निग्रोंचें आहे काय म्हणून विचारणा केली, तेव्हां फ्रेंच म्हणाले, " छे! छे! हें गीत त्यांच्याहि बरेंच पूर्वीचें आहे हें तुम्हांला माहीत नाहीं काय? या गीतांतील पुरुष म्हणजे १४ वा लुई आहे, तर हिऱ्याच्या आंगठ्या घालणारी स्त्री म्हणजे मारी अॅन्टनी आहे. अरेरे! तिचा शेवट किती दुःखदायक झाला!"

' दि सेंट लुइ ब्ल्यूज 'च्या निर्मात्याचा जन्म अल्बामांत फ्लॉरेन्स येथें मसल शोअल्स कालव्यानजिक यादवी युद्धाच्या समाप्तीनंतर आठ वर्षांनीं झाला. त्याचें नांव विल्यम खिस्टोफर हॅन्डी असें ठेवण्यांत आलें. त्याच्या आजोबानें बांधलेल्या एका टेकडीवरील चर्चमध्यें हा विधि पार पडला. बरींच वर्षे हे लोक या टेकडीवर राहत असल्यानें तिला हॅन्डीची टेकडी असें

म्हणतात. तेथील घरांच्या भोंवतीं सफरचंद, पीचेस, पिअर्स वगैरे फळझाडें होतीं आणि सुंदर सुंदर फुलपांखरें या बागेंत सारखीं इकडून तिकडे उडायचीं, तर रात्रीच्या वेळीं काजवे चमचमत होते. एखाद वेळेला घुबडहि घुमत असे. जवळच असलेल्या कुरणांतून जनावरें चरत असत. कालव्याच्या कांठानें व दलदलीच्या भागांत बेडूक ओरडत आणि साप वळवळत व फूत्कार करीत. एकदां सकाळीं विल्यमची आई त्याला उठवायला आली तेव्हां त्याच्या शेजारीं गादींत साप झोपलेला तिला आढळला. अशा प्रकारें त्याचें जीवन या काळांत निसर्गाच्या सान्निध्यांत व्यतीत होत होतें. पक्ष्यांचे आवाज, गाई-म्हशींचें हंबरणें, रात्रीं बेडूक आणि घुबडांचे होणारे आवाज, इत्यादींमुळें त्याचें मन आकर्षित झालेलें होतें.

विल्यम शाळेंत दाखल झाला तेव्हां संगीताचा तास त्याला सर्वांत प्रिय असे. फिस्क विद्यापीठांतून नुकताच पदवी घेऊन बाहेर पडलेला एक तरुण त्यांना संगीताचें शिक्षण देत असे. तो दररोज सकाळीं शाळा सुरू झाल्याबरोबर अर्धा तास गाऊन दाखवी. त्या वेळीं पिआनोची साथ तो घेत नसे. कारण प्रिआनो या शाळेंत नव्हताच. त्या शिक्षकाला संगीताची अतिशय आवड होती. त्यानें बायबलमधील प्रार्थनाच मुलांना शिकविल्या नाहींत तर वॅगनर, व्हर्डी व बिझेटच्या ऑपेराचे कांहीं भागहि शिकविले. त्यासंबंधींच्या सर्व सूचना त्यानें या विद्यार्थ्यांच्याकडून पाठ करून घेतल्या. शाळेंत घेतलेल्या या शिक्षणाचा उपयोग करून रानावनांत ऐकूं येणाऱ्या पशुपक्ष्यांच्या आवाजांशीं जुळतील असे सूर विल्यम मग शोधूं लागला. गाईच्या हंबरण्यांत त्यास संगीत ऐकूं येई आणि मग कांहीं वर्षांनंतर त्यानें 'हॉकिंग काउ ब्ल्यूज' हें गीत रचलें.

परंतु त्याचे वडील मेथॉडिस्ट चर्चमध्यें धर्मगुरु होते व चर्चला जेवढें उपयोगी पडतें, तेवढेंच संगीत त्यांना मान्य होतें. वाद्यें त्यांना नापसंत होतीं– तीं सैतानाचीं साधनें आहेत असें ते म्हणत. आपल्या चर्चमध्यें पिआनो वा ऑर्गन ठेवण्यासहि त्यांनीं बंदी केली होती. परंतु हा छोटा हॅन्डी कंगवा किंवा आईच्या स्वयंपाकाचीं भांडीं वा तोंडानें वाजवायचा बाजा यावर त्याला पहाटेच्या प्रहरीं ऐकूं येणारे सूर काढण्याचा सारखा प्रयत्न करीत राही. एकदां गाईच्या शिंगापासून त्यानें तुतारी तयारी केली

होती, पण तिच्यांतून एकच सूर निघे. तो बारा वर्षांचा झाला तेव्हां मसल शोअल्सनाजिक दगड फोडण्याच्या खाणीवर त्याला पाणी आणण्याचें काम रोजीं पन्नास सेंट मजुरीवर मिळालें. तेथें हातोडा मारतां मारतां कामगार एकाच ठेक्यांत गाणें म्हणत.

> " There ain''t no hammer—Huh !
> That-a rings like mine, boys....Huh ! "

त्यानंतर त्यानें एकदां शहरांत एका घराच्या खिडकींत गिटार हें वाद्य ठेवलेलें पाहिलें व तसें वाद्य घेण्यासाठीं तो पैसे सांठवूं लागला. थोड्या दिवसांनीं त्याच्याजवळ पुरेसे पैसे जमले. जेव्हां तो हें वाद्य विकत घेऊन घरीं आला, तेव्हां त्याचे आईबाप इतके स्तंभित झाले कीं, त्यांच्या तोंडून एक शब्दहि फुटेना. हें गिटार म्हणजे सैतानाचें हत्यार आहे, असें सांगून त्यांनीं त्याला तें घराबाहेर टाकण्यास फर्माविलें. ज्या दुकानांतून त्यानें तें विकत घेतलें होतें, त्या दुकानदारास तें परत करून शाळेला उपयोगी पडणारी वेब्स्टर डिक्शनरी घेण्यास त्यांनीं त्याला भाग पाडलें.

त्या काळांत दक्षिणेमध्यें नट व गायक यांना अगदीं सामान्य लोक म्हणून समजलें जाई. पण हें हॅन्डीच्या गळीं उतरविणें मोठें कठीण होतें. एकदां त्याच्या शिक्षकानें प्रत्येक विद्यार्थ्याला पुढें कोणता पेशा पत्करणार म्हणून विचारलें. कांहीं म्हणाले, आपण वकील होणार, तर कांहींनीं डॉक्टर, नर्स वा शिक्षक होणार म्हणून सांगितलें. जेव्हां विल्यमची पाळी आली तेव्हां त्यानें आपण संगीतकार होणार म्हणून उत्तर दिलें. तें ऐकतांच शिक्षकाच्या रागाचा पारा चढला व त्यानें वर्गांत सर्व विद्यार्थ्यांसमक्ष त्याची हजेरी घेतली. इतकेंच नव्हे तर त्याच्या वडलांना एक पत्रहि लिहिलें. त्या रात्रीं त्याचे वडील म्हणाले कीं, आपला मुलगा एक फालतू गायक झाल्याचें पाहण्यापेक्षां आपण त्याचा मृत्यु पाहणें पत्करूं. पण याचा मुलावर कांहीं परिणाम झाला नाहीं. विशेषतः जिम टर्नर हा फिडलवादक त्या गांवांत आल्यावर तर विल्यमला कांहीं वाटेनासें झालें. टर्नर हा मेम्फीसचा राहणारा होता. तेथें त्याचा प्रेमभंग झाला, त्यामुळें त्याचें हृदय विदीर्ण झालें होतें. म्हणून तो स्टेशनवर गेला व खिशांतून कांहीं पैसे काढून 'कुठलेंहि तिकीट

द्या पण येथून आपल्याला बाहेर जाऊं द्या ' असें तो तिकीट-मास्तरला म्हणाला. मास्तरनें त्याला फ्लॉरेन्सचें तिकीट दिलें. आपल्या व्हायोलिनवर टर्नर वॉल्ट्झ्, मुझुर्का वगैरेचे सुंदर सूर काढीत असे. त्यांचा तरुण हॅन्डीच्या मनावर विलक्षण परिणाम झाला व संगीतकार होण्याचा त्यानें निर्धार केला.

कांहीं दिवसांनंतर फ्लॉरेन्स येथें एक सर्कस येऊन अडकून पडली. तिच्या बॅन्ड-मास्तरनें पैसे कमाविण्यासाठीं एका निग्रो न्हाव्याच्या दुकानांत रात्रींच्या वेळीं बँड-वादनाचे धडे देण्यास प्रारंभ केला. विल्यमजवळ कोणतेंच वाद्य नव्हतें किंवा या शिक्षणासाठीं फी भरण्याकरितां पैसा नव्हता. तेव्हां तो त्या दुकानाच्या खिडकीबाहेर उभा राहून हे धडे ऐके व जेवढें शिकतां येईल तेवढें शिके. या वर्गातील एकानें त्याला एक जुनें कॉरोनेट विकत दिलें व त्याचीं बटनें कशीं दाबायचीं तें शिकविलें. तेव्हां मग बॅन्ड-मास्तरबरोबर त्या वर्गातील लोक धडे घेत असतां विल्यम हें कॉरोनेट वाजवी. शेवटीं त्या मास्तरनें त्याला वर्गांत दाखल करून घेतलें व त्याच्या-कडून तो तें वाद्य वाजवून घेई. एकदां त्या शहराबाहेर एक कार्यक्रम होता. तेव्हां विल्यमनें शाळेला बुट्टी दिली व तो त्यांच्याबरोबर गेला. त्यानें त्या दिवशीं आठ डॉलर्सची कमाई केली. याबद्दल आपल्या वडलांना अभिमान वाटेल, अशी त्याची अपेक्षा होती ! उलट शाळेला चाट दिली म्हणून त्याच्या शिक्षकाकडून त्याला फटके खावे लागले.

गांवांत जॉर्जियाचे गायक, नर्तक वगैरेंचा संच एकदां आला तेव्हां बॅन्ड, गायकांचें गायन आणि सबंध कपबशी तोंडांत घालणारा विनोदी नट विटी करसॅन्ड इत्यादींचा त्याच्यावर विलक्षण प्रभाव पडला व मग पुढें जेव्हां त्याच्या शहराच्या लोकांचा जलसा झाला, तेव्हां तो स्वतः त्यांत सामील झाला व त्यानें गाणें म्हटलें. पुढें तो थोडा मोठा झाल्यावर त्याच्या गटानें एक सफर काढली असतां ते सर्व लोक अल्बामामधील जास्पर येथें अडकून पडले. तेथें रात्रींचें जेवण हवें असेल तर गाणीं म्हणून पैसे मिळविणें आवश्यक होतें. तथापि फ्लॉरेन्सला कांहीं अंतर पायींच परत जावें लागलें. त्याच्या वडलांना हॅन्डीच्या या सर्व हालचाली बिलकूल पसंत नव्हत्या. त्यांना त्याला धर्मगुरु करावयाचा होता. परंतु हॅन्डीनें शिक्षक होण्याचें ठरविलें होतें. म्हणून शाळेचा अभ्यासक्रम पुरा झाल्यावर बर्मिंगहॅममधील कौन्टी

टीचर्स परीक्षेचा अभ्यास करून तो तींत दुसऱ्या क्रमांकानें पास झाला. पण जेव्हां शिक्षकाला दिवसाला एक डॉलरपेक्षांहि कमी पगार मिळत असल्याचें त्यानें पाहिलें, तेव्हां बेसमर येथें तो फौन्ड्रींत नोकरीला लागला. तेथें असतां त्यानें ब्रास बॅन्ड चालू केला. वाद्यवृन्दाचेहि कार्यक्रम तो करी आणि चर्चमध्यें रविवारीं तुतारी वाजविण्याचें काम करी. परंतु पुढें मंदीची लाट आली आणि मग त्याची नोकरीच गेली. त्याच्या उपजीविकेचें तेंच एक साधन होतें. तथापि तेवढ्यांत त्यानें चार जणांचा एक गट तयार केला आणि शिकागो येथें जागतिक प्रदर्शन भरणार असल्याचें कळतांच या चौघां जणांनीं मालगाडीनें शिकागोला जाण्याचें ठरविलें. ते गाडींत बसले खरे, पण ब्रेकमननें त्यांना रात्रीच्या प्रहरीं आडबाजूलाच सोडून दिलें. तेव्हां रुळाच्या बाजूला बसून हे चौघे जण गाऊं लागले. त्यांचें गायन इतकें कारुण्यपूर्ण होतें कीं, त्यामुळें ब्रेकमनला त्यांची करुणा आली व म्हणून त्यानें त्यांना फिरून गाडींत घेतलें व डिकॅटर यथपर्यंत त्यांना नेलें. हॅन्डी-जवळ वीस सेंट्स् होते. तेव्हां त्यानें थोडा पाव व भाजी वगैरे विकत घेतली व ती घेऊन एका झऱ्याच्या कांठीं न्याहरीला सर्व मित्र बसले. न्याहरी घेत असतां कांहीं स्त्रिया सफरीसाठीं आल्या असून बोटीनें नौकाविहार करण्यासाठीं निघाल्याचें त्यांनीं पाहिलें. हॅन्डी लगेच धांवत त्यांच्याकडे गेला व स्वतःच्या हस्ताक्षरांत लिहिलेलें कार्ड त्यानें त्यांना दिलें. त्यावर 'दि लॅझेरा क्वॉर्टेट' असें लिहिलें होतें. या स्त्रियांनीं त्यांना बोटींत येण्यास सांगितलें. टेनेसी नदींतून नौकाविहार करतांना या मुलांचा गाणीं म्हणण्यासाठीं उपयोग करण्याचें त्यांनीं ठरविलें. यासाठीं या मुलांना दहा डॉलर्स मिळाले व त्या बायांनीं खाण्यासाठीं जे पदार्थ आणले होते त्यांतला भागहि मिळाला. शेवटीं हे चौघे शिकागो येथें गेले तेव्हां जागतिक प्रदर्शन एक वर्षानें पुढें ढकलल्याचें त्यांच्या निदर्शनास आलें.

त्या काळांत सेंट लुई हें मोठें गजबजलेलें शहर म्हणून ख्यातनाम होतें. म्हणून हे चौघे तिकडे गेले; पण तेथेंहि मंदीचा फटका बसला होता. आणि गायन ऐकण्यासाठीं पैसे खर्च करण्याची कोणाची ताकद नव्हती. तेव्हां ही चौकडी मोडली. नोकऱ्या मिळणें अर्थातच महाकर्म कठीण होतें. हॅन्डी कांहीं वेळां रेस ग्राउंडवरील घोड्यांच्यासाठीं ठेवलेल्या गवताच्या

गंजीवर झोंपे, तर कधीं इतर अनेक निर्धन लोकांप्रमाणें मिसिसिपी नदीच्या कांटावर झोंप घेई. टार्गी रस्त्यावर एक मोठा हॉल असून तेथें पोलिसाची नजर जाईपर्यंत झोंप काढणें शक्य आहे, असें त्याला आढळून आलें. पाय हालतात कीं नाहीं यावरून पोलीस एखादा माणूस झोपलेला आहे कीं नाहीं हें ओळखत असे. तेव्हां सतत पाय हालते ठेवून झोंपण्याची कला हॅन्डीनें हस्तगत केली. कांहीं वेळां एखादा खोटा डोळा लावलेला माणूस येई व तो आपल्या खऱ्या डोळ्यावर हॅट ओढून झोंप घेई आणि आपला खोटा डोळा पोलिसांच्या डोळ्यांत धूळ फेकण्यासाठीं उघडा ठेवी. पोलीस रात्रीं मोठमोठ्या काठ्या घेऊन फिरत; त्यामुळें भटक्ये म्हणून आपणांला पकडूं नये असें प्रत्येकाला वाटे. पण या घरदार नसलेल्यांनाहि संध्याकाळच्या सर्द हवेंत बाहेर पडावेंसें वाटत नसे. आणि ज्या वेळेला थंडी पडे तेव्हां रात्रीची त्यांना भीतिच वाटे. सेंट लुई येथील अनुभवावरूनच पुढें कित्येक वर्षांनीं त्यानें आपल्या प्रसिद्ध गीतांत लिहिलें :

‘ I hate to see the even’n ‘ sun go down....

[ सूर्य अस्ताचलाला जात असल्याचें पाहणें मला आवडत नाहीं. ]

पण घरीं गेल्यावर, “ मीं सांगितलें नव्हतें गायक म्हणजे अगदीं कवडी किमतीचे असतात ? ” हेंच वडलांच्या तोंडून ऐकावें लागणार, हें त्याला माहीत होतें व म्हणून त्याचा स्वाभिमान त्याला घरीं परतूं देत नव्हता.

यासाठीं हॅन्डी घरीं गेला नाहीं. पुन्हा तो एका मालगाडींत चढला व इंडियानांतील इव्हॅन्सव्हिल येथें येऊन दाखल झाला. तेथें त्याला थोडें काम मिळालें व थोडेच दिवस स्थानिक बॅन्डपथकांत तो सामील झाला. एकदां तो केंटुस्कीमधील हेंडरसन यांच्याकडे गेला व त्यानें गायनवादनाचा कार्यक्रम करून दाखविला. केन्टुस्की येथील सुंदर हिरवळ त्याला फारच आवडली. येथेंच त्याचें लग्न झालें व लिडरक्रान्झ सभागृहांत त्याला द्वारपाळाची नोकरी मिळाली. येथेंच एका जर्मन संगीत-वर्गाची रोज तालीम होत असे व त्यामुळें हॅन्डीला आपोआपच धडे मिळत. तो छोट्या बॅन्डपथकांत रात्रीच्या कार्यक्रमाच्या वेळीं भाग घेई. या पथकांतील एकानें महाराच्या निग्रो संगीत-पथकांत भाग घेतला होता. या पथकाला शिंग वाजविण्यास एक माणूस हवा,

असें या मित्राला आढळतांच त्यानें हॅन्डीला पत्र धाडून या पथकांत सामील होण्यास सांगितलें. त्याप्रमाणें हॅन्डी ताबडतोब सामील झाला व तेव्हांपासून तो धंदेवाईक संगीतकार बनला.

तो लहान असतां त्याची आजी त्याला नेहमीं सांगे कीं, "तुझे कान मोठे आहेत, त्यामुळें तुला संगीताचा 'कान' असलाच पाहिजे." तिचें भाकीत खरें ठरलें. त्या संगीत-पथकांत त्याचे गुण वाढीला लागले आणि त्या पथकाला तो अतिशय उपयुक्त वाटूं लागला. तो एकटा एखादा कार्यक्रम करूं शकत असे, नवीन सूर बसवी आणि नवीन लोकांना शिकवी. एका वर्षाच्या आंत तीस वाद्यांच्या बॅन्डपथकाचा तो प्रमुख बनला आणि पुढें संगीताचा कार्यक्रम सुरू होण्यापूर्वी चाळीस वाद्यांच्या वाद्य-वृन्दाचा कार्यक्रम त्याच्या मार्गदर्शनाखालीं होऊं लागला. त्यानंतर चार वर्षें अमेरिका, कॅनडा, मेक्सिको व क्यूबामधील अनेक शहरांना त्यानें या पथकाबरोबर भेटी दिल्या. आतां त्याला एक मुलगी झाली होती. त्यामुळें कुठेंतरी स्थायिक होण्याचा विचार तो करूं लागला. म्हणून मग हन्टस्वीलजवळ अल्बामा मेडिकल ॲन्ड मेकॅनिकल कॉलेजांत संगीत व इंग्रजी विषयाचा शिक्षक म्हणून त्यानें नोकरी पत्करली; पण पगार महिन्याला फक्त ४० डॉलर्स होता व काम मात्र फार असे. शिवाय या संस्थेच्या प्रमुखास प्रार्थनागीतें आणि युरोपमधील प्रचलित संगीत पसंत पडे. आतांपर्यंत श्रोतृवर्गास सर्वत्र अमेरिकन लोकसंगीत किती आवडतें, हें त्याला कळून आलें होतें. पण हें संगीत शिकविण्यास वा स्वतः त्याची तालीम करण्यास त्याला बंदी होती. तेव्हां या लोकांची एकदां फजिती करण्याचें त्यानें ठरविलें. कॉलेजच्या एका समारंभप्रसंगीं एका अमेरिकन लोकगीतालाच त्यानें फ्रेंच नांव दिलें आणि तें जेव्हां वाद्यवृन्दावर वाजविण्यांत आलें तेव्हां केवळ विद्यार्थ्यांनींच नव्हे तर प्राध्यापक वगैरे सर्वच श्रोत्यांनीं टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला; पण जेव्हां त्यानें खरी हकीगत सांगितली तेव्हां चालकांना हा विनोद मानवला नाहीं. या कॉलेजांत हॅन्डी नंतर फार काळ राहिला नाहीं. तो पुन्हां महाराच्या पथकांत सामील झाला. तो वाद्यवृन्दाचा प्रमुख म्हणून व शिंग वाजविण्याचें काम करी.

पुढें चित्रपटगृहें सर्व देशभर निघूं लागलीं तेव्हां पन्नासएक वर्षें जें अमेरिकन लोकसंगीत व संगीत-पथकें लोकप्रियता मिळवून राहिलीं होतीं, त्यांचा प्रभाव कमी होऊं लागला. आतां हॅन्डी तीस वर्षांचा झाला होता व त्याला दुसरें मूल झालें होतें. मिसिसिपींतील क्लर्क्स्डेल येथील नाइट्स् ऑफ प्रिथिआज् बॅन्ड या पथकांत तो सामील झाला. नदीपासून दूर अशा विभागांत कापसाचा प्रदेश होता. तेथील कामकरी दर शनिवारीं या शहरांत जमत व गंमत करीत. हॅन्डीचें बॅन्ड पथक वा वाद्यवृन्द या भागांत वारंवार जाई आणि सहलीच्या वेळीं संगीताचे वा नृत्याचे कार्यक्रम करून दाखवी. हा भाग संगीतानें संपन्न केलेला होता. शेतावरील व नदीवरील अनेक गीतें त्याला ऐकावयाला मिळत ; त्याचप्रमाणें निग्रो कामगारांचीं गीतें, घराघरांतून गुणगुणलीं जाणारीं गीतें हीं सर्वच त्याला ऐकायला मिळत होतीं. यांतूनच त्यानें आपली पुढील गीतरचना केली. त्याच्या पथकांतील कलावंत तयार होते. त्यांच्या समोरील आराखड्यावरून ते वाद्यवादन करीत व प्रचलित संगीत त्यांना आवडत असे. त्यांचीं घराणीं प्रायः धार्मिक वृत्तीचीं होतीं. त्यामुळें फक्त भक्तिगीतें या घराण्यांत मान्य होतीं. संगीताबद्दल कांहीं फारशी आस्था नसे आणि लोकसंगीत तर अगदींच पापमय मानलें जाई. म्हणून बहुधा हे कलावंत अभिजात संगीताचे कार्यक्रम करीत.

एकदां क्लिव्हलॅन्ड येथील एका नृत्याच्या कार्यक्रमाच्या वेळीं हॅन्डीच्या पथकाचें वृन्दवादन होतें. बराच वेळ हा कार्यक्रम झाला तेव्हां कांहीं स्थानिक कलावंतांचा लोकसंगीताचा कार्यक्रम झाला तर चालेल काय, असें त्याला विचारण्यांत आलें. आपल्या पथकाला थोडा वेळ विश्रांति मिळेल या कल्पनेनें त्यानें अनुमति दिली. ताबडतोब तरुणांचा एक गट रंगभूमीवर आला आणि मोडक्यातोडक्या वाद्यांतून कांहीं सूर काढूं लागला. त्याबरोबर बराच वेळ हॅन्डीच्या पथकानें वादन करूनहि जें झालें नाहीं तें झालें. जमलेला सर्व श्रोतृसमुदाय त्या तालावर टाळ्या वाजवूं लागला व नाचूं लागला. एक गीत संपलें तेव्हां लोकांनीं आणखी गीतें व्हावीत म्हणून मागणी केली व या कलावंतांच्या अंगावर नाण्यांचा वर्षाव केला. हॅन्डीच्या पथकाला त्या रात्रीसाठीं जेवढी रक्कम मिळाली होती, त्यापेक्षां कितीतरी अधिक हा पैसा होता. आपल्या वाद्यांतून जे सूर हे तरुण काढीत होते, ते

रोज शेतांतून, कारखान्यांतून ऐकूं येत तेच होते. त्या रात्रीं अमेरिकन निग्रो संगीतामुळें लोकांना निश्चित आनंद होईल याची त्याला खात्री पटली आणि तयारी नसलेले गायक व वादक कसे मधलाच कांहीं भाग सोडून वाजवीत व गात, हेंहि त्याच्या लक्षांत आलें.

मेम्फीस येथें तो एका बॅन्ड पथकाचें चालकत्व पत्करण्यास गेला. तेव्हां तेथें राजकीय प्रचार-मोहीम चालू होती. लोकगीतांबद्दल त्याची जी भावना झाली होती, तिचें प्रत्यक्ष प्रत्यंतर घेण्याची संधि त्याला या मोहिमेच्या वेळीं मिळाली. मेयरपदासाठीं तीन उमेदवार होते व आपल्या प्रचारसभांच्या वेळीं प्रत्येकानें बॅन्ड पथक ठेवलें होतें. एडवर्ड एच्. क्रम्पनें हॅन्डीचा बॅन्ड ठेवला होता; हा क्रम्पच पुढें मेम्फीसच्या राजकारणांत एक मोठी शक्ति होऊन बसला. क्लिव्हलॅन्ड येथें त्या अशिक्षित तरुणांकडून जें संगीत ऐकलें होतें, त्या सुरावर हॅन्डीनें गीतरचना केली. मेम्फीसमध्यें हीं गीतें एकदम लोकप्रिय झालीं. हे सूर ऐकूं आले कीं लगेच गोरे व काळे लोक ताल धरून रस्त्यांतच नाचूं लागत. एकाच वेळीं हॅन्डीला अनेक बोलावणीं येऊं लागलीं. तेव्हां त्यानें आपल्या पथकाचे वेगवेगळे गट केले. त्यामुळें बऱ्याच ठिकाणीं कार्यक्रम करतां येऊं लागले. हॅन्डीचीं हीं गीतें, त्याचे सूर अतिशय लोकप्रिय झाले व क्रम्प मेम्फीसचा मेयर म्हणून निवडून आला. त्या विभागांत डब्ल्यू. सी. हॅन्डी अतिशय लोकप्रिय बनला. लवकरच त्यानें अनेक पथकें उभारलीं आणि मेम्फीसमध्यें व आजूबाजूच्या शहरांत या पथकांचे कार्यक्रम चालू राहत. त्यानें क्रम्पच्या प्रचारार्थ उपयोगी आणलेल्या गीतास 'मि. क्रम्प' हें नांव दिलें होतें तें बदलून 'दि मेम्फीस ब्ल्यूज' हें नांव दिलें. अशा प्रकारें पहिलें अमेरिकन लोकगीत जन्माला आलें.

'दि मेम्फीस ब्ल्यूज' हें गीत १९१२ मध्यें प्रसिद्ध झालें. पण हॅन्डीला त्याची खरी किंमत कळूं शकली नाहीं व म्हणून त्यानें त्याचे हक्क ५० डॉलर्सला विकले. या गीताची कीर्ति सर्व देशभर पसरली आणि इतरांनीं त्यावर हजारों डॉलर्स मिळविले, पण हॅन्डीला कांहीं मिळालें नाहीं. पण गीतकार म्हणून त्याचा लौकिक झाला आणि आणखी गीतरचना करण्याचा निर्धार त्यानें केला. आतांपर्यंत त्याला चार मुलें झालीं होतीं.

त्यामुळें घरीं गीतरचना करणें त्याला अशक्य झालें. एकदां त्यानें बील स्ट्रीटवरील एक खोली एका रात्रीपुरती भाड्यानें घेतली आणि रात्रभर तो तेथें नवें गीत रचीत बसला. दगडाच्या खाणींत काम करीत असतां ऐकलेलीं गीतें, गांवोगांव नोकरीच्या शोधार्थ केलेली भटकंती, सेंट लुई येथें घर ना दार अशा स्थितींत रहावें लागल्यानें सूर्य अस्ताचलाला जात असल्याबद्दल येणारा राग, आपल्या प्रियकराचें हृदय समुद्रांतील खडका-सारखें कठीण असल्याबद्दल तक्रार करणारी स्त्री, हिऱ्याच्या आंगठ्या घालणाऱ्या सेंट लुईमधील स्त्रिया आणि नदीचें गीत इत्यादि अनेक स्मृतिचित्रें त्याच्यापुढें हें गीत रचतांना उभीं राहिलीं; आणि त्यांतूनच 'सेंट लुईज् ब्ल्यूज' हें गीत जन्माला आलें. नंतर त्यानें तें वाद्यवृंदावर बसविलें. त्याच रात्रीं एका नृत्याच्या वेळीं त्यानें तें वाजविलें. नृत्य करणाऱ्या सर्वांनाच तें अतिशय आवडलें. त्यांनीं टाळ्या व पाय वाजवून आणि शिट्या फुंकून आपला आनंद व्यक्त केला आणि तेंच गीत वारंवार वाजविण्याचा आग्रह केला.

दोन दिवस हॅन्डी घरीं नव्हता. त्या नृत्यानंतर तो जेव्हां आपल्या पत्नीला हें सांगण्यासाठीं घरीं गेला, तेव्हां तिनें त्याचें निराळ्याच प्रकारें स्वागत केलें.

Saint Luis Blues
Just as blue as I can be

असें तो गात होता. पण ती रागावून म्हणाली, "घरापासून दूर राहावयाचं होतं तर मला कां सांगितलं नाहीं? तुम्ही होतां कुठं?"

निदान त्या रात्रीं तरी हॅन्डीची बायको त्या नव्या गीतावर कांहीं खूष नव्हती. उलट ती रागावलेली होती. पण जेव्हां या गीताच्या व त्याच्या रेकॉर्डच्या विक्रींतून हजारों डॉलर्स रॉयल्टी म्हणून येऊं लागले तेव्हां तो व त्याची बायको दोघेहि जण आनंदित झाले. बहुतेक सर्व मोठे गायक व बॅन्ड पथकें हेंच गीत म्हणूं व वाजवूं लागले. व्हिक्टर रेकॉर्ड्सची एक ताजी यादी एक दिवस पोस्टमननें त्याला आणून दिली, तेव्हां 'एच्' या अक्षराखालीं हॅन्डेल, हॅन्डी व हेडन अशीं नांवें होतीं. दोन गायनमहर्षींच्या मध्यें त्याचें नांव नमूद केलें गेलें होतें. जेव्हां त्यानें तें आपल्या मुलांना

दाखविलें, तेव्हां त्याला "बाबा, हे बाकीचे दोघे कोण?" असा प्रश्न त्यांनीं केला.

'दि सेंट लुई ब्ल्यूज'च्या चारशेंपेक्षां अधिक निरनिराळ्या रेकॉर्ड्स् निघाल्या. अद्यापहि नव्या रेकॉर्ड्स् तयार होत आहेत. त्या केवळ इंग्रजी भाषेंतल्याच आहेत असें नाहीं, तर जगांतील अनेक भाषांत त्या तयार होत आहेत. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत 'सेंट लुई ब्ल्यूज'ची जपानी भाषेंतील रेकॉर्ड कांहीं अमेरिकन सैनिकांना ओकिनावा येथे सांपडली तेव्हां ती त्यांनीं हॅन्डीकडे पाठवून दिली. रावापासून रंकापर्यंत सर्वांना हें गीत फार प्रिय आहे. आठवा एडवर्ड आपल्या बाल्मोरल राजवाड्यांतील बॅगपाइप वाजविणारांना हें गीत वाजविण्यास सांगत असे. राणी एलिझाबेथला नृत्य-प्रसंगीं हें गाणें प्रिय असतें, असें 'लाइफ'नें लिहिलें आहे. पाहिल्या महायुद्धाच्या काळांत ३६९ व्या इन्फन्ट्री बॅन्डनें हें गीत युरोपांत रूढ केलें आणि त्यानंतर स्ट्रॅव्हिन्स्की, हॉन्नेगर व मिलहॉड या आधुनिक गीतकारांच्या गीतरचनेवर त्याचा प्रभाव पडला. जॉर्ज गरश्विनवर तर याचा निश्चित प्रभाव पडला. त्यानें 'रॅफ्सडी इन् ब्ल्यू' आणि 'जॉर्जी अॅन्ड बीज्' या प्रसिद्ध अमेरिकन संग्रहांमध्यें हें ऋण मान्य केलें आहे. याच धर्तीवर जॉन अॅल्डन कार्पेन्टरनें 'कारनिप ब्ल्यूज' ही सिम्फनी रचली. शेंकडों गीतकारांनीं याच धर्तीवर रचना केली आहे वा या धर्तीच्या लोकसंगीताच्या चालीवर रचना केली आहे. होगी कारमायकेलचें 'वॉशबोर्ड ब्ल्यूज', क्लॅरन्स विल्यम्सचें 'बेसिन स्ट्रीट ब्ल्यूज' जॉनी मर्सरचें 'ब्ल्यूज इन् दि नाइट', हॅरॉल्ड आर्लेनचें 'स्टॉर्मी वेदर' इत्यादि गीतें याच धर्तीवर आहेत. 'दि सेंट लुई ब्ल्यूज' या नांवाच्या बोलपटांत डोरोथी लामूरनें काम केलें आहे. तत्पूर्वीं याच नांवाचा छोटा चित्रपट निघाला होता. त्यांत बेसी स्मिथनें काम केलें होतें. छोट्या नाइट क्लबपासून मेडिसन स्क्वेअर थिएटरपर्यंत, नदींतील सफरीसाठीं निघालेल्या बोटीपासून ब्रॉडवे थिएटरपर्यंत, ज्यूथ बॉक्सेसपासून चित्रपटापर्यंत आणि रेडिओपासून टेलिव्हिजनपर्यंत सर्वत्र 'सेंट लुई ब्ल्यूज' हें गीत म्हटलें जातें. 'शिकागो ट्रिब्यून'नें एकदां एक संगीतोत्सव केला तेव्हां तीन हजार गायकांनीं सव्वा लाख लोकांच्या श्रोतृसमुदायापुढें तें गाऊन दाखविलें एकाच वेळीं हें गीत ऐकणारा हा सर्वांत मोठा समुदाय म्हणावा लागेल.

या गीतानें डब्ल्यू. सी. हॅन्डीला कीर्ति व संपत्तीचा मार्ग मोकळा झाला. तें जेव्हां त्यानें रचलें तेव्हां तो चाळीस वर्षांचा होता. तेव्हांपासून तो गीत-प्रकाशक म्हणून प्रतिष्ठा पावला आहे आणि अमेरिकेंतील सर्वांत मोठ्या निग्रो प्रकाशनसंस्थेचा तो प्रमुख आहे. अमेरिकेंतील सर्व प्रमुख थिएटरांत त्याचे कार्यक्रम झाले आहेत. तसेंच सान्फ्रान्सिस्को येथें ट्रेझर आयलंडमध्यें व न्यूयॉर्कच्या जागतिक प्रदर्शनांत त्याचे कार्यक्रम झाले. मोठ्या रेडिओ व टेलिव्हिजन केंद्रांवर त्याची अनेकदां हजेरी लागली आहे.

वयाच्या साठाव्या वर्षी धाकट्या जो लॉरीच्या मेमरीलेन कंपनी-बरोबर त्यानें अमेरिकेचा दौरा काढला व गायनवादनाचे कार्यक्रम केले. हॅन्डीची नंतर दृष्टि गेली; परंतु तरीहि न्यूयॉर्कच्या डायमंड हॉर्सशूमध्यें तो ‘ सेंट लुई ब्ल्यूज ’ हें गीत कॉरोनेटवर वाजविण्याचे कार्यक्रम करीत असे. त्यानें अनेक गीतें रचलीं आहेत, वाद्यसंगीतासाठीं अनेक प्रकारची रचना केली आहे, शेंकडों गीतांची दुरुस्ती वगैरे केली आहे, गीतसंग्रहांचें संपादन केलें आहे आणि ‘फादर ऑफ दि ब्ल्यूज’ हें आत्मचरित्र लिहिलें आहे. तो सत्तर वर्षांचा असतां पूर्णतः अंध झाला असतां एकदां न्यूयॉर्कच्या भुयारी स्टेशनवर पडला. या अपघातांत तो मरण पावणार असेंच सर्वांना वाटलें. त्यांतूनहि तो बरा झाला आणि आपल्या कचेरींत व रेडियो-थिएटर-टेलिव्हिजनवर जाऊं लागला.

निग्रो नटसंघाचा तो एक संघटक होता. अंधांसाठीं चालू असलेल्या डब्ल्यू. सी. हॅन्डी फौन्डेशन या संस्थेचा तो संस्थापक आहे. अनेक वर्षें त्याच्या वाढदिवसानिमित्त न्यूयॉर्कच्या मोठमोठ्या हॉटेलांत खान्याचे समारंभ होत आणि त्या वेळेला जमलेला पैसा या संस्थेच्या कार्यासाठीं उपयोगी येई. मेम्फीस येथील एका उद्यानास त्याचें नांव देण्यांत आलें आहे. सेंट लुई येथें आपल्या पूर्वायुष्यांत ज्या ठिकाणीं तो बाकड्यावर उपाशीपोटी असे, तेथें एक टॉवर उभारण्याची योजना आहे. या टॉवर-वरील घड्याळाचे ठोके पडतांना ‘ सेंट लुई ब्ल्यूज् ’चे सूर ऐकूं येतील. अल्बामामधील फ्लॉरेन्स येथें त्याचा जन्म झाला. तेथें एक शाळा स्थापन झालेली आहे. ज्याचा आधुनिक अमेरिकन संगीतावर प्रभाव पडला आहे आणि दगडाच्या खाणी व कापसाचीं शेतें यांतून ज्यानें स्फूर्ति घेतली, त्या हॅन्डीच्या स्मरणार्थ या शाळेला डब्ल्यू. सी. हॅन्डी हें नांव देण्यांत आलें आहे.

*मुत्सद्दी व राज्यशास्त्रज्ञ*

# राल्फ बुंच

१९०४ : :

१८८८

---

प्राचीन काळीं जेव्हां डेव्हिडनें इस्रायल ताब्यांत घेतलें नव्हतें, तेव्हां त्यास कनानची भूमि म्हणून म्हटलें जात असे. नंतर बायबलप्रमाणें पाहतां, "डेव्हिड म्हातारा झाल्यामुळें त्यानें आपला मुलगा सालोमन यास इस्रायलचा राजा केलें." पुढें बॅबिलॉनकडून ही भूमि पादाक्रान्त झाली; व नंतर पर्शियन व मॅसिडोनियननीं ती ताब्यांत घेतली. जेव्हां येशूचा जन्म झाला, तेव्हां पॅलेस्टाईन रोमन लोकांच्या हातीं होतें. कालांतरानें त्यास 'पवित्र भूमि' म्हणून म्हणण्यांत येऊं लागलें. रोमन साम्राज्य नष्ट झालें व पॅलेस्टाईन मुसलमानांच्या ताब्यांत गेलें, तरीसुद्धां 'पवित्र भूमि' हें नांव कायम राहिलें. पुढें धर्मयुद्धांच्या (क्रुसेड्स्) काळांत इस्लामी राज्यकर्त्यांची या भूमीतून हकालपट्टी झाली; पण पुढें ते तेथें पुन्हां आले. पहिल्या महायुद्धाच्या काळांत तुर्कांकडून ब्रिटिशांनीं पॅलेस्टाईन आपणांकडे घेतलें. विसाव्या शतकांत नाझींच्या 'कैदखान्यां'त आणि 'गॅसगृहां'त कोंडून पडण्याऐवजीं युरोपांत पळ काढून पॅलेस्टाईन हीच आपली भूमि करावी, असा ज्यूंचा विचार होता. परंतु मुसलमानांचा याला विरोध होता. तेव्हां १९३६मध्यें पॅलेस्टाईनच्या ज्यू व मुस्लिम या संमिश्र समाजांत मोठा झगडा सुरू झाला. दुसरें महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटननें हा पॅलेस्टाईनचा प्रांत संयुक्त राष्ट्रांकडे सोपवून दिला. नंतर हा प्रांत संयुक्त राष्ट्रांतील एक तरुण निग्रो मुत्सद्दी डॉ. राल्फ बुंच यांच्या हातीं सोपविण्यांत आला. डॉ. राल्फ बुंच यांनीं प्रथम

युद्धतहकुबी घडवून आणली. नंतर शस्त्रसंधि झाला व पुढें १९४९ मध्यें अरब-इस्रायल झगड्याचा शेवट झाला.

राल्फ जॉन्सन बुंच यांचा जन्म ७ ऑगस्ट रोजीं मिचिगनमधील डिट्रॉइट येथें एका न्हाव्याच्या घराण्यांत झाला. न्हाव्याच्या दुकानाच्या वरच बिऱ्हाड होतें. या बिऱ्हाडांत त्यांचा जन्म झाला. बुंच यांचे आईवडील, दोन आत्या व आजी असा हा परिवार होता. घरांतील सर्व मोठीं माणसें काम करीत. लहान वयांतच कुटुंबाच्या मिळकतींत भर पडावी म्हणून वृत्तपत्रें विकण्याचें काम राल्फनें सुरू केलें. त्याची आजी बाहेरचें काम करी, एवढेंच नव्हे तर तीन मुली, दोन नातवंडें, जांवई आणि घर नीटनेटकें राहील, सुखी व व्यवस्थित राहील, अशा दृष्टीनें ती घरांतहि काम करी. या कुटुंबाचा ती मुख्य आधार होती. केव्हांहि अडचण आली तरी या म्हातारीजवळ एखादा डॉलर असे. जेव्हां राल्फचे आईबाप आजारी पडले व पश्चिमेकडील कोरड्या हवेच्या प्रदेशांत गेल्याखेरीज तीं दोघें सुधारणार नाहींत असें डॉक्टरनीं सांगितलें, तेव्हां या म्हातारीनेंच घराचा सर्व भार आपल्या खांद्यावर घेतला.

राल्फ, त्याचे आईवडील, बहीण, दोन आत्या व आजी हीं सर्वच मंडळी न्यू मेक्सिकोंतील अल्बकर्क या कोरड्या हवेच्या व भरपूर सूर्य-प्रकाशाच्या ठिकाणीं रहावयास गेली. सेंट लुईपासून पुढें दक्षिणेचा भाग सुरू होतो. त्या दिशेनें गाडी सुरू झाल्यावर राल्फ व त्याची कुटुंबीय मंडळी यांना गाडींत निग्रोंसाठीं ठेवलेल्या खास डब्यांत जाऊन बसावें लागलें. अर्धा डबा सामानासाठीं व अर्धा उतारूंसाठीं होता. राल्फला या कायदेशीर वंशभेदाचा अनुभव प्रथमच येत होता, म्हणून टेक्सासमधून बाहेर पडून न्यू मेक्सिकोंत गाडी आली तेव्हां त्यास बरें वाटलें. कारण न्यू मेक्सिकोंत अशा प्रकारचे वंशभेदाचे कायदे नाहींत. या भागांतील डोंगर, वाळवंट आणि नैर्ऋत्येकडील इंडियन लोक यांमुळें अकरा वर्षांच्या राल्फला अत्यानंद झाला. भरपूर प्रकाश असलेलें तें गांव व तेथील शाळा हीं दोन्ही त्याला आवडलीं. पण ज्या सूर्यप्रकाशामुळें त्याच्या आईचा संधिवात सुधारेल असें वाटलें होतें, तें तसें कांहींच न होतां या आजारांतच त्याची आई वारली. कांहीं महिने गेले व त्याचे वडीलहि क्षयानें अधिकाधिक अशक्तच

होत गेले. लवकरच त्यांचाहि मृत्यु झाला. दोन नातवंडें वाढविण्याची जबाबदारी आजीनें घेतली. तिनें प्रथम हा निश्चय केला कीं, काय वाटेल तें झालें तरी राल्फ शाळेंत गेलाच पाहिजे व त्याचें शिक्षण पुरें झालें पाहिजे. १९१६ मध्यें ही वृद्धा वेस्ट कोस्टकडे गेली. दोन वर्षांनंतर राल्फ लॉस एंजल्समधील प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम पुरा करून बाहेर पडला. इतिहास व इंग्रजी या दोन विषयांत त्याला पारितोषिकें मिळालीं होतीं. पारितोषिक-वितरण-समारंभाच्या वेळीं राल्फची आजी स्वतः हजर होती.

पुढें जेफर्सन हायस्कूलमध्यें राल्फ वादविवाद मंडळ व फूटबॉल, बास्केटबॉल, बेसबॉल वगैरे खेळांत भाग घेऊं लागला. तो उत्तम विद्यार्थी व उत्तम खेळाडू होता. राल्फला अभ्यास व खेळ या दोन्हीसाठीं भरपूर वेळ मिळेल, हें त्याची आजी पहात असे. शिवणकाम व घरकाम यांतून ती पुरेसा पैसा मिळवी. खेळ व अभ्यास यांतील राल्फच्या प्रगतीबद्दल तिला फार अभिमान होता. उन्हाळ्याच्या सुटींत राल्फ बुंच स्वतः बरेच कष्ट करी व शिक्षणासाठीं पैसे सांठवी. एका सुटींत सतरंज्यांना रंग देण्याच्या कारखान्यांत त्यानें काम केलें; दुसऱ्या सुटींत तो हॉलिवुडमधील एका नटीचा नोकर म्हणून काम करीत होता, तर तिसऱ्या वेळेस त्यानें एका वृत्तपत्रीय कचेरींत शिपायाचें काम केलें. एकदां या वृत्तपत्रातर्फे सफर निघाली, तिला राल्फहि हजर होता. परंतु तो निग्रो असल्यामुळें पोहण्याच्या तलावांत त्याला उतरण्यास परवानगी मिळाली नाहीं. अशा प्रकारचा भेदभाव आढळला कीं तो अस्वस्थ होई. त्यामुळें लवकरच त्यानें ठरविलें कीं, समाजशास्त्र, नागरिकशास्त्र, इतिहास व इतर विषयांचा अभ्यास करावा व त्यायोगें निग्रो नागरिकांच्या मार्गांत लोकशाही एवढे अडथळे कां घालते तें जाणून घ्यावें. हायस्कूलचें शिक्षण पुरें झालें तेव्हां नागरिकशास्त्र व वक्तृत्व यांसाठीं प्रत्येकीं एक याप्रमाणें त्याला दोन पारितोषिकें मिळालीं.

आतां दिवसभर काम असेल अशी नोकरी पत्करावी, असा विचार राल्फ करूं लागला. पण त्याची आजी म्हणाली, "पोरा, तूं कॉलेजांत गेलें पाहिजेस." तिचा सूर निश्चयी स्वरूपाचा होता; व तिला जें म्हणावयाचें होतें तें केवळ सुरानेंहि स्पष्ट होत होतें. मग लॉस एंजल्स येथें कॅलिफोर्निया

विद्यापीठांत त्यानें आपलें नांव दाखल केलें. हायस्कूलमधील खेळांतील प्रावीण्यामुळें त्याला या विद्यापीठांत चार वर्षें शिष्यवृत्ति मिळाली. परंतु पुस्तकें व इतर खर्चासाठीं जिमखान्याच्या द्वारपाळाची नोकरी त्यानें पत्करली. त्यासाठीं पहांटे पांचला उठून जमीन, सतरंज्या, बार, रिंग वगैरे स्वच्छ ठेवणें हीं कामें त्याला करावीं लागत. कांहीं महिने सर्व सुरळीत चाललें होतें. परंतु एका सहलीच्या वेळीं त्याच्या कानांत बारकी काडी गेली व त्यामुळें कानाचें दुखणें सुरू झालें. दोन ऑपरेशन्स करावीं लागलीं व त्यामुळें बहिरटपणा आला, व कॉलेजचें एक वर्ष फुकट गेलें. तथापि १९२७ मध्यें तो पदवीधर झाला. त्याला पांच बक्षिसें मिळालीं आणि हार्वर्ड विद्यापीठांत पुढील अभ्यास करण्यासाठीं त्याला शिष्यवृत्ति मिळाली. लॉस एंजल्समधील निग्रो समाजाला या बुद्धिमान् विद्यार्थ्याबद्दल कौतुक वाटलें व तो हॉर्वर्डला जाण्यापूर्वी त्यांनीं त्याला खर्चासाठीं एक हजार डॉलर्स दिले. शाळा व कॉलेजांतील शिक्षण पुरें करण्याच्या कामीं ज्या आजीचा त्याला एवढा उपयोग झाला होता, ती तो पूर्वेकडील या नामवंत विद्यापीठांत जाण्यापूर्वीं कांहीं दिवस अगोदर वारली.

केंब्रिजमध्यें राज्यशास्त्राचा अभ्यास करीत असतां एका छोट्या पुस्तकाच्या दुकानांत कारकुनाचें काम त्याला मिळालें. या दुकानाचा मालक वयातीत होता आणि त्याला कमी दिसत असे. त्याला आपल्या या तरुण नोकराचें ज्ञान व विनयशील वृत्ति हीं दोन्ही फार आवडलीं. परंतु कांहीं ग्राहकांनीं या काळ्या नोकराबद्दल तक्रार केली असावी ; म्हणून एक दिवस या मालकानें डोळा बारीक करून राल्फकडे पाहिलें व "तूं निग्रो आहेस काय ?" म्हणून चौकशी केली. राल्फनें 'होय' म्हणून उत्तर दिलें तेव्हां हा मालक म्हणाला कीं, त्याच्या वंशाबद्दल आपण कसल्याच प्रकारें विचार केला नाहीं व आपल्याला त्याची पर्वाहि नाहीं. असें सांगून त्यानें त्याला आपलें काम चालू ठेवण्यास सांगितलें. न्यू इंग्लंडमधील हा म्हातारा माणूस त्याचा मित्र बनला. १९२८ मध्यें बुंचला एम्. ए. ची पदवी हॉर्वर्ड विद्यापीठाकडून मिळाली. त्याला अनेक जागा सुचविण्यांत आल्या. पण वॉशिंग्टन येथील हॉर्वर्ड विद्यापीठाचा राज्यशास्त्र विभाग चालविण्याचें काम त्यानें पत्करलें.

राल्फ बुंच जेव्हां वॉशिंग्टनमध्यें राहूं लागले, तेव्हां त्यांनीं पाहिलेल्या इतर कोणत्याहि शहरापेक्षां तेथें वंशभेदाचा प्रभाव अधिक असल्याचें त्यांना आढळलें. या शहरांतील सिनेमा व नाट्यगृहें, हॉटेलें व विश्रांतिगृहें हीं सर्वच निग्रो लोकांना बंद होतीं. म्हणून आपला फुरसतीचा बराचसा वेळ अमेरिकन कॉंग्रेसच्या ग्रंथालयांत आपण काढीत होतों, असें त्यांनीं नंतर एकदां सांगितलें आहे. या ग्रंथालयांत वंशभेद होत नव्हता. राज्यशास्त्रज्ञ या नात्यानें अमेरिकेच्या वंशविषयक प्रश्नाचा मूलभूत अभ्यास करण्याचा त्यांचा मनोदय होता. वॉशिंग्टनमध्यें त्यांना यासंबंधीं भरपूर माहिती मिळूं शकत होती. हा प्रश्न या २४ वर्षांच्या तरुणाला व्यग्र करण्यास पुरेसा होता. पण आपल्या वर्गांतील एका सुंदर मुलीच्या प्रेमांत पडण्यास त्याला याहि काळांत अवसर होता. १९३० मध्यें त्यांचा विवाह झाला; व मग वॉशिंग्टनमध्यें घर थाटण्याचा विचार त्यांनीं सुरू केला. हॉर्वर्डमध्यें आणखी एक वर्ष गेलें व ॲसिस्टंट प्रोफेसर व मग विद्यापीठाच्या अध्यक्षांचा साहाय्यक अशा रीतीनें त्यांना बढती मिळत गेली. १९३१ मध्यें त्यांना रोसेनवॉल्ड फॅलोशिप मिळाली व त्यायोगें त्यांना आपल्या डॉक्टरेटच्या प्रबंधासाठीं सामाजिक प्रश्नांबाबत जें कांहीं साहित्य हवें होतें, तें युरोप व आफ्रिकेंत जाऊन मिळवण्याची सोय झाली. १९३४ मध्यें हॉर्वर्ड विद्यापीठाकडून राज्यशास्त्राची पीएच्. डी. ही पदवी त्यांना मिळाली. दोन वर्षांनीं त्यांची पूर्ण वेळ प्रोफेसर म्हणून नेमणूक झाली. त्यांना दोन मुली झाल्या आणि प्राध्यापक म्हणून वॉशिंग्टनमध्यें स्थायिक होण्याचा विचार ते करूं लागले. पण हें फार काळ टिकलें नाहीं. वांशिक संबंधाबाबतचे तज्ज्ञ म्हणून त्यांची आतां बरीच ख्याति झाली होती व म्हणून त्यांनीं मध्यस्थी करावी, आपलें कौशल्य व माहिती यांची माहिती करून द्यावी, म्हणून अनेक ठिकाणांहून त्यांना आमंत्रणें येऊं लागलीं.

स्वाथमोर कॉलेजांत वांशिक संबंध संस्था स्थापन झाली होती. १९३६ मध्यें डॉ. बुंच हे तिचे सहाय्यक डायरेक्टर झाले. प्रख्यात स्विडिश समाजशास्त्रज्ञ गन्नर मिर्डल यांना अमेरिकेंतील निग्रो व गोऱ्या लोकांच्या संबंधांत अभ्यास करण्यास १९४१ मध्यें सांगण्यांत आलें. कार्नेजी फाउन्डेशनचें याबाबत साहाय्य होतें. मिर्डल यांनीं आपले मुख्य

मार्ग, ठाणे. स्थलप्रत.
22710 बि:
क्रमांक नों: दि:

साहाय्यक म्हणून बुंच यांना नेमण्याचें पहिल्या झटक्यांतच ठरवून टाकलें. हॉर्वर्ड विद्यापीठानें त्यांना रजा दिली व मग मिर्डल आणि इतर सह-काऱ्यांच्यासह त्यांनीं दक्षिणेकडे अनेकदां दौरा केला; तेथील परिस्थितीचें निरीक्षण केलें आणि निग्रो व गोऱ्या लोकांना हजारों प्रश्न विचारून माहिती टिपून घेतली. बऱ्याच मागासलेल्या जमातींना आपलें निग्रोविरोधी वर्तन सुधारावयाचें नव्हतें व म्हणून मिर्डल व त्यांचे सहकारी यांना अनेकदां मारण्याच्या धमक्या देण्यांत आल्या. परंतु अखेरीस ‘अमेरिकन डायलेमा’ (अमेरिकन शृंगापत्ति) हा प्रचंड व प्रख्यात ग्रंथ तयार झाला. यासाठीं बुंच यांनीं तीन हजार पृष्ठांपेक्षां अधिक मोठा विस्तृत अहवाल तयार केला होता.

दुसरें महायुद्ध सुरू झालें तेव्हां एका कानानें कमी ऐकूं येत असल्या-मुळें बुंच यांना लष्करांत दाखल होण्यास मनाई झाली. परंतु सरकारनें स्ट्रॅटेजिक सर्व्हिसेसमध्यें त्यांना नेमलें. दोस्तांचे आफ्रिका व इतर वसाहतींत लष्करी हितसंबंध गुंतले होते. तेव्हां आफ्रिका व या वसाहती यांसंबंधींचें काम डॉ. बुंच यांच्याकडे सोपविण्यांत आलें. हिटलरच्या युरोपवर स्वारी करण्यासाठीं आफ्रिकेंत कोठें तळ ठोकावे याचें नियोजन करण्यासाठीं लागणारी माहिती डॉ. बुंच यांच्याजवळ होती व म्हणून जनरल किल डोनोव्हन हे त्यांना ‘चालतीबोलती वासाहतिक संस्था’ म्हणून संबोधीत. आफ्रिकेंतील टोळ्यांची युद्धासंबंधीं काय भावना आहे, स्थानिक सामाजिक चालीरीती काय आहेत, गोऱ्या लोकांबद्दल त्यांच्या भावना कोणत्या आहेत, आपल्या प्रदेशांत युद्धतळ दिले तर त्याची प्रतिक्रिया काय होईल— ही व लष्करी हालचालींच्या दृष्टीनें अत्यंत महत्त्वाची माहिती ते लष्करी अधिकाऱ्यांना देऊं शकत. राल्फ बुंच यांनीं हें काम इतकें यशस्वी रीत्या केलें कीं, परराष्ट्र खात्यानें १९४४ मध्यें त्यांना वसाहतीं-बाबतच्या खात्याचे साहाय्यक प्रमुख म्हणून नेमलें. परराष्ट्र खात्याच्या कांहीं अधिकाऱ्यांनीं एका निग्रोला एवढी वरच्या अधिकाराची जागा मिळावी, याबद्दल आक्षेप घेतला. पण परराष्ट्रमंत्री कार्डेल हल यांनीं हे आक्षेप धुडकावून लावले आणि ही जागा स्वीकारणार कीं नाहीं याबद्दल त्यांनीं स्वतः बुंच यांच्याशीं फोनवरून बोलणीं केलीं. मग ते अमेरिकन परराष्ट्र खात्याच्या एका विभागाचे प्रमुख म्हणून काम करणारे पहिले निग्रो ठरले.

युद्धाच्या अखेरीस युद्धानें उद्‌ध्वस्त झालेल्या जगाची आर्थिक घडी पुन्हा कशी बसवावी, याच्या योजना ठरविण्यासाठीं डंबार्टन ओक्स येथें एक परिषद् भरली, तेव्हां अमेरिकन सरकारनें डॉ. बुंच यांना आर्थिक सल्लागार म्हणून या परिषदेस पाठविण्याचें निश्चित केलें. सान्‌फ्रान्सिस्को येथें संयुक्त राष्ट्रांच्या स्थापनेचा जाहीरनामा तयार करण्यासाठीं पहिली बैठक भरली, तेव्हां कमांडर हॅरॉल्ड स्टेसन यांचे सल्लागार म्हणून बुंच गेले होते. या परिषदांसाठीं बुंच यांनीं प्रचंड अहवाल व निवेदनें तयार केलीं होतीं. विशेषतः शत्रूकडील पूर्वेकडील देश, आफ्रिका व पॅसिफिकमधील माजी वसाहती संकल्पित विश्वस्त मंडळाकडे सोंपविण्याबाबत त्यांनीं विशेष मेहनत घेऊन अहवाल तयार केले होते. बुंच यांनीं केलेल्या अनेक सूचना संयुक्त राष्ट्रांच्या जाहीरनाम्यांत ग्रथित झाल्या आहेत व यामुळें अनेक देशांच्या मुत्सद्द्यांना वॉशिंग्टनमधील या बुद्धिमान् तरुण निग्रोची ओळख झाली.

यानंतर अनेक मंडळांवर व हुद्द्यांवर त्यांची नेमणूक झाली. १९५५ मध्यें पॅरिस येथें आंतरराष्ट्रीय मजूर परिषद भरली होती, तेव्हां अमेरिकन शिष्टमंडळांत डॉ. बुंच यांचा समावेश झालेला होता. १९४६ मध्यें कॅरिलियन कमिशनवर अध्यक्षांनीं त्यांची नेमणूक केली. व्हर्जिन आयलंड्‌स्-मध्यें वेस्ट इंडीज परिषद् भरली, तेव्हां ते अमेरिकेचे प्रतिनिधि म्हणून हजर होते. लंडन व पॅरिस येथें भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या अनेक बैठकांना ते हजर राहिले आहेत. पॅलेस्टाईनमध्यें ज्यू व अरब यांच्यांत चाललेल्या युद्धांत मध्यस्थी करण्यासाठीं सयुक्त राष्ट्रांनीं एक खास समिति नेमली होती. तिला साहाय्य करण्यासाठीं पॅलेस्टाईनला जाण्याची विनंती १९४७ मध्यें संयुक्त राष्ट्रांचे चिटणीस ट्रिग्वे ली यांनीं बुंच यांना केली. कौन्ट फोक बर्नाडोट यांस अधिकृत मध्यस्थ म्हणून नेमण्यांत आलें, तेव्हां त्यांच्या सचिवालयाचे प्रमुख म्हणून बुंच यांची नेमणूक झाली. या स्विडिश मुत्सद्द्यांबरोबर बुंच यांनीं पॅलेस्टाईनच्या युद्धक्षेत्राचा दौरा केला, तेव्हां त्यांच्या मोटारीवर सयुक्त राष्ट्रांचा शांतताध्वज लावलेला असे. अनेक शतकें मुसलमान व ज्यू या दोन्ही धार्मिक गटांनीं या भूमींत वास्तव्य केलें होतें. त्यांच्यांतील रक्तपात व वैमनस्य थांबावें म्हणून दोन्ही पक्षांबरोबर त्यांच्या अनेक बैठका झाल्या. त्यांच्या मोटारीवर अनेकदां गोळ्यांचा वर्षाव

होई. एकदां तर बुंच यांचा ड्रायव्हर मोटर चालवीत असतां गोळी लागून ठार झाला, तेव्हां बुंच यांनीं ताबडतोब प्रसंगावधान राखून मोटर चालू ठेवली; एरवीं ती खड्डयांत जाऊन पडणार होती. पॅलेस्टाईनमधील हें कार्य धोकादायक होतें, त्याचप्रमाणें तें निष्फळ ठरणार, असें त्या वेळेला तरी वाटत होतें. या संबंधांत राष्ट्रीय, धार्मिक व वांशिक प्रश्नांची गुंतागुंत झाली होती व त्यामुळें हा प्रश्न अतिशय बिकट झाला होता. नंतर कौन्ट बर्नाडोट यांचा खून झाला आणि त्यांचे अनेक सहकारी मोटारीनें जात असतां त्यांच्यावर हल्ला झाल्यानें मरण पावले. यामुळें परिस्थिति अधिकच बिघडून गेली. मग कौन्ट बर्नाडोट यांची जागा घेऊन कार्यकारी मध्यस्थ म्हणून काम करण्याची सूचना संयुक्त राष्ट्रांनीं डॉ. बुंच यांना केली.

या अशा भयंकर दहशतीच्या वातावरणांत अरब व ज्यू यांनीं शस्त्र-बळावर आपले मतभेद मिटविण्याऐवजीं चर्चा करून मिटवावे म्हणून डॉ. बुंच यांनीं प्रयत्न सुरू केले. त्यांना यश येईल, अशी बहुतेक कोणाचीच अपेक्षा नव्हती. पण त्यांनीं ऱ्होड्स् या ग्रीक बेटावरील हॉटेल द रोझेसमध्यें ज्यू व अरब प्रतितिधींना वाटाघाटींसाठीं पाचारण केलें. प्रथमतः दोन्ही पक्षांचे लोक एकमेकांशीं बोलतसुद्धां नसत. पण धीरानें, सद्‌भावानें व मुत्सद्देगिरीनें वागून या प्रतिनिधींना पुढें औपचारिक चर्चेसाठीं एकत्र आणण्यांत त्यांना यश आलें. नंतर आपल्या खोलींत ते यांपैकीं थोड्या थोड्या प्रतिनिधींना भोजनासाठीं एकत्र बोलावीत. नंतर युद्धविरामाची चर्चा करण्यासाठी त्यांना एकत्र आणण्यांत बुंच यशस्वी झाले. चाळीस दिवस त्यांच्या बैठका चालू होत्या व प्रायः रोजच पेंचप्रसंग निर्माण होत होता. रोज बहुधा तीन-चार तासच झोप मिळत असल्यानें राल्फ बुंच यांचे सल्लागार व साहाय्यक अगदीं थकून गेले. पण शेवटीं परिमित युद्धविरामाची योजना मंजूर झाली. एक महिन्यानंतर शस्त्रसंधीचा करार ते घडवून आणूं शकले. पण या शस्त्रसंधि करारावर सह्या होण्यास जवळ जवळ महिना लागला. सर्व जगभर ज्या शांतता कराराची प्रशंसा झाली, त्या करारावर सह्या होण्याच्या आदल्या दिवशीं डॉ. राल्फ बुंच, त्यांचे सहकारी व सल्लागार, ज्यू व अरब प्रतिनिधि हे सर्वच जवळ जवळ चोवीस तास सतत चर्चा करीत होते. तह झाला त्या दिवशीं सर्व मानवजातीची कृतज्ञता डॉ. बुंच यांनीं संपादन

केली आहे, असे उद्गार इस्रायलच्या मुख्य प्रतिनिधीनें काढले. अरब गटाच्या प्रमुखानें 'जगांतील एक सर्वश्रेष्ठ पुरुष' म्हणून त्यांची प्रशंसा केली. जगांतील सर्वोच्च पारितोषिकें देणाऱ्या समितीचेंहि असेंच मत पडलें व म्हणून १९५० मध्यें डॉ. बुंच यांना शांततेचें नोबेल पारितोषिक मिळालें.

संयुक्त राष्ट्रांच्या विश्वस्त खात्याचे ते प्रमुख आहेत. कुशाग्र बुद्धि व प्रचंड ज्ञान असलेल्या डॉ. बुंच यांना या क्षेत्रांत काम करण्यास भरपूर वाव आहे. जगांतील ज्या लाखों लोकांना अजून स्वातंत्र्य मिळालें नाहीं, त्यांचे प्रश्न सोडविण्याचें कार्य डॉ. बुंच यांच्याकडे आहे. या लोकांचे प्रश्न सुटणें शक्य आहे, असा त्यांचा विश्वास आहे. "ज्या जगांत शांतता आहे, वंश, भाषा, लिंग वा धर्म यांनुसार भेदभाव न करतां सर्वांना मूलभूत हक्क व स्वातंत्र्य उपभोगतां येईल आणि ज्या जगांत सर्व माणसें समानतेच्या भूमिकेवर येतील व सर्वांचीं प्रतिष्ठा शाबूत राहील, असें जग निर्माण करण्यासाठीं संयुक्त राष्ट्रें झटत आहेत." या जगाच्या निर्मितीवर डॉ. राल्फ बुंच यांची श्रद्धा आहे.

⚜ ⚜ ⚜

*प्रसिद्ध गायिका*

# मरियन ॲन्डर्सन

१९०८ : :

---

फिलाडेल्फियांतील एका छोट्याशा घरांत मरियन ॲन्डर्सन हिचा जन्म झाला तेव्हां फिस्क ज्युबिली सिंगर्स हा निग्रो गायकांचा गट युरोपांत प्रख्यात झाला होता. 'ब्लॅक पॅट्टी' या नांवानें ओळखली जाणारी एक निग्रो स्त्रीहि लोकगीतें व शास्त्रीय संगीत यांचे कार्यक्रम करून ख्यातनाम झाली होती. निग्रो व गोऱ्या गायकांनीं अमेरिकन गीतें लोकप्रिय केलीं होतीं. बर्ट विल्यम्स व जॉर्ज वॉकर यांच्या सुखान्तिकांत सर्व निग्रोच काम करीत. या सुखान्तिका लोकप्रिय झाल्या होत्या. पण शूबर्ट, हॅन्डेल वगैरे संगीत-महर्षींच्या चिजा म्हणणारे निग्रो गायक अजून जलशाच्या कार्यक्रमांत यशस्वी झाले नव्हते. निग्रो गायक फक्त भक्तिगीतें म्हणण्यासाठीं लोकां-कडून ओळखले जात. रोलॅन्ड हेस व मरियन ॲन्डर्सन या दोघांनीं ही परंपरा मोडली.

मरियन ॲन्डर्सनची आई ही चर्चची निष्ठावान् कार्यकर्ती होती; तिला निरनिराळीं भक्तिगीतें घरांत वारंवार गुणगुणण्याचा नाद होता. मरियनचे वडील वारले, तेव्हां या घरांत रहावयास आलेली तिची आत्याहि अशींच भक्तिगीतें म्हणायची. मरियनचे आई व वडील हीं दोघेंहि व्हर्जि-नियांतील होतीं. तिची आई मास्तरीण होती तर वडील मळ्यावर काम करीत. लवकरच तीं दोघें फिलाडेल्फिया येथें रहावयास आलीं व तेथेंच त्यांच्या तीन मुलींचा जन्म झाला. मरियनचे वडील वारल्यावर तिची आई एका मोठ्या दुकानांत नोकरी करूं लागली. पण आपलीं मुलें चर्च व शाळेंत

नियमितपणें जातील, याची काळजी ती घेत होती. मरियनचे वडील युनियन बाप्टिस्ट चर्चचे सभासद होते. तेव्हां त्यांच्या मृत्यूनंतर या तीन मुलांबद्दल चर्चच्या चालकांना आस्था वाटूं लागली. यांपैकीं मरियन ही सर्वांत मोठी. ती आठ वर्षांची होते न होते तोंच रविवारीं शाळेच्या संगीतपथकांत भाग घेऊं लागली. तिला अनेक भक्तिगीतें पाठ झालीं होतीं.

एकदां एका दुकानांत मरियननें एक जुनाट व्हायोलिन पाहिलें. त्याची किंमत ३ डॉलर्स ४५ सेंट अशी लिहिली होती. ती आपल्या शेजाऱ्यांच्या पांढऱ्या पायऱ्या स्वच्छ करण्याचें काम करी. फिलाडेल्फिया व बाल्टिमोर येथील घरांच्या पायऱ्या विशिष्ट प्रकारच्या दगडाच्या असतात. या पायऱ्या स्वच्छ करण्याचें काम करून तिला जे पैसे मिळत, ते ती मग सांठवूं लागली. कारण हें व्हायोलीन घेण्याचा तिनें निश्चय केला होता. अशा प्रकारें तिनें तीन डॉलर्स सांठविले. त्या दुकानदारानें व्हायोलिनची किंमत कमी करून तीन डॉलर्सना तिला तें विकत दिलें. पण तिला व्हायोलीन-वादन कांहीं विशेषसें जमलें नाहीं. कांहीं वर्षांनंतर तिच्या आईनें एक पियानो विकत घेतला व त्या पियानोमुळें त्या जुन्या वाद्याचा मरियनला विसर पडला. या वेळेपर्यंत तिच्या गोड गळ्याकडे तिच्या संगीतपथकाच्या शिक्षकाचें लक्ष गेलें होतें. म्हणून संगीतपथकांत वयाच्या चौदाव्या वर्षींच तिचा अंतर्भाव झाला. तेथें सर्व प्रार्थनागीतें ती शिकली व कोणतीहि जागा ती घेऊं शकत होती.

संगीतांत तिची विलक्षण गति आहे, असें पाहून तिला संगीताचें शिक्षण घेतां यावें यासाठीं चर्चच्या कांहीं सभासदांनीं कांहीं रक्कम उभारण्याचें ठरविलें. परंतु इतक्या हुशार मुलीला शिकविण्यासाठीं फी घेण्यास तिच्या पहिल्याच शिक्षकानें नकार दिला. ही शिक्षिका निग्रो होती. तेव्हां मग चर्चच्या या सभासदांनीं जमविलेला पैसा बाजूस ठेवला. मरियनला संगीताचें उच्च शिक्षण देण्याची वेळ येईल तेव्हां या पैशाचा उपयोग करण्याचें त्यांनीं ठरविलें. या सुमारास मुलींसाठीं चाललेल्या साउथ फिलाडेल्फिया हायस्कूल-मध्यें ती शिकत होती. शाळेंतील अनेक संगीताच्या कार्यक्रमांत ती भाग घेई. बऱ्याच वेळां तिचे एकटीचे कार्यक्रम होत. ती पंधरा वर्षांची असतां हॅरिस्बर्ग येथें रविवारच्या शाळांची एक परिषद झाली. तींत तिनें एकटीनेंच

कांहीं गाणीं म्हटलीं. यामुळें सर्व राज्यभर तिच्या संगीतज्ञानाची कीर्ति पसरली. तिचें शालेय शिक्षण पुरें झालें तेव्हां फिलाडेल्फिया कोरल सोसायटी या निग्रोंच्या एका संस्थेनें तिला संगीताचें उच्च शिक्षण देण्याचें ठरविलें व तिच्यासाठीं सर्वांत उत्तम असा स्थानिक शिक्षक नेमण्यांत आला. १९२५ मध्यें न्यूयॉर्क येथें एक संगीत-स्पर्धा झाली. तींत सुमारें ३०० गायक-गायिकांनीं भाग घेतला होता. या स्पर्धेत मरियन पहिली आली व तिला लेविसोहन स्टेडियमवर झालेल्या बक्षीस-समारंभांत ऑर्केस्ट्रा बक्षीस देण्यांत आला.

याची प्रसिद्धि खूपच झाली, पण पैसे मिळण्याची कांहीं फारशी संधि आली नाहीं. तेव्हां मरियननें आपला अभ्यास पुढें चालू ठेवला. न्यूयॉर्कच्या टाउन हॉलमध्यें तिचा एक कार्यक्रम ठेवण्यांत आला, पण तो अयशस्वी ठरला पुढें ती अनेक संगीत-पथकांत सामील होऊन गाण्याचे कार्यक्रम करी, चर्चच्या संगीत-पथकांत ती भाग घेई आणि कांहीं निग्रो कॉलेजांतहि तिचे कार्यक्रम होत. १९३० मध्यें तिला रोसेनाल्ड शिष्यवृत्ति मिळाली व त्यामुळें युरोपांत अभ्यास करणें तिला शक्य झालें. युरोपांत गेल्यावर पहिल्याच वर्षांत तिचा बर्लिन येथें पहिला कार्यक्रम झाला. एका प्रमुख स्कॅन्डिनेव्हियन संगीत-पथकाच्या व्यवस्थापकानें या कार्यक्रमाबद्दलचा वृत्तान्त वृत्तपत्रांत वाचला; तेव्हां समीक्षकांनीं मरियन ॲन्डर्सनच्या आवाजाबद्दल काय लिहिलें होतें त्यापेक्षां ॲन्डर्सन या नांवानेंच तो आकर्षित झाला. तो म्हणाला, "वा: ! स्वीडिश नांव असलेली ही निग्रो गायिका आहे तर ! स्कॅन्डिनोव्हियांत ती निश्चित यशस्वी होईल." या व्यवस्थापकानें आपले दोन मित्र जर्मनीला पाठवून त्यांना मरियनचें गाणें ऐकण्यास सांगितलें. यांत कोस्टी वहानेन हा एक होता. लवकरच तो तिची साथ करूं लागला व अनेक वर्षें तो तिच्याबरोबर पुढें राहिला.

स्कॅन्डिनेव्हियांत मरियन ॲन्डर्सनचे कार्यक्रम चांगलेच यशस्वी झाले. स्वीडिश व फिनिश भाषेंत गाणीं म्हणण्यासहि ती शिकली. तिचा युरोपचा हा दौरा पूर्णतः यशस्वी झाला. अमेरिकेंत परत आल्यावर तिचे अनेक कार्यक्रम झाले. हॉल जॉन्सनच्या पथकांत तिचें एकटीचें गायनहि होत असे. तथापि आर्थिक दृष्ट्या ती यशस्वी झाली नाहीं. पण स्कॅन्डिनोव्हियन

लोकांना तिच्याबद्दल फार आस्था वाटे व म्हणून ते तिला वारंवार आमंत्रणें धाडीत. १९३३ मध्यें ती पुन्हां युरोपांत गेली आणि नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क व फिन्‌लंडमध्यें तिचे संगीताचे १४३ कार्यक्रम झाले. स्वीडन व डेन्मार्कच्या राजांनीं तिचा सन्मान केला. सिबेलियसनें तिच्यावर एक गीत रचलें. पुढील वसंत ऋतूंत तिचा पॅरिसमध्यें एक जलसा झाला. तेथें तिचें एवढें स्वागत झालें कीं, तिला मग लागोपाठ तीन कार्यक्रम करावे लागले. नंतर युरोपमधील अनेक राजधान्यांत तिला चांगलेंच यश मिळालें. १९३५ मध्यें याल्झबर्ग येथें आर्टुरो टॉस्कानिनी या प्रख्यात संगीतज्ञानें तिचें गाणें ऐकलें. तें ऐकल्यावर तो म्हणाला, “ आज मीं जें ऐकलें, तसें गाणें ऐकण्याचें भाग्य शतकांतून एखाद वेळेलाच लाभत असतें.” ‘ जगांतील सर्वश्रेष्ठ गायिका ’ म्हणून युरोपांतच मरियन ॲन्डर्सन मान्यता पावली.

ती पुन्हां अमेरिकेंत आली तेव्हां ती चांगलीच तयार झाली होती. ती येण्यापूर्वींच तिच्या युरोपांतील यशाचें वृत्त अमेरिकेंत पसरलें होतें व म्हणून न्ययॉर्कमध्यें एक मोठा कार्यक्रम ठरविण्यांत आला. पण ज्या बोटीनें ती आली, ती वादळांत सांपडली व मरियन या बोटींत एकदां पडल्यामुळें तिच्या घोट्याला जबर दुखापत झाली. पण यामुळें आपला कार्यक्रम रद्द करण्यास ती तयार नव्हती. त्याप्रमाणें लोकांना हें कळावें, असेंहि तिला वाटत नव्हतें. या कार्यक्रमाच्या वेळीं तिनें आपल्या पायाला बांधलेलें प्लास्टर दिसूं नये म्हणून पायघोळ झगा घातला. पियानोच्या एका टोकावर टेकून अक्षरशः एका पायावर उभें राहून ती त्या रात्रीं गायिली. दुसऱ्या दिवशीं ‘ न्यूयॉर्क टाइम्स ’मध्यें हॉवर्ड टॉबमन यानें मोठ्या उत्साहानें लिहिलें :

“ स्वदेशीं परतलेली मरियन ॲन्डर्सन ही आंपल्या काळांतील एक पहिल्या प्रतीची गायिका आहे, यांत कसलीच शंका नाहीं. ती संगीताची सम्राज्ञीच आहे. तिच्या गाण्याचें वैभव शब्दांत प्रगट करणें शक्य नाहीं.”

यानंतर अमेरिकेंत तिचा सर्वत्र दौरा झाला. पुढें अमेरिकेंतील ती एक उत्कृष्ट व लोकप्रिय गायिका म्हणूनच ओळखली जाऊं लागली. व्हरायटी थिएटरांत सर्वांत अधिक पैसे मिळवणारे जे दहा गायक आहेत, त्यांत तिचा अंतर्भाव होतो. “ वर्षाला एक लाख डॉलसवर तिची कमाई आहे. अनेक

वाद्यवृन्दांबरोबर तिचे कार्यक्रम झाले आहेत. प्रमुख रेडिओ व टेलिव्हिजन केंद्रांवर तिचे अनेकदां कार्यक्रम होतात. फोर्डतर्फे होणाऱ्या रेडिओ कार्यक्रमांतील ती एक लोकप्रिय गायिका आहे. या कार्यक्रमांत ती आपल्या लाखों श्रोत्यांपुढें त्यांचीं अनेक आवडतीं गाणीं म्हणते. तिनें युरोपांतहि अनेक दौरे केले. तिथें तिचा वारंवार सन्मान झाला आहे. परंतु ब्रिटनच्या राजाराणीपुढें तिला गायनासाठीं पाचारण करण्यांत आलें होतें आणि फिन्‌लंडच्या राजानें तिला सन्मानपदक बहाल केलें, याचा खास उल्लेख केला पाहिजे. दक्षिण अमेरिका व आशियांतील तिच्या जलशांचे कार्यक्रम इतर ठिकाणांप्रमाणेंच यशस्वी ठरले. १९३५ मध्यें तिच्या जलशांच्या कार्यक्रमांचें सर्वसाधारण प्रमाण वर्षाला शंभर असें होतें; आणि व्हिएन्ना, ब्युनोआयर्स, मॉस्को, टोकियो अशा दूरदूरच्या ठिकाणीं हे कार्यक्रम होत, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. जगभर तिच्या गाण्याच्या रेकॉर्ड कित्येक लाखांनीं खपल्या आहेत. व्हाइट हाउसमध्यें तिला गायनासाठीं बऱ्याच वेळां पाचारण करण्यांत आलें आहे. पॅरिस ऑपेरा व न्यूयॉर्कच्या मेट्रोपॉलिटन ऑपेरा हाउसमधील कार्यक्रमांत तिचा जलसा झाला आहे. अनेक कॉलेजनीं तिला सन्माननीय पदव्या दिल्या आहेत आणि १९४४ मध्यें स्मिथ कॉलेजनें तिला 'डॉक्टर ऑफ म्युझिक' ही पदवी दिली.

हें सर्व झालें तरीहि अमेरिकेंत प्रवास करणाऱ्या निग्रो कलावंतांना वंशभेदाचे जे अनुभव येतात,. ते मरियनच्या आयुष्यांतहि येऊन गेले आहेत. तिचा दीर्घ काळचा साथीदार वहानेन यानें 'मरियन अॅन्डर्सन' या नांवानेंच तिचें चरित्र लिहिलें आहे. हॉटेलांत तिला राहण्यासाठीं कशी जागा मिळत नसे किंवा भोजनगृहांत तिला भोजन देण्यास हॉटेल-मालक कसे नाकारीत, याचे दाखले त्यानें या चरित्रग्रंथांत दिले आहेत. वहानेननें याच पुस्तकांत आणखी एक प्रसंग वर्णिला आहे; एकदां एका दक्षिणेकडील शहरांत मरियनचा कार्यक्रम झाल्यावर कांहीं गोऱ्या लोकांनीं तिला मोटरींतून स्टेशनवर नेलें व तेथें ही मंडळी वेटिंग रूममध्यें गेली. परंतु तेथें निग्रोंना मज्जाव असल्यामुळें एक पोलिस आला व त्यानें या सर्वांना बाहेर काढलें. नंतर काळ्या लोकांसाठीं असलेल्या छोट्या वेटिंग रूममध्यें ही सर्व मंडळी गेली. परंतु तेथें गोऱ्यांना मज्जाव होता, म्हणून तेथूनहि त्यांना

बाहेर जावें लागलें. मग गाडी येईपर्यंत त्या सर्वांना फलाटावर तिष्ठत उभें रहावें लागलें.

तथापि मरियन अ‍ॅन्डर्सनच्या जीवनांत वंशभेदाचा सर्वांत नाट्यपूर्ण असा अनुभव १९३९ मध्यें आला. वॉशिंग्टन येथील कॉन्स्टिटयूशन हॉल हा 'डॉटर्स ऑफ अमेरिकन रेव्होल्यूशन' या संस्थेच्या ताब्यांत आहे. या सभागृहांत मरियनला संगीताचा कार्यक्रम करण्यास मनाई करण्यांत आली. वृत्तपत्रांनीं मोठमोठे मथळे देऊन ही बातमी प्रसिद्ध केली; तेव्हां अनेक अमेरिकनांना संताप आला. या प्रकाराच्या निषेधार्थ एक समिति स्थापन करण्यांत आली. या समितींत मोठमोठे कलावंत व सरकारचे मान्यवर अधिकारी सामील झाले होते. या समितीच्या प्रयत्नांमुळें मरियन अ‍ॅन्डर्सनच्या गायनाचा कार्यक्रम वॉशिंग्टनमध्यें झाला. अब्राहाम लिंकनच्या पुतळ्यासमोर ती गायिली, तेव्हां तेथें जितका श्रोतृसमुदाय जमला होता, तितका एका गायकाच्या गायनाच्या वेळीं क्वचितच जमला असेल. ईस्टर-मधील त्या रविवारीं दुपारींहि चांगली थंडी वाजत होती आणि तरीहि ७५ हजार लोक उघडया थिएटरांत उभे राहून तिचें गाणें ऐकत होते. शिवाय हेंच गायन रेडिओवरून ध्वनिक्षेपित केलें जात असल्यानें व वृत्तपटानें तें ध्वनिलेखित केल्यामुळें लाखों लोकांनींहि तें ऐकलें. अ‍ॅन्डर्सनचें गाणें झाल्यानंतर त्या वेळचे अंतर्गत खात्याचे मंत्री हॅरॉल्ड आइक्स यांनीं त्या श्रोतृसमुदायासमोर भाषण केलें. आपण केवळ एका श्रेष्ठ गायिकेविषयींच आदर प्रगट करीत नसून लोकशाही व समता या मूलभूत ध्येयाविषयींच आदर व्यक्त करीत आहोंत, असें त्यांनीं या वेळीं सांगितलें.

१९४३ मध्यें मरियन अ‍ॅन्डर्सननें ऑर्फियस एच्. फिशर या स्थापत्यविशारदाशीं लग्न केलें. कनेक्टिकट येथील एका सुंदर निवास-स्थानांत त्यांनीं आपला संसार थाटला. तिचे दौरे अर्थातच चालू राहिले आणि जरी तिच्याजवळ अनेक चिजांचा सांठा होता तरीहि नवीं नवीं गाणीं ती याच निवासस्थानांत शिकत होती. कांहीं वेळां तिच्या आसपासच्या लोकांना तिचीं इंग्लिश, फ्रेंच, फिनिश वा जर्मन भाषेंतील हीं गाणीं ऐकूं येत. कांहीं वेळां "Honor, honor unto the dying lamb...." हें भक्तिगीत त्या न्यू इंग्लंडच्या वातावरणांत घुमत राही.

मरियन अॅन्डर्सननें मालमत्ता केली आहे व सरकारी कर्जरोख्यांत पैसे गुंतविले आहेत, . असें तिची मित्रमंडळी म्हणतात. परंतु ती नेहमींच साधें जीवन व्यतीत करीत आली आहे. प्रवासांत ती कोणी दासी वा चिटणीस बरोबर घेत नाहीं. गाडी, बोट वा विमानानें प्रवास करीत असली तरी आपले कपडे शिवण्यासाठीं शिवणकामाचें यंत्र ती बरोबर बाळगते. १९४१ मध्यें फिलाडेल्फियांत तिला बॉक पारितोषिक मिळालें. त्याबरोबर १० हजार डॉलर्स मिळाले, तेव्हां तिनें त्यांतून एक निधि स्थापन केला. वंश वा धर्म यांबाबत भेदभाव न करतां हुशार व गुणी अमेरिकन कलावंतांसाठीं या निधीचा उपयोग करण्याच्या दृष्टीनेंच तो स्थापन केला आहे. म्हणून दरवर्षीं या निधींतून होतकरू तरुण गायक-गायिका-वादक वगैरेंना शिष्यवृत्त्या मिळत असतात.

*आफ्रिकन मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चचे संस्थापक*

# रिचर्ड ॲलन

१७६० : : १८३१

---

गुलामांनासुद्धां नाकारतां येणार नाहीं, अशी धर्म ही सुखावह गोष्ट होती. इतकेंच नव्हे तर आफ्रिकेंतील 'रानटी' लोकांना ख्रिश्चन धर्माची दीक्षा देऊन गुलाम करण्याचा परिपाठ कांहीं गुलामांच्या मालकांनीं ठेवला होता. ख्रिश्चन धर्माचा त्यांनीं असा उपयोग केला. कारण या 'रानटी' लोकांचा आत्मा त्यांना सुरक्षित ठेवावयाचा होता. पण एकदां त्यांचा आत्मा सुरक्षित बनवला कीं मग हे मालक गुलामांना परमेश्वराची आराधना करूं देत नसत. अमेरिकेंतील निग्रो धर्मोपदेशकांतील पहिल्या पिढींतील एक म्हणजे, रिचर्ड ॲलन हे होत. गुलामगिरींतच त्यांचा १७६० च्या सुमारास फिलाडेल्फियांत जन्म झाला. लहान असतांनाच डेलावेअर येथील एका मळेवाल्यानें त्यांना विकत घेतलें. तरुणपणीं ते मेथॉडिस्ट पंथाचे धर्मगुरु झाले आणि आपल्या मालकाच्या परवानगीनें त्यांनीं मळ्यावर धर्मोपदेश करण्यास सुरुवात केली. त्यांचें वक्तृत्व आणि प्रामाणिकपणा एवढा होता कीं, त्या जोरावर त्यांनीं आपल्या मालकालाहि दीक्षा दिली. स्वातंत्र्ययुद्धांत वॅगन-ड्रायव्हर म्हणून काम करून रिचर्ड ॲलननें पैसा मिळविला; आणि १७७७ मध्यें गुलामगिरींतून मुक्त होण्याइतकी माया त्यांच्याजवळ सांठली. फिलाडेल्फियांत एक स्वतंत्र नागरिक म्हणून ते रहावयास गेले, तेव्हां त्यांचें वय सव्वीस वर्षांचें होतें.

धर्मपीठांतून वक्तृत्व करण्याची त्यांची शैली आणि लोकनेतृत्वाचे गुण यांमुळें त्यांच्या प्रार्थनासभांना अनेक लोक हजर राहत. त्या काळांत फिलाडेल्फियांत निग्रोंचें मेथॉडिस्ट पंथाचें धर्मपीठ नव्हतें. तेव्हां तरुण रिचर्ड ॲलन सेंट जॉन चर्चमध्यें सामील झाले. या चर्चमध्यें कांहीं स्वतंत्र नागरिक व कांहीं गुलाम काळे लोक येत असत. कांहीं वेळां रिचर्ड ॲलन यांना धर्मोपदेश करण्याची परवानगी मिळे. चर्चमध्यें निग्रो श्रोतृवर्ग फार मोठ्या प्रमाणावर हजर राही. या श्रोत्यांची संख्या इतकी असे कीं, काळ्या लोकांना बाजूला करण्यांत यावें, अशी सूचनाहि मग अधिकाऱ्यांकडून होई. कांहीं गोऱ्या लोकांचा रिचर्ड ॲलन यांनीं धर्मोपदेश करावा याला विरोध असे, तर कांहींना चर्चमध्यें निग्रो लोक आलेले खपत नसत. एकदां रिचर्ड ॲलन आणि ॲब्सोलोम जोन्स व विल्यम व्हाइट हे त्यांचे दोन मित्र चर्चमध्यें प्रार्थनेस्तव गुडघे टेकून वाकले असतां एक गृहस्थ आंत शिरला आणि त्यानें त्या तिघांना ओढून उभें केलें. चर्चमधील त्यांचें अस्तित्व इष्ट नाहीं, असें त्यानें त्यांना बजावलें. त्यानंतर जोन्स यांच्या सहकार्यानें ॲलन यांनीं 'फ्री आफ्रिकन सोसायटी' नांवाची धार्मिक व नागरिक संस्था स्थापन केली. यांतूनच पुढें १७९४ मध्यें फिलाडेल्फियांत बेथेल मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चचा जन्म झाला आणि निग्रोंना शांततेनें व निर्धास्त प्रार्थना करण्याची सोय झाली.

या चर्चची स्थापना होण्यापूर्वी एक वर्ष अगोदर फिलाडेल्फिया शहरांत पीतरोगाची भयानक साथ पसरली. रोग्यांना औषधोपचार करण्यास डॉक्टर व परिचारिकांची वाण पडूं लागली आणि कित्येक मुडदे तसेच पडून राहत; त्यांचें दफन करणेंहि कठीण झालें. ज्या प्रमाणांत आपले लोक मरतात, त्या प्रमाणांत निग्रो मरत नाहीत, असा गोऱ्या लोकांचा समज झाला होता; तर कित्येक जण शहर सोडून पळून गेले होते. आणि शिवाय रोगी वा मृत माणसाच्या जवळ जाण्यास हे गोरे लोक घाबरत असत. ही परिस्थिति पाहिल्यावर रोग्यांची शुश्रूषा करण्याचें व मृतांचें दफन करण्याचें आवाहन करणारें पत्रक निग्रो समाजांत वांटण्यांत आलें. जे गुलाम होते, त्यांना हें करणेंच भाग होतें; पण अशा प्रकारची विचित्र आणि घातकी सूचना फक्त आपल्याच वंशाच्या लोकांना करण्यांत

यावी, याचा निग्रोंना फार राग आला. एक जाहीर सभा घेण्यांत आली आणि रिचर्ड ॲलन व ॲब्सोलोम जोन्सना सल्ला देण्यासाठीं पाचारण करण्यांत आलें. प्रार्थना व बऱ्याच वाटाघाटी झाल्यानंतर असें ठरलें कीं, आणीबाणीच्या परिस्थितींत साहाय्य करणं हें ख्रिश्चन लोकांचें कर्तव्यच आहे. त्याप्रमाणें एक समिति स्थापन करण्यांत येऊन तिनें मेयरची भेट घेतली व कोणतीहि अट न घालतां सहकार्य देण्याची तयारी तिनें दर्शाविली.

फिलाडेल्फियांतील अनेक निग्रो गोऱ्यांच्या घरांत परिचारिका वा मदतनीस म्हणून काम करूं लागले. मृत्युशय्येवर पडलेल्यांची ते शुश्रूषा करीत. त्या काळांतील एक तज्ज्ञ वैद्य डॉ. बेंजामिन रश यांनीं ॲलन व जोन्स यांची स्वतःचे खास मदतनीस म्हणून नेमणूक केली. बरेच गोरे डॉक्टर मेले होते; कांहीं दमून-भागून गेले होते; तर कांहीं आपल्या कुटुंबियांसह शहर सोडून गेले होते. म्हणून मग डॉ. रश यांनीं या दोघांना रोगाची तपासणी कशी करावी, औषध कसें द्यावें, वगैरेंची माहिती दिली. शहरांत तर घबराट उत्पन्न झाला होता. संसर्गाच्या भीतीमुळें धट्टाकट्टा माणूस रोग्याच्या जवळ जाण्यास तयार नसे. अशा स्थितींत या काळ्या लोकांनीं शुश्रूषा व औषधोपचार केले नसते, तर सर्व शहरच ओसाड पडलें असतें.

रोगराई ओसरल्यानंतर मॅथ्यू कॅरे नांवाच्या एका गोऱ्या नागरिकानें फिलाडेल्फियांत नुकत्याच झालेल्या रोगाच्या भयानक साथीबद्दल एक पुस्तक लिहिलें व त्यांत त्यानें ॲलन व जोन्स यांची स्तुति केली. पण निग्रोंनीं यापेक्षां अधिक काम करावयास हवें होतें, असें सांगून त्यानें कांहीं निग्रोंनीं चांगले पैसे कमावले, असा दावा या पुस्तकांत मांडला. त्यानें फक्त निग्रो नागरिकांवरच टीका केली होती. पण कॅरे महाशय स्वतः मात्र रोगाचा फैलाव वाढत जातांच शहर सोडून गेले होते, तर जोन्स, ॲलन आणि त्यांच्या चर्चचे अनेक सभासद शहरांतच राहिले होते. या साथींत सुमारें तीनशें निग्रो बळी पडले. मॅथ्यू कॅरेला उत्तर देणारें एक पुस्तक ॲलन व जोन्स यांनीं लिहून प्रसिद्ध केलें. यांत त्यांनीं मिळालेल्या सर्व पैशांची यादी दिली होती आणि शवपेटिका व दफनासाठीं लागणारी मजुरी भागविण्यासहि हे पैसे किती अपुरे होते, हें त्यांनीं स्पष्ट केलें. आपण केलेल्या कार्याची तपशीलवार माहिती त्यांनीं या पुस्तकांत दिली. धर्मामुळें आपल्याला पुढें

पाऊल टाकण्याचें धैर्य झालें, पेटत्या खाईंतूनहि परमेश्वर आपणांस वांचवील, या श्रद्धेमुळें आपणांत विश्वास निर्माण झाला, असें त्यांनीं म्हटलें आहे. आम्हांला सामर्थ्य देण्याची, भीतीपासून मुक्त करण्याची आणि लोकांच्या जास्तींत जास्त उपयोगी पडण्याची बुद्धि देऊन परमेश्वरानें आपल्यावर कृपा केली, असें मत त्यांनीं व्यक्त केलें आहे. मेयर व नगरपिते यांना निग्रो नागरिकांनीं साथीच्या काळांत लोकांची खूपच सेवा केली याची खात्री पटली व म्हणून या नागरिकांचे आभार मानणारा ठराव नगरपालिकेंत मंजूर करण्यांत आला.

धर्मोपदेशक व लोकनेता म्हणून ॲलन यांची नंतर कीर्ति पसरली. त्यांच्या नेतृत्वाखालीं अनेक निग्रो मेथॉडिस्ट पंथीय झाले. त्यांच्या चर्चचे नांव 'मदर बेथेल' असें होतें. त्याची भरभराट झाली. १८२० च्या सुमारास फिलाडेल्फियांत चार हजारांवर काळे लोक मेथॉडिस्ट बनलेले होते. आफ्रिकन मेथॉडिस्ट एपिस्कोपलच्या आधिपत्याखालीं पश्चिमेकडे पिट्स्बर्गपर्यंत व दक्षिणेकडे साउथ कॅरोलिनांतील चार्लस्टनपर्यंत मेथॉडिस्ट चर्चेस स्थापन झालीं. पण १८८२ मधील गुलामांच्या बंडामुळें दक्षिणेंत निग्रोंच्या स्वतंत्र चर्चची अधिक वाढ होण्यास पायबंद बसला. चर्चमुळें निग्रोंत स्थापन होणाऱ्या एकजुटीची गुलामांच्या मालकांना भीति वाटत होती. काळ्या धर्मगुरुंना तुरुंगांत डांबण्यांत आलें व चर्चमध्यें गेल्याबद्दल निग्रोंना फटके मारण्यांत येऊं लागले. व्हर्जिनियांत नाट टर्नरनें आणखी एक उठाव केला. मग १८३० नंतर निग्रो धर्मोपदेशकांची मुस्कटदाबी करण्यांत आली. पण जंगलांत, केबिनमध्यें वा जेथें शक्य असेल तेथें ख्रिश्चन लोक सभा घेत आणि प्रार्थना करीत. जेथें हें अशक्य होई तेथें स्त्री वा एखादा पुरुष एकट्यानेंच प्रार्थना करी.

Way down yonder by myself,
I couldn't hear nobody pray

अशी त्या वेळीं स्थिति असे.

निग्रो चर्चची स्थापना होण्यानें गुलामांच्या मालकांना भीति वाटणें साहजिक होतें. शेतांतून काम करतांना त्यांनीं गुलामांचें एक जुनें गाणें ऐकलें होतें, त्याची त्यांना आठवण होई.

Go down, Moses
Way down in Egypt's land
And tell old Pharaoh
To let my people go—"

हें गाणें केवळ इस्रायली लोकांचेंच नव्हतें; तर त्यांच्यांतच वावरणाऱ्या या निग्रो गुलामांच्या तोंडून बाहेर पडणारी ती स्वातंत्र्याची आरोळी होती.

त्या वेळेला व त्यानंतर निग्रो चर्चमधून अनेक नामवंत पुढारी निर्माण झाले. यांत बोस्टन टी पार्टीच्या वेळीं केंब्रिज येथें निग्रोंसाठीं फ्री मॅसनरी स्थापन करणारा प्रिन्स हॉल हा येतो; तसेंच ॲबिसिनिया बॅप्टिस्ट चर्चचा प्रमुख आणि काँग्रेसमध्यें न्यूयॉर्कहून निवडलेला सभासद ॲडम पॉवेल हाहि येतो. ( ॲबिसिनिया बॅप्टिस्ट चर्च हें या पंथाचें सर्वांत मोठें धर्मपीठ आहे. )

ज्या चर्चची रिचर्ड ॲलन यांनीं स्थापना केली, त्याचे ते बिशप बनले. परंतु केवळ याच क्षेत्रापुरतें त्यांचें कार्य मर्यादित नव्हतें. फ्री आफ्रिकन सोसायटीचे एक नेते या नात्यानें त्यांनीं गुलामगिरी नाहींशी करण्याची मागणी करणारीं अनेक निवेदनें प्रसिद्ध केलीं. अमेरिकेचें आद्य निग्रो वृत्तपत्र 'फ्रीडमन्स जर्नल' यांत ते वारंवार लेख लिहीत. अमेरिकेंतील वांशिक प्रश्नावर अमेरिकन कॉलनायझेशन सोसायटीनें एक तोडगा असा सुचविला होता कीं, देशांतील स्वतंत्र आफ्रिकन लोकांना परत आफ्रिकेला पाठविण्यांत यावें. याला विरोध करण्यासाठीं १८१७ मध्यें फिलाडेल्फिया येथें ॲलन यांच्या अध्यक्षतेखालीं तीन हजार निग्रोंची एक परिषद् भरली होती. कांहीं गोऱ्यांची मजल तर आफ्रिकन लोकांना रात्रीं पकडून, ते आफ्रिकेला जाण्यास तयार आहेत असें कबूल करीपर्यंत त्यांना चोप देण्यापर्यंत गेली. तेव्हां न्यूयॉर्क, पेन्सिल्व्हानिया, डेलावेअर व मेरीलॅन्ड येथील निग्रोंनीं स्वसंरक्षणासाठीं स्वतंत्र संस्था काढण्याच्या दृष्टीनें विचार सुरू केला. काळ्या लोकांच्या हक्कांवर अधिकाधिक गदा आणणारे व या हक्कांचा संकोच करणारे कायदे होऊं लागल्यामुळें या निग्रो लोकांना भय वाटूं लागलें.

१८३० मध्यें फिलाडेल्फिया येथें एका समितीची बैठक भरली. तींत ॲलन हेहि होते. काळ्या लोकांच्या संस्थेची ती मुहूर्तमेढ होती. या बैठकींत ॲलन यांस अध्यक्ष निवडण्यांत आलें.

मनुष्याचा दर्जा प्राप्त व्हावा, मानवी हक्क मिळावे, म्हणून सर्व कायदेशीर उपायांचा अवलंब करण्याचा निर्धार या बैठकींत जाहीर झाला. निग्रो नेत्यांनीं आपल्या बांधवांना उद्योगी बनण्याचा उपदेश केला. तसेंच या समाजांत एकी निर्माण करण्यासाठीं झटून, मानवी समाजाच्या हित-चिंतकांच्या प्रयत्नामुळें आत्मोद्धाराची जी कांहीं संधि उपलब्ध झाली आहे, तिचा पुरेपूर फायदा घ्यावा, असेंहि आवाहन करण्यांत आलें. या निग्रोंना नागरिकत्वाचे हक्क हवे होते. गुलामगिरींत पडलेल्या आपल्या बांधवांना स्वातंत्र्य मिळावें, अशी त्यांची इच्छा होती. आणि आफ्रिकेंत नव्हे तर अमेरिकेंतच त्यांना स्वतंत्र नागरिक म्हणून दर्जा हवा होता. काळ्या लोकांच्या या पहिल्या परिषदेच्या घटनेवर बिशप रिचर्ड ॲलन यांची सही आहे.

मरणापूर्वीं बरींच वर्षें अगोदर 'ब्रदर्ली लव्ह' या शहराचे सन्माननीय नागरिक म्हणून ॲलन यांना मान्यता मिळाली होती. आज आफ्रिकन मेथॉडिस्ट एपिस्कोपल चर्चचे संस्थापक म्हणून ते ओळखले जातात. या संस्थेचे दहा लाखांवर सभासद आहेत. या संस्थेनें शेंकडों चर्चेस स्थापन केलीं आहेत, अनेक कॉलेजें तिच्यातर्फे चालतात, एक प्रचंड प्रकाशनसंस्था तिच्या ताब्यांत आहे. ही संस्था म्हणजे अमेरिकेंतील तसेंच बाहेरहि एक प्रभावी अशी सच्छक्ति आहे. बाहेरच्या देशांत संस्थेचे मिशनरी व शिक्षक अनेक आहेत.

*स्वातंत्र्ययोद्धा*

# फ्रेडरिक डग्लस

१८१७ : : १८९५

---

ज्या वेळीं इरा ॲल्ड्रिज युरोपांत शेक्स्पियरचीं नाटकें करीत होता, त्या वेळीं युरोपमध्यें आणखी एक अमेरिकन निग्रो असाच प्रसिद्ध झाला होता. त्यानें तीन वेळां अमेरिका सोडली व समुद्रपर्यटन केलें. एकदां स्वतःचा जीव बचावण्यासाठीं त्याला हा देश सोडावा लागला. पण तो परदेशीं वास्तव्य करून राहिला नाहीं. तो वारंवार स्वदेशीं परत येई आणि आपल्या लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं झगडे. त्याचें नांव फ्रेडरिक डग्लस. त्याचा बाप गोरा होता. पण फ्रेडरिक हा जन्मानें गुलामच ठरला. त्याच्या आजीनें त्याला वाढविलें आणि आपल्या आईला त्यानें आयुष्यांत पांच-सहा वेळांच पाहिलें असेल. एकदां ती बारा मैल चालून त्याला भेटण्यास आली, तेव्हां हा तिच्या मांडीवर बसला व झोपीं गेला. ही त्यांची शेवटची भेट होती. या भेटीनंतर तिला दिवस उजाडण्यापूर्वीं आपल्या मळ्यांत काम करण्यासाठीं बारा मैल परत चालत जावें लागलें.

फ्रेडरिकचा जन्म मेरी लॅन्डमध्यें झाला, तेव्हां त्याचें आडनांव डग्लस नव्हतें, तें बेली असें होतें. जेव्हां त्याचे पहिले दूधदांत पडूं लागले, तेव्हां त्याच्या आजीनें त्याला आपल्या ताब्यांत घेतलें. नंतर इतर पांच-सहा मुलांबरोबर त्याला एका दुष्ट म्हाताऱ्याच्या हाताखालीं मळ्यावर कामासाठीं ठेवण्यांत आलें. तो या मुलांना वारंवार मारीत असे; आणि

जेवायला न घालतांच घाणेरड्या जमिनीवर त्यांना झोपायला लावीत असे. फ्रेडरिक अंगापिंडानें मजबूत होता आणि म्हणून कांहीं वेळां त्याला अतिशय भूक लागे व मग तो आपल्या मालकाच्या ताटांतील उरलेलें अन्न टाकून देण्यासाठीं येणाऱ्या मुलीची आशेनें वाट पहात राही. जमिनीवर तें अन्न पडलें कीं तेथें जमणाऱ्या कुत्र्यांबरोबर झगडा करून तो जेवढें खातां येईल तितकें खाई. परंतु सुदैवानें लवकरच त्याची बाल्टिमूर येथें त्याच्या मालकाच्या एका नातेवाइकाकडे रवानगी झाली. निरोपाचें व या घरांतील लहान मुलाला सांभाळण्याचें काम तो करी. हा मुलगा लायक आहे, असें पाहून या घरच्या मालकिणीनें त्याला धुळाक्षरें शिकविण्यास सुरुवात केली. पण त्याच्या मालकानें आपल्या बायकोला प्रतिबंध केला : 'जर तूं त्याला वाचायला शिकवशील तर वाचायचें कसें हेंहि शिकण्याची त्याला ओढ लागेल आणि मग तो पळून जाईल.' तथापि त्याच्याबरोबर खेळणारीं गोरीं मुलें त्याला तक्ते वगैरे देत व शब्दज्ञान करून देत. तेरा वर्षांचा असतांना बूट पॉलिश करून त्यानें पन्नास सेंट मिळवले व 'कोलंबिया ओरेटर' हें पुस्तक पैदा केलें. यांत विल्यम पिट व इतर प्रसिद्ध पुरुषांचीं भाषणें ग्रथित केलेलीं होतीं. त्याच्याजवळ हें एकच पुस्तक होतें व म्हणून तो त्याचीं पारायणें करी. यांतील बरीचशीं भाषणें स्वातंत्र्याबद्दल असत. अर्थात् तीं गोऱ्या लोकांच्या स्वातंत्र्याबद्दल असत, हें उघडच होतें; पण तरुण फ्रेडरिकवर या भाषणांचा गाढ परिणाम झाला. एखादा पक्षी वा पशु होणें पत्करलें, पण गुलाम होणें नको, असें तो स्वतःशीं म्हणत असे.

थोड्याच अवकाशांत त्याचें जीवन म्हणजे स्वातंत्र्यासाठीं केलेला यज्ञच ठरलें. अनेक संकटें, कष्ट व दिव्य यांसंबंधीं उल्लेख असलेलें एक गीत त्यानें ऐकलें असेल. तरुण फ्रेडरिकला कठीण कसोट्यांचा चांगलाच अनुभव आला. याच सुमाराला लॉसन या नांवाच्या एका म्हाताऱ्या निग्रोच्या सहवासामुळें त्याला धार्मिक विषयांत गोडी वाटूं लागली व त्यामुळें त्याला मनःस्वास्थ्यहि मिळूं लागलें. लॉसनला फारसें चांगलें वाचतां येत नसे. तरुण फ्रेडरिकनें लॉसनला बायबलमधील अक्षरें वाचावयास शिकविलीं. लॉसननें त्याची स्वातंत्र्याची इच्छा अधिक दृढ केली. तो

त्याला म्हणे, " तुला जर स्वातंत्र्य हवें असेल तर तूं परमेश्वराजवळ त्याची प्रार्थनापूर्वक मागणी कर, तो तुला स्वातंत्र्य देईल." फ्रेडरिकलांहि हळूहळू दिसून आलें कीं, ही गुलामगिरी पसंत नसलेले गोरे लोकहि अमेरिकेंत आहेत. त्यांना ' ॲबॉलिशनिस्ट ' म्हणत. ' सैतानाशीं संगनमत केलेले अराजकवादी ' अशी त्यांची संभावना बाल्टिमूरमधील वृत्तपत्रें करीत असत. परंतु हे गोरे स्वातंत्र्यवादी कोणीहि असले तरी ते गुलामांचे विरोधक नाहींत किंवा गुलामांच्या मालकांबद्दल त्यांना प्रेम नाहीं, असें फ्रेडरिकचें मत बनलें होतें.

बायबल व वृत्तपत्राचें जेवढें वाचन करतां येईल तितकें तो करी आणि म्हणून ज्ञानामुळें यशाचा मार्ग सांपडतो, हें त्याला पटलें. त्याच्या मालकानें हेरल्याप्रमाणें फ्रेडरिकला खरोखरच वाचनाची ओढ लागली. रात्रीच्या वेळीं ज्या माळ्यावर तो झोपत असे, तेथें तो गुप्तपणें बायबल व प्रार्थना-पुस्तकांतील उतारे लिहून काढी. पिठाचें पिप तो टेबल म्हणून वापरी. जेव्हां घरांत कोणी नसे तेव्हां तो आपल्या गोऱ्या मालकाची लेखणी व शाई घेई आणि लिहीत बसे. लवकरच त्याला लिहितां येऊं लागलें. थोडया दिवसांनीं त्याला याच मालकाच्या दुसऱ्या एका नातेवाइकाकडे धाडण्यांत आलें. हें कुटुंब लहानशा गांवांत रहात असे. तेथें एका स्वतंत्र निग्रोच्या घरीं रविवारीं शाळा भरत असे. फ्रेडरिकला तेथें शिक्षकाचें काम करण्यास सांगण्यांत आलें. पण तो तेथें शिकवायला लागून दुसरा रविवार उजाडला, तेव्हां कांहीं गोऱ्या लोकांच्या जमावानें काठ्या व धोंडे घेऊन या शाळेवर हल्ला केला आणि सर्वांना पिटाळून लावलें. रविवारीं या शाळेंत शिकविण्याचें काम असेंच चालू ठेवलें तर गोळी घालूं, अशी धमकी तरुण फ्रेडरिकला देण्यांत आली. त्या छोट्या गांवांत हा लिहितां-वाचतां येणारा तरुण निग्रो धोकादायक आहे आणि तो आपल्याकडील निग्रोंच्या मनांत अनेक कल्पना भरवितो, अशी त्याची ख्याति झाली. लवकरच त्याच्या मालकानें त्याला निग्रोंचा व्यापार करणाऱ्या दलालाकडे पाठविलें. तो सुतासारखा सरळ यावा आणि गुलामगिरींत त्यानें समाधान मानायला शिकावें, म्हणून त्याला या दलालाकडे धाडलें होतें.

या दलालाचें नांव कॉव्हे असें होतें. चीसपीक उपसागराच्या

वालुकामय किनाऱ्यावर एका ठिकाणीं त्याचा मळा होता. हा मळा म्हणजे गुन्हेगारांना शिक्षण देणाऱ्या रेफर्मेटरीसारखाच होता. बंडखोर तरुण निग्रोंना हा कॉव्हे आपल्या ताब्यांत घेई आणि वर्षभराच्या काळांत त्यांना सुतासारखा सरळ करी; म्हणजे त्यांच्या मालकांना कसलाच त्रास उरत नसे. फ्रेडरिक येथें आल्यावर तीन दिवसांनीं कॉव्हेनें त्याच्याबरोबर कांहीं मस्तवाल बैल दिले व त्याला जंगलांतून ओंडके आणण्यास सांगितलें. फ्रेडरिकनें कधीं बैल हाकले नव्हते, पण सांगितलेलें काम नाकारण्याची त्याची छाती नव्हती. हे बैल नंतर एकदम उधळले, त्यांनीं गाडी पाडून दिली व फाटक मोडून टाकलें. त्याबद्दल या १६ वर्षांच्या मुलाचे कपडे फाडण्यांत येऊन कॉव्हेनें त्याला, बैलाला ज्या आसुडानें मारतात, त्याच आसुडानें फटके दिले. आपल्या आत्मचरित्रांत यासंबंधीं त्यानें असें लिहिलें आहे : "कॉव्हेनें मारलेल्या जबरदस्त फटक्यांमुळें माझ्या अंगांतून रक्ताच्या धारा वाहूं लागल्या. बोटाएवढे जाड वळ माझ्या पाठीवर उठले. कित्येक आठवडे पाठीवर जखमा होत्या, फोड होते. माझ्या सदऱ्याचें कापड फार जाड होतें, त्यामुळें या जखमा वहातच रहात. मी सहा महिने तेथें होतों. त्या काळांत आठवड्यांतून एकदां तरी काठीनें वा चामड्याच्या पट्ट्यानें मला फटके मारले जात. दुखणारीं हाडें आणि पाठीवरील वळ हे माझे कायमचे सोबती होते." कॉव्हेच्या माराच्या खुणा फ्रेडरिकच्या पाठीवरून कधींच पुसल्या गेल्या नाहींत.

पहांटेपूर्वींच कामाला सुरुवात करून सूर्यास्तानंतरहि तें चालू ठेवण्याची कॉव्हेची पद्धति होती. एकदां गव्हाच्या झोडणीचें काम चाललें असतां उन्हाचा त्रास होऊन फ्रेडरिक मूर्च्छा येऊन पडला. त्याचें डोकें भयंकर दुखूं लागलें व त्याची प्रकृति फारच बिघडली. कॉव्हेनें त्याला उभें राहण्याचा हुकूम केला, पण तो उभा राहूं शकला नाहीं. तेव्हां कॉव्हेनें त्याला बऱ्याचशा लाथा मारून उभें केलें, पण लगेच तो खालीं कोसळला. त्याबरोबर कॉव्हेनें त्याच्या डोक्यावर दांडक्यानें प्रहार केले. तेव्हां फ्रेडरिकच्या डोक्यांतून रक्त वाहूं लागलें. त्या रात्रीं फ्रेडरिक जंगलांतून आठ मैल चालत आपल्या पूर्वींच्या मालकाकडे गेला आणि आपल्याला या कॉव्हेच्या तावडींतून वांचवावें, अशी त्यानें प्रार्थना केली. पण त्याच्या या मालकानें कांहीं ऐकलें

ग्रं, ठाणे. स्थळप्रत.
22880
क्रमांक ....... ७९८ ....... नों: दि: .......


नाहीं. उलट दुसऱ्या दिवशीं त्यानें त्याला कॉव्हेकडे धाडलें व वर्ष पुरें केलें. तेव्हां आपलें संरक्षण करण्याचा आणि कोणीहि आपणांस वाईट वागणूक देणार नाहीं अशा रीतीनें वागण्याचा त्यानें निर्धार केला. फ्रेडरिक परतला तेव्हां रविवार होता, म्हणून कॉव्हेनें त्याला दुसऱ्या दिवशीं म्हणजे सोमवारीं फटके मारण्याचें ठरविलें. कॉव्हे त्याला मारण्यास येतांच या तरुण निग्रोनें त्याचा प्रतिकार सुरू केला. फटके मुकाट्यानें खाण्याऐवजीं कॉव्हे फटका मारायला येतांच दरवेळीं तो त्याला जमिनीवर लोळवीत असे. शेवटीं कॉव्हेनें नाद सोडला. फ्रेडरिक तेथें होता तोंपर्यंत नंतर त्याला कधीं फटके मिळाले नाहींत. पण कॉव्हे त्याच्याकडून मरेपर्यंत काम करून घेई.

डग्लस यानें ‘ लाइफ ॲन्ड टाइम्स ’ या आपल्या आत्मचरित्रांत म्हटलें आहे : “ या मारामारीनंतर मी पूर्णतः बदलून गेलों. पूर्वी मी कोणीच नव्हतों, पण आतां मी खराखुरा मनुष्य झालों आहें.” १८३४ मध्यें नाताळच्या दिवशीं कॉव्हेबरोबर घालविण्याची त्याची वर्षाची मुदत संपली. पण या अवधींत त्याची आत्मिक शक्ति नष्ट होण्याच्या ऐवजीं ती वाढली. गुलामगिरींतील क्रौर्याविषयींचा त्याचा तिरस्कार अधिक तीव्र झाला; आणि स्वतंत्र होण्याची त्याची आकांक्षा अधिक दुर्दम्य बनली. नंतर त्याला दुसऱ्या एका मालकाच्या हवालीं करण्यांत आलें. तेथें परिस्थिति चांगली होती, पण स्वतंत्र होण्याची योजना त्यानें कायम केली. फ्रेडरिकनें आपल्याबरोबर आणखी पांच गुलामांना पळून जाण्यासाठीं तयार केलें. पण पळून जाण्याचा जो दिवस ठरला होता, त्याच्याअगोदर कोणीतरी त्यांचा विश्वासघात केला. फ्रेडरिकला मग अटक करण्यांत येऊन तुरुंगांत डांबण्यांत आलें त्याची सुटका झाल्यावर त्या मळ्यावर त्यास पुन्हां कामासाठीं घेतलें नाहीं. कारण तो ‘ धोकादायक निग्रो ’ बनला होता. म्हणून मग त्याला बाल्टिमूर येथें पाठविण्यांत आलें. तेथें एका बोटीच्या कारखान्यांत त्याला नोकरी मिळाली; पण निग्रोंनीं आपल्याबरोबर काम करावें, याला गोऱ्या कामगारांचा विरोध होता. एक दिवस या कामगारांनीं त्याला बेदम मार दिला. फ्रेडरिकला इतका भयंकर मार बसला होता कीं, त्याच्या मालकाला आपणांस आतां एक उपयुक्त गुलाम हातचा घालवावा लागेल, अशी भीति वाटली. म्हणून त्यानें फ्रेडरिकला पुन्हां त्या गोदींत पाठविलें

नाहीं. त्यानें फ्रेडरिकला कुठेंहि नोकरी करण्याची मुभा दिली. फक्त प्रत्येक शनिवारीं त्यानें आपली आठवड्यांत मिळवलेली मजुरी आपल्याला द्यावी, अशी अट घातली होती. कांहीं वेळां फ्रेडरिकला थोडे पैसे ठेवून घेण्याची मुभा तो देई. पण न्यूयॉर्कला जाण्यास पुरतील इतके पैसे फ्रेडरिकनें गुप्तपणें सांठविले. पकडला गेल्यास प्राणहि गमवावा लागला असता, हें माहीत असूनहि फ्रेडरिकनें पुन्हा पळून जाण्याची योजना पक्की केली. त्यानें खलाशाचा वेश धारण केला व खोटे कागदपत्र घेतले; आणि बाल्टिमूरहून गाडी सुटण्याच्या वेळेला त्यानें गाडींत उडी मारली. एक दिवसाच्या प्रवासानंतर तो न्यूयॉर्कला येऊन पोहोंचला. या स्वतंत्र भूमींत त्यानें पाऊल ठेवलें, तेव्हां तो एकवीस वर्षांचा होता. अखेरीस जें स्वप्न होतें, तें प्रत्यक्षांत उतरलें होतें. तो आतां स्वतःचा स्वामी झाला होता.

एक नवीन जग त्याच्यापुढें होतें. येथें आल्यावर एका मित्राला लिहिलेल्या पहिल्याच पत्रांत त्यानें लिहिलें आहे :

" भुकेल्या सिंहाच्या गुहेंतून सुटल्यानंतर जसें वाटेल, तसें मला वाटलें." परंतु लवकरच त्याच्याजवळील पैशांची पुंजी संपली. त्या मोठ्या शहरांत त्याच्याकडे कोणी लक्ष देत नव्हतें. कोणावर विश्वास टाकावा, हें त्याला समजत नव्हतें. कारण पुन्हां आपल्याला दगाफटका होऊन गुलामगिरींत पडावें लागेल, अशी भीति त्याला वाटत होती, म्हणून तोहि कोणाला भेटत नव्हता. आपल्या या परिस्थितीचें वर्णन करतांना त्यानें म्हटलें आहे : " घर नाहीं, ओळख नाहीं, पैसा नाहीं, कोठें पत नाहीं कीं काम नाहीं. आणि कोणता मार्ग स्वीकारावा वा कोणाची मदत घ्यावी, हेंहि कळत नव्हतें. अशा स्थितींत माणूस केवळ आपल्या नवजात स्वातंत्र्याचा विचार करीत नाहीं. विचार करण्याजोग्या अनेक गोष्टी असतात. न्यूयॉर्कमधील स्वातंत्र्यांतून मी इतस्ततः भटकत होतों आणि बंदरांत पडलेल्या पिंपांवर झोंपत होतों. गुलामगिरीपासून मी मुक्त झालों होतों खरा, पण त्याचबरोबर अन्न व निवारा यांपासूनहि माझी ताटातूट झाली होती."

गोदीजवळ राहणाऱ्या एका खलाशानें त्याला जवळ केलें, जागा दिली आणि अशा प्रकारें सुटून आलेल्या गुलामांना रोजगार पाहणाऱ्या

एका समितीच्या ताब्यांत त्यास दिलें. न्यूयॉर्कमध्यें लपून छपून राहत असतांनाच त्यानें लग्न केलें. बाल्टिमूर येथें तो एका मुलीच्या प्रेमांत पडला होता, आणि ती त्याच्याबरोबर तेथून न्यूयॉर्कला पळून आली होती. तीं दोघें एका बोटींतून मॅसच्युसेट्स्ला गेलीं. निग्रोंना केबिन मिळत नसल्यानें त्यांना डेकवरून प्रवास करावा लागला. न्यूबेडफोर्ड येथें त्याला जहाजावर नोकरी मिळाली. येथेंच त्यानें बेली हें आपलें आडनांव सोडून दिलें आणि 'लेडी ऑफ दि लेक'मधील डग्लस हें एका पात्राचें नांव पत्करलें. यानंतर तो फ्रेडरिक डग्लस झाला. हें नांव लवकरच वृत्तपत्रांतून सर्व जगभर झळकूं लागलें. कारण केवळ स्वतः स्वतंत्र होऊन त्याचें समाधान झालें नाहीं. त्याला गुलामगिरीच नष्ट करावयाची होती, म्हणून तो 'अॅबॉलिशनिस्ट' बनला.

१८४१ मध्यें नान्टुकेट येथें गुलामगिरीविरोधी संस्थेच्या सभेंत त्यानें आपलें पहिलें जाहीर भाषण केलें. जनसमूहापुढें भाषण करण्याचा त्याचा हा पहिलाच प्रसंग होता, त्यामुळें कोणते शब्द वापरावे, हें ठरविण्यासाठीं त्याला धडपडावें लागत होतें. त्यानें मग आपलें बालपण, गुलामगिरी व पलायन यांची हकीगत सांगितली. श्रोत्यांच्या मनावर तिचा परिणाम फारच झाला. विल्यम लॉइड या नांवाच्या गृहस्थाचें फ्रेडरिक-नंतर भाषण झालें. "हा मानव प्राणी आहे कीं एखादी जड वस्तु आहे?" असा सवाल त्यानें केला. आणि तो म्हणाला, "जरी फ्रेडरिक ही एक निर्जीव वस्तु आहे, असें गुलामांच्या मालकांनीं मानलें तरी स्वतंत्र लोक त्याला मनुष्यप्राणीच मानतील व मनुष्य म्हणूनच त्याला वागवतील."

डग्लस या वेळीं चोवीस वर्षांचा होता. त्याची उंची सहा फूट होती आणि त्याचे केस सिंहासारखे होते. तो फार देखणा होता. जसजशीं तो भाषणें करूं लागला, तसतसें त्याचें वक्तव्य अधिक परिणामकारक होऊं लागलें. लवकरच गोदींतील काम सोडून स्वातंत्र्याचा प्रचार करण्यासाठीं वक्ता बनण्याबद्दल त्याचें मन वळवण्यांत आलें. १८४५ मध्यें तो प्रथमच इंग्लंडला गेला आणि अमेरिकेंतील हजारों निग्रो गुलामांची करुण कहाणी त्यानें तेथील लोकांना निवेदन केली. परत आल्यावर रॉचेस्टर येथें त्यानें 'दि नॉर्थ स्टार' नांवाचें पत्र सुरू केलें. तेव्हांपासून पन्नास वर्षें डग्लस हा एक बडा सार्वजनिक कार्यकर्ता म्हणून वावरत होता. वेंडेल फिलिप्स, हॅरियट

बीचर स्टोव, चार्लस् सुम्नेर व लॅकेटिया मॉट वगैरे प्रसिद्ध व्यक्तींच्या बरोबरीनें त्यानें अनेक सभांतून भाषणें केलीं. त्यानें आपलें आत्मचरित्रहि प्रसिद्ध केलें. १८५० च्या ' फ्युजिटिव्ह स्लेव्ह लॉ ' या कायद्याचें बंधन तोडून त्यानें अनेक पळून आलेल्या गुलामांना आश्रय दिला. त्याच्या सभेवर गोरे लोक हल्ला करीत असत. कांहीं वेळां त्याला दगडांचा मार खावा लागला आहे. जॉन ब्राउननें हार्पर्स् फेरीवर हल्ला केला, तेव्हां फ्रेडरिकचा त्यांत कांहीं भाग नसतांहि त्याला कांहीं वृत्तपत्रें व गुलामांचे मालक गोवीत होते. म्हणून आपला जीव बचावण्यासाठीं डग्लसला कॅनडाला जावें लागलें. तेथून तो पुन्हां इंग्लंडला गेला. जेव्हां अमेरिकेंत यादवी युद्ध सुरू झालें, तेव्हां तो स्वदेशीं परत आला. आल्यावर अध्यक्ष लिंकन यांच्याशीं त्याच्या वाटाघाटी होऊं लागल्या आणि केंद्रीय लष्करांत सैनिकांना भरती करण्याची मोहीम त्यानें सुरू केली. त्याचे मुलगेहि या सैन्यांत सामील झाले होते या स्वातंत्र्ययुद्धांत दोन लाखांहून अधिक निग्रोंनीं भाग घेतला व संघराज्य टिकवण्यास हातभार लावला. फ्रेडरिक डग्लसच्या भाषणांनीं यांपैकीं अनेकांना स्फूर्ति मिळाली होती.

युद्ध संपल्यावर फ्रेडरिक डग्लस रिपब्लिकन पक्षाचा एक पुढारी बनला. ' संयुक्त संस्थानांचा मार्शल ' म्हणून त्याला किताब मिळाला. कोलंबियांत मालमत्तेच्या हक्काबाबतचीं कागदपत्रें नोंदवून घेणारा अधिकारी म्हणून त्याची नेमणूक झाली. १८८९ मध्यें हाटी प्रजासत्ताकांतील अमेरिकेचा वकील म्हणून त्याला नेमण्यांत आलें. तो केवळ निग्रोंचाच पुढारी नव्हता. स्त्रियांना मतदानाचा हक्क द्यावा कीं नाहीं, हें ठरविण्या-साठीं भरलेल्या परिषदेंत स्त्रियांना हा हक्क द्यावा, असें जाहीर रीतीनें सांगणारा डग्लस हा एकमेव पुरुष होय. ' दि नॉर्थ स्टार ' या आपल्या पत्राच्या पहिल्याच अंकांत त्यानें म्हटलें आहे : " हक्काला लिंगभेद मंजूर नाहीं." मद्यपानविरोधी व इतर समाजकल्याणाच्या चळवळींत तो हिरीरीनें भाग घेत असे. स्वातंत्र्यानंतर निग्रोंना खास अधिकार द्यावेत, अशी मागणी डग्लसनें केली नाहीं. प्रत्येक नागरिकाला जेवढें स्वातंत्र्य असेल तेवढेंच निग्रोंनाहि मिळावें, अशीच त्याची मागणी होती. ' काळ्या माणसाला काय हवें आहे ? ' या त्याच्या गाजलेल्या भाषणांत त्यानें म्हटलें आहे :

" आमचें काय करावें हें जाणण्यास अमेरिकन लोक सतत उत्सुक असतात. माझें या प्रश्नाला प्रथमपासून एकच उत्तर आहे. आमचें कांहीं करूं नका ! जर निग्रोला आपल्या पायावर उभें राहतां येत नसेल, तर त्याला खुशाल खालीं पडूं द्या. पण त्याला त्याच्या पायावर उभें राहण्याची संधि द्या, एवढीच माझी मागणी आहे. त्याच्या कामांत ढवळाढवळ करूं नका, त्याला एकट्यालाच काय करावयाचें असेल तें करूं द्या ! जर तो शाळेंत जात असेल तर त्याला शाळेंत जाऊं द्यावें, त्याला आडकाठी करूं नये. जर तो हॉटेलांत जेवण्यासाठीं जात असेल, तर त्याला तसें जाऊं द्यावें. जर तो मतदान करण्यासाठीं चालला असला, तर त्याला अडथळा आणूं नये. जर तो कारखान्यांत जात असेल, तर त्याला जाऊं द्यावें ! "

गुलामगिरीच्या शाळेंत शिक्षण घेऊन आपण पदवीधर झालों, असें तो वारंवार म्हणत असे. त्याच्या पाठीवरील वळ हाच त्याचा दाखला होता. पण अनेक सुशिक्षितांजवळ नसलेली बुद्धि आणि ज्ञान त्याच्याजवळ होतें. त्याच्या भाषणांमुळें अनेकांना कार्याची स्फूर्ति मिळे. त्याच्या लेखनकर्तृत्वाचा नमुना ' लाइफ ॲन्ड टाइम्स ' या त्याच्या आत्मचरित्राच्या द्वारें मिळतो. हा अमेरिकन साहित्यांतील अभिजात ग्रंथ आहे. त्याचे शब्द साधे पण परिणामकारक असत आणि लिखाणांत विनोदहि असे. तो गुलामगिरीचें जोखड झुगारून मुक्त झाल्याला १० वर्षें झालीं, तेव्हां त्यानें आपल्या जुन्या मालकाला पत्र लिहिलें आहे. त्यांत त्याच्या लेखणीचा गुण दिसून येतो. या माणसानें त्याच्याशीं केलेल्या वाईट वर्तनाचा संपूर्ण पाढा त्यानें या पत्रांत वाचला आहे आणि अखेरीस म्हटलें आहे : " पण माझ्या निवासस्थाना-इतकें सुरक्षित आश्रयस्थान तुम्हांला दुसरें कोणतेंच मिळणार नाहीं. आणि माझ्या घरांत तुम्ही आलां व तुम्हांला एखाद्या गोष्टीनें समाधान लाभणार असेल तर ती देण्यास मीं बिलकुल मागेंपुढें पाहणार नाहीं. मनुष्यानें आपल्या बांधवांना कसें वागवावें, याचें प्रत्यक्ष उदाहरणच मीं तुम्हांला घालून देईन."

तुमचा सहकारी, पण गुलाम नसलेला,

**फ्रेडरिक डग्लस.**

*स्वातंत्र्ययुद्धांतील वीरांगना*

# हॅरियट टबमन

१८२३ : : १९१३

---

"आम्हांला वीज चमकल्यासारखी वाटली, पण बंदुकींतून गोळ्या झाडल्यानंतरचा तो प्रकाश होता. आम्हांला ढग गडगडल्यासारखें वाटलें, पण तो तोफांचा आवाज होता. पावसाचा आवाज झाला; परंतु वास्तविक रक्त वाहत होतें आणि जेव्हां आम्ही शेतांत जाऊन पाहिलें तेव्हां आम्हांला मुडदे उचलावे लागले." या शब्दांत उत्तर व दक्षिण संस्थानांत गुलामगिरीविरुद्ध झालेल्या एका लढाईचें वर्णन हॅरियट टबमन हिनें केलें आहे. कारण ती स्वतःच या युद्धांत सहभागी झाली होती. या युद्धापूर्वी फ्रेडरिक डग्लसप्रमाणें हॅरियट टबमन आपलें जीवित स्वातंत्र्यासाठीं वेचीत होती आणि युद्धानंतर ती आपल्या लोकांच्या उद्धारासाठीं झटूं लागली.

डग्लसप्रमाणेंच तिचा जन्म मेरी लॅन्डमध्यें झाला व ती जन्मजातच गुलाम होती. अकरा भावंडांतील ती एक होती. ती निश्चित कोणत्या दिवशीं व कोणत्या वेळेला जन्माला आली, याची नोंद कोणीं ठेवलेली नाहीं. पण ती दीर्घकाळ जिवंत राहिली आणि तिच्या जीवनासंबंधीं बरेंच लिहिलें गेलें आहे; तिच्यासंबंधीं इतर गोष्टी अचूकपणें नोंदल्या गेल्या आहेत. ती साधी, दुर्मुखलेली, हट्टी आणि बेफाम मुलगी होती व कायम बंडखोरपणा करीत असे. फिलिस व्हिटले किंवा फ्रेडरिक डग्लस यांच्याप्रमाणें तिला कोणतेंच शिक्षण मिळालें नव्हतें. फक्त फटक्यांचें शिक्षण मात्र

मिळे. एका मोठ्या घरीं तिला तिच्या लहानपणींच कामासाठीं धाडण्यांत आलें, तेव्हां पहिल्याच दिवशीं तिच्या मालकिणीनें चार वेळां तिला फटके दिले. एकदां ती पळून डुकरांच्या पिंजऱ्यांत जाऊन लपली व डुकरांना जें खायला दिलें जात असे, त्यांतूनच कांहीं खाऊन ती आपला उदरनिर्वाह करी. हें तिनें पांच दिवस केलें. तिनें एकदां म्हटलें आहे, "कांहीं मालक व मालकिणी चांगल्या असल्याचें माझ्या कानांवर आलें होतें, पण मला असें कोणी भेटलें नाहीं."

घरामध्यें मोलकरणीचें काम करण्यास हॅरियटला आवडत नसे; तेव्हां तिचा बंडखोर स्वभाव लक्षांत घेऊन तिला शेतांत काम करण्यास धाडलें असावें. ती किशोरावस्थेंत असतांना अशी एक घटना घडली कीं, तिचा तिच्या जीवनावर कायम परिणाम झाला. संध्याकाळची वेळ होती आणि एक तरुण गुलाम मालकाची परवानगी न घेतां एका स्टोअरमध्यें गेला. त्याबरोबर त्याला फटके मारण्यासाठीं मुकादम त्याच्यामागोमाग गेला. त्याला बांधण्यास मदत करण्याचा हुकूम मुकादमानें हॅरियटला दिला. हॅरियटनें त्यास नकार दिला. त्याबरोबर गुलाम पळून गेला. मुकादमानें एक लोखंडी गोळा गुलामाच्या दिशेनें भिरकावला, पण तो त्याला लागला नाहीं. तेव्हां मग त्यानें हॅरियटच्या डोक्यावर जबरदस्त प्रहार केला. तो व्रण जन्मभर तिच्या डोक्यावर राहिला. अनेक दिवस हॅरियट जीवन-मरणाच्या मार्गावर रेंगाळत होती. ती सतत बेशुद्ध असे. जेव्हां काम करण्याइतकी ती बरी झाली, तेव्हांहि मधूनमधून तिला अशीच बेशुद्धि येई. अशा फिट्स् तिला पुढें जन्मभर येत. या फिट्स् तिला केव्हांहि व कुठेंहि येत. आणि त्या आल्या कीं असें वाटे कीं, तिला एकाएकीं गाढ झोप लागली असावी. कधीं शेतांत, तर कधीं चर्चमध्यें, तर कधीं कुंपणा-शेजारीं—कुठेंहि ती अशी 'झोपीं' जात असे. अशा वेळीं तिला कोणी उठवूं शकत नसे. जेव्हां हा झटका जाई, तेव्हां ती उठे. जाग आल्यानंतर तिच्या विचारशक्तीवर कांहीं परिणाम होत नसे. या मारामुळें ती अर्धी वेडी झाली आहे, असा तिच्या मालकाचा ग्रह झाला होता आणि तिनें तो दूर करण्याचा प्रयत्न केला नाहीं. या गुलामगिरींतून मुक्तता करण्याविषयीं ती परमेश्वराची करुणा मात्र कायम भाकीत होती.

ती चोवीस वर्षांची असतांना तिनें टब्मन या नांवाच्या गुलहौशी माणसाशीं लग्न केलें. गुलामगिरीच्या देशांतून बाहेर पडण्यास तो तिच्या-प्रमाणें कांहीं उत्सुक नव्हता. कांहीं वर्षांनंतर तिचा मालक वारला. तेव्हां आपल्याला व आपल्या दोन भावांना गुलाम म्हणून विकलें जाणार असल्याचें तिच्या कानीं आलें. त्याबरोबर तेथून पळून जाण्याचाच निर्णय तिनें घेतला. हें कोणालाहि सागणें अर्थातच धोक्याचें होतें. आपल्या आईलाहि ती हें उघडपणें कांहीं सांगूं शकत नव्हती. पण जाण्यापूर्वीं संध्याकाळीं ती गुलामांच्या वसाहतींतून फिरली. फिरतांना ती गात होती :

When that old chariot comes
I am gwine to leave you
I am bound for the promised land.. "

जेव्हां तो प्राचीन रथ येईल, तेव्हां मी तुम्हांला सोडून
जाईन. कारण 'आश्वासित भूमी 'कडे मला जावयाचें आहे.

ज्या रीतीनें ती हें गाणें म्हणत होती, तीवरून तिच्या मित्रमंडळींची व नातेवाइकांची खात्री पटली कीं, ही आश्वासित भूमि म्हणजे स्वर्ग नसून उत्तरेकडील संस्थानें होत. त्या रात्रीं तिनें ब्रोडाझचा मळा सोडला व नंतर ती तिकडे कधीं परतली नाहीं. पहांट होण्यापूर्वीं तिचे भाऊ मात्र घाबरले व आपली गैरहजेरी कोणाच्या लक्षांत येऊं नये म्हणून ते गुलामांच्या वस्तींतील आपल्या घरीं जाऊन बसले; पण हॅरियट एकटीच रात्रीं जंगलांतून तशीच चालत गेली. ती दिवसां लपून रहात असे व रात्रीं चालत असे. तिला झोप ठाऊक नव्हती. तिला लिहितां वा वाचतां येत नव्हतें; पण ती परमेश्वरावर विसंबून होती व स्वतःच्या अंतःप्रवृत्तीवर तिचा विश्वास होता. उत्तरेचा तारा तिचा मार्गदर्शक होता. सुदैवानें ती लवकरच फिलाडेल्फिया येथें पोहोंचली. तेथें तिला काम मिळालें आणि मग ती कधीं गुलाम बनली नाहीं.

परंतु आपलें सर्व कुटुंब गुलाम असतां ती सुखी होणें शक्य नव्हतें. ती सारखा विचार करीत राही. म्हणून कांहीं महिन्यांनंतर ती मेरी लॅन्डला गेली. आपल्याबरोबर उत्तरेला चलण्याबद्दल आपण आपल्या नवऱ्याचें मन वळवूं, असें तिला वाटत होतें. पण त्यानें नकार दिला. तेव्हां तिनें इतर

कांहींना आपल्याबरोबर नेलें. तिच्या मुक्ततेनंतर ती दोन वर्षांच्या अवधींत तीन वेळां दक्षिणेंत आली आणि तिनें आपले दोन भाऊ, एक बहीण, तिचीं मुलें आणि इतर बारा गुलाम सोडवून नेले. १८५० चा फ्युजिटिव्ह स्लेव्ह लॉ हा कायदा फार कडक होता व त्यामुळें अमेरिकेंत कोठेंहि पळून गेलेल्या गुलामांना थांबणें कठीण होऊन बसलें होतें. तेव्हां हॅरियटनें आपल्या बरोबरील गुलामांना कॅनडांत नेलें व सर्व हिंवाळा तेथें काढला. ती भीक मागे, प्रार्थना करी वा स्वयंपाकिणीचें काम करी. नंतर मेरी लॅन्डला ती पुन्हां गेली व तिनें आणखी नऊ गुलामांना सोडवून आणलें.

स्वतंत्र झाल्यानंतर आपल्या पावलावर पाऊल ठेवून कसें चालावें, याचे धडे ती इतरांना पहिल्या कांहीं वर्षांत देत होती. स्वातंत्र्य-तुकडीची एक निर्भय पुढारी म्हणून तिची कीर्ति झाली होती. पण त्याचमुळें तिला पकडण्यासाटीं मोठमोठीं बक्षिसें गुलामांच्या दलालांनीं जाहीर केलीं. तथापि ती कधीं पकडली गेली नाहीं किंवा तिनें सोडवून आणलेला कोणीहि गुलाम दलालाच्या हातीं पुनः लागला नाहीं. एकदां गुलामानें तिच्याबरोबर जाण्याचा विचार पक्का केला कीं, मग ती त्याला परत फिरूं देत नसे, हें एक कारण असावें. ती पळून गेली तेव्हां तिला आपल्या भावांचा जो अनुभव आला, त्यामुळें ती असा आग्रह धरीत असावी. गुलामगिरीकडून स्वातंत्र्याकडे जाणाऱ्या भित्र्या वा घाबरलेल्या गुलामांनीं पुन्हा परत फिरूं नये वा त्यांनीं विश्वासघात करूं नये, म्हणून ती अगदीं साध्या उपायांचा अवलंब करी. तिच्याजवळ नेहमीं एक पिस्तुल असे. जर एखादा गुलाम आपण येत नाहीं असें म्हणाला, तर ती आपल्या कपड्यांत अडकवून ठेवलेलें पिस्तुल काढी व त्याच्यावर रोखून दरडावी, "तुला यायलाच पाहिजे, नाहींतर मरावें लागेल." हॅरियटचें तें पिस्तुल पाहतांच या गुलामांचा जाणारा धीर परत येई. मग जंगल असो वा डबकीं असो, थंडी असो वा पाऊस असो, हे गुलाम तिच्यामागें जात. अशा प्रकारें जे जे हॅरियट टबमन-बरोबर बाहेर पडत, ते तिला आपल्याला स्वातंत्र्य प्राप्त करून दिलें म्हणून जन्मभर धन्यवाद देत.

यादवी युद्ध सुरू होण्यापूर्वी बरींच वर्षें अनेक गुलाम दक्षिणेंतून उत्तरेला येत होते. उत्तरेंतील अनेक लोक त्यांना या कामीं मदत करीत.

या पलायनाच्या मार्गास ‘ भूमिगत रेल्वे ’ म्हणून त्या वेळीं संबोधलें जात असे. या मार्गावरील घरें, इतकेंच नव्हे तर चर्च यांचा गुलामांना लपविण्यासाठीं, विश्रांति घेण्यासाठीं वा खायलाप्यायला घालण्यासाठीं ‘ स्टेशन ’सारखा उपयोग केला जात होता. या बाबतींत क्वेकर्स हे अधिक उपयोगी पडत. शिवाय गुलामगिरीविरोधी एक प्रबळ संस्था या कामीं मदत करीत होती. दरवर्षी पळून जाणाऱ्या या गुलामांच्यामुळें त्यांच्या मालकांचें लाखों डॉलर्सचें नुकसान होत होतें. या ‘ भूमिगत रेल्वे ’वरील ‘ कंडक्टर ’ म्हणून हॅरियट टबमन ओळखली जात होती. पण ती निव्वळ कंडक्टर नव्हती, ती सर्वांत आधिक प्रसिद्ध व धैर्यवान् होती. एकदां तर तिनें एका वेळीं पंचवीस गुलाम सोडवून आणले.

दुसऱ्या एका वेळीं तिनें आणलेल्या गुलामांपैकीं एकाची किंमत पंधराशें डॉलर्स होती. तो अतिशय धष्टपुष्ट होता. त्याचें नांव जोसिया बेली असें होतें. मेरीलॅन्डमध्यें सर्वत्र त्याला पकडून देण्याबद्दल बक्षीस जाहीर करणारीं पत्रकें लावण्यांत आलीं होतीं. न्यूयॉर्ककडे बेली येत असतां स्वातंत्र्याच्या एका पाठीराख्यानें त्याला वृत्तपत्रीय वर्णनावरून ओळखलें व तो त्याला म्हणाला, “ ज्याच्यासाठीं पंधराशें डॉलर्स देण्यांत आले, त्याला भेटण्यांत मला अतिशय आनंद होतो.” आपल्याला ओळखल्यामुळें व आपण पकडले जाऊं या भीतीमुळें जोसिया अतिशय दुःखी झाला व घाबरून गेला, म्हणून प्रवासांत तो नंतर कांहीं बोलला नाहीं. त्यांची गाडी बफेलो येथून कॅनडांत शिरली, तेव्हां नायगाराचा धबधबा पाहण्यासाठींसुद्धां तो गाडीच्या बाहेर डोकावला नाहीं. परंतु तो जेव्हां स्वातंत्र्याच्या भूमींत आला आणि आपण आतां सुरक्षित आहोंत याची त्याला खात्री पटली, तेव्हां तो एकदम आनंदानें गाऊं लागला. त्याचें गाणें कोणाला थांबविणें शक्य नव्हतें. अखेरीस तो म्हणाला, “ परमेश्वराच्या कृपेनें मी स्वर्गांत आलों आहें.” हॅरियट टबमन त्यावर म्हणाली, “ अरे वेड्या, पण स्वर्गाकडे येतांना तूं नायगाराचा धबधबा पहायला हवा होता. तो तूं कां पाहिला नाहींस ? ”

हॅरियटला चांगली विनोदबुद्धि होती. ती स्वतःबद्दलच्या हास्यकारक कथा मोठ्या आवडीनें सांगत असे. तिला वाचतां येत नसल्यामुळें

एकदां ती एका बागेंतील बाकावर झोपली, पण त्या बाकाशेजारींच तिला पकडण्याबद्दल लावलेल्या बक्षिसाची नोटीस लावलेली होती. ही कथा तिनेंच सांगितली आहे. चेहरेपट्टी वगैरे न करतां ती तोंडाचें बोळकें करी, कपाळावर सुरकुत्या निर्माण करी आणि म्हाताऱ्या बाईचें सोंग उभें करी. म्हणून ती चांगली नटी झाली असती असें लोक म्हणत. तिला आपली ओळख पटून द्यावयाची नसेल, तेव्हां ती एकदम वाकत असे व पायांत कापरें आणी. एकदां आपल्या कांहीं नातेवाइकांना सोडवून आणण्यासाठीं तिला मेरीलॅन्डमध्यें जावें लागलें. तिला तेथें अर्थातच लोक ओळखत होते. तेव्हां मग तिनें दोन कोंबड्या विकत घेतल्या, त्यांचे पाय बांधले व आपल्या मानेभोंवतीं त्या अडकवून दिल्या, जर एखादा गुलामांचा दलाल आला तर तो तिला ओळखील, म्हणून तिनें या कोंबड्या रस्त्यावर सोडून दिल्या व ती त्यांच्यामागून पळूं लागली. ती त्यांना मुद्दामच पकडीत नव्हती. कारण यामुळें या दलालाच्या टप्प्यांत न येतां ती पळून जाऊं शकत होती. ती तशी पळत असतां रस्त्यावरचे लोक गमतीनें हंसत होते.

पळून जाणाऱ्या गुलामांचा पाठलाग संतत गोरे मालक करीत असल्याचें पाहिलें कीं, ती दक्षिणेकडे जाणारी गाडी पकडीत असे. कारण पळून जाणारे गुलाम दक्षिणेकडे जाणें शक्य नसल्यानें या गाडींत कोणी पाठलाग करीत चढण्याची शक्यता नसे. अशा वेळीं लहान मुलें रडूं नयेत म्हणून त्यांना झोपेचें औषध देऊन गप्प करण्यांत येई व त्यांना फडक्यांत गुंडाळण्यांत येई. पाठलाग करणाऱ्या कुत्र्यांना वास येऊं नये म्हणून ती कितीतरी-तास ओढ्यांत वा नदीत फेऱ्या मारीत राही. अंधाऱ्या रात्रीं जेव्हां उत्तर ध्रुवाचा ताराहि दिसत नसे, तेव्हां उत्तरेच्या बाजूस झाडावर जमणाऱ्या शेवाळाची ती पाहणी करी व त्यावरून तिला स्वातंत्र्यभूमीचा तपास लागत असे. कांहीं वेळां सर्वच उपाय निष्फळ वाटत. पण ती आपल्या बांधवांना असें कधींच सांगत नव्हती. तथापि अशी परिस्थिति आली कीं, ती परमेश्वराची प्रार्थना करी, 'परमेश्वरा! सहा संकटांत तूं माझ्याबरोबर होतास, आतां सातव्या वेळींहि हात दे!' ही प्रार्थना तिची आवडती प्रार्थना होती. तिनें बारा वर्षांच्या काळांत आपल्या गुलाम बांधवांना सोडविण्यासाठीं एकोणीस वेळां दक्षिणेकडे प्रवास करून जीव धोक्यांत घातला

होता. त्यामुळें कांहींची अशी समजूत झाली होती कीं, हॅरियटजवळ कांहीं जादू आहे. तिनेंच म्हटलें आहे "माझी गाडी कधीं मार्ग सोडून जात नाहीं व मी कोणताहि उतारू चुकवीत नाहीं."

तिनें तिच्या आई-वडिलांना न्यूयॉर्कमधील ऑबर्न भागांत ती विकत घेत असलेल्या घरीं आणलें, तेव्हां ते सत्तर वर्षांचे होते. १८३३ मध्यें व्हिक्टोरिया राणीनें गुलामगिरी बेकायदेशीर ठरविली होती. तेव्हां कॅनडांत पळून आलेल्या गुलामांना सुरक्षितता होती. म्हणून तिचे आई-बाप प्रथम कॅनडांतील सेंट कॅथेराइन येथें राहिले. पण तेथील थंडी या दोन म्हाताऱ्या जीवांना मानवत नव्हती. शिवाय परकी भूमींत हॅरियटचें कार्य चालूं नव्हतें. तिला स्वतःला आपण पकडले जाऊं, अशी भीति वाटत नसावी. अमेरिकन संयुक्त संस्थानांत ती मन मानेल तशी फिरत असे. ती इतकी प्रसिद्ध झाली होती कीं, प्रसिद्धीची लालसा बाळगली नव्हती तरी कुठेंहि गेली असतां लोक तिला ओळखीत असत. एकदां स्त्रियांना मतदानाचा हक्क मिळावा म्हणून एक सभा घेण्यांत आली, तेव्हां हॅरियट श्रोत्यांत बसली होती. परंतु तिला एकदम मूर्च्छा आली व ती संवयीप्रमाणें झोपीं गेली. त्याबरोबर तेथें जमलेल्या बायकांनीं तिला ओळखलें व जागी झाली तेव्हां आपण व्यासपीठावर असल्याचें तिच्या लक्षांत आलें. तिचें भाषण श्रोत्यांना फार आवडलें. त्या काळांत निग्रो व स्त्रिया या दोघांनाहि मतदानाचा हक्क नव्हता. या दोघांनाहि मतदानाचा हक्क मिळावा, अशी तिची श्रद्धा होती; म्हणून फ्रेडरिक डग्लसप्रमाणें ती या चळवळींत सामील झाली होती.

तिचा चेहरा अगदींच सामान्य होता. पण नेतृत्वाचे गुण जितके तिच्याजवळ होते, तितके ते इतर कोणाजवळ क्वचितच असतील. गुलामांत ती गुप्तपणें वावरत असे. तिला ते मोझेस असेंच म्हणत. १८५४ मध्यें विल्यम वेल्स ब्राउन या नामवंत निग्रो इतिहासकारानें लिहिलें आहे, "जे जे कोणी गुलामगिरीविरोधी परिषदा, सभा, सहली वा जत्रांना जमत, त्यांना एक मध्यम बांध्याची काळी स्त्री न चुकतां दिसे. तिचा वरचा एक दांत पडलेला होता व तिचा चेहरा हंसरा असे. कपडे जाडेभरडे पण नीटनेटके असत. एखादी जुन्या धर्तीची पिशवी तिच्या पाठीवर लटकत असे आणि आपल्या जागेवर बसली कीं, एका मिनिटांत ती झोपींहि जाई.

मोझेस नेतृत्व करीत असलेल्या टोळीपैकीं कोणीहि गुलाम पळून जात असतां पकडला गेला नाहीं." गुलामांना पळवून आणण्यासाठीं केलेल्या या सहली आणि सभा-संमेलनें सोडलीं कीं ती स्वयंपाकिणीचें व मोलकरणीचें काम करी. तिनें कधीं भीक मागितली नाहीं. गरज पडल्यास ती कर्ज घेई. स्वातंत्र्यासाठीं या ना त्या प्रकारें सर्व देणग्या खर्च पडत आणि तिची मिळकतहि प्रायः याच कामीं खर्च होत असे.

यादवी युद्ध सुरू झालें तेव्हां ती सैन्यांत परिचारिकेचें काम करूं लागली, लष्करी स्काउट बनली व बंडखोरांच्या पिछाडीस जाऊन गुप्तहेराचें कामहि ती करीत होती. त्या वेळीं तिच्या या कामाबद्दल तिला मोबदला देण्याचें आश्वासन देण्यांत आलें. तांत्रिक दृष्ट्या परिचारिकेचें शिक्षण घेतलें नसल्यामुळें ती परिचारिका होऊं शकत नव्हती. स्त्री असल्यामुळें सैनिक होणें शक्य नव्हतें. पण तिला सरकारी पास होता. ती सरकारी वाहतुकीच्या साधनांतून फिरे; अनेक धोक्याचीं कामें ती करी आणि लष्करी अधिकाऱ्यांना सल्ला देत असे. कांहीं कामासाठीं तिला अठराशें डॉलर्स देण्याचें ठरलें होतें. पण तिच्या या कामासाठीं तिला एक पै सुद्धां मिळाली नाहीं. हॅरियटला याचें कांहीं वाटत नव्हतें. युद्ध संपल्यानंतर वृद्ध मातापितरांसाठीं तिला पैशाची गरज वाटूं लागली. युद्ध खातें आणि अमेरिकन कॉंग्रेस यांच्याकडे तिचें १८०० डॉलर्सचें देणें फेडून टाकावें असे अर्ज गेले, पण हे पैसे तिला अखेरीस मिळाले नाहींतच.

युद्धकाळांतील हॅरियट टबमनचें कार्य आश्चर्य करण्याजोगें होतें. जनरल स्टीव्हन्सच्या हाताखालीं तिनें साउथ कॅरोलिनांत बॉफर्ट येथें काम केलें. फ्लॉरिडा येथें आव, देवी व पित्तरोग लागलेल्यांना औषधोपचार करण्यासाठीं तिला धाडलें होतें. फोर्ट वॅगनर येथें ती कर्नल रॉबर्ट गोल्ड शॉ यांच्याबरोबर होती. नऊ निग्रो स्काउट व कप्तान यांचें पथक तिनें उभारलें. कर्नल मॉंटगोमेरीबरोबर तिनें कोम्बाहि नदींतील युद्धनौका व १५० निग्रोंच्या पथकावर हल्ला करण्यांत भाग घेतला होता. १० जुलै १८६३ च्या बोस्टन येथील 'कॉमनवेल्थ' च्या अंकांत पुढीलप्रमाणें वर्णन आलें आहे : "निग्रो बाईच्या मार्गदर्शनाखालीं सैन्यानें शत्रूच्या प्रदेशांत हल्ला केला. असंख्य डॉलर्स किमतीचा माल नष्ट झाला. कापसाचे गठ्ठे

व मोठमोठीं निवासस्थानें नाहींशीं करण्यांत आलीं आणि बंडखोरांच्या हृदयांत धडकी बसून सुमारें ८०० गुलाम सोडवून आणले व लाखों डॉलर्सची मालमत्ता मिळविली." हॅरियटबद्दल पत्रांत म्हटलें आहे : " अनेकदां तिनें शत्रूच्या प्रदेशांत शिरकाव केला, त्याची अवस्था पाहून घेतली; अतिशय संकटांतून ती परत येत असे, पण तिला दुखापत झाली नाहीं."

युद्धकाळांत हॅरियट पुढील गीत म्हणत असे :

Of all the whole creation in the East or in the West,
The glorious Yankee nation is the greatest and the best.
Come along ! Come along ! Don't be alarmed,
Uncle Sam is rich enough to give you all a farm.

पूर्व किंवा पश्चिमेकडील कोणत्याहि राष्ट्रांत वैभवशाली यांकी राष्ट्र श्रेष्ठ व सर्वोत्कृष्ट आहे. या ! इकडे या ! घाबरूं नका. तुम्हांला प्रत्येकाला शेत देण्याइतका सॅमकाका श्रीमंत आहे.

तथापि हॅरियट टब्मनजवळ स्वतःचें शेत नव्हतें. ती उदार होती व म्हणून तिच्याजवळ येणारा बहुतेक पैसा ती देऊन टाकीत असे. पैसे देण्यासाठीं नेहमींच निर्वासित असत वा नातेवाईक असत. एखादी चळवळ असे वा अडचणींत सांपडलेले मित्र असत. अब्राहम लिंकननें स्वातंत्र्याच्या सनदेवर सही केली आणि ज्या स्वातंत्र्यासाठीं ती झगडत होती, तें तिनें कायदेशीर बनविलें. त्या वेळीं तिला ४० वर्षें होऊन गेलीं होतीं. हें यादवी युद्ध संपल्यानंतर ती आणखी सुमारें पन्नास वर्षें जगली. ती १९१३ मध्यें वारली तेव्हां ती १०० वर्षांची असावी, असें अनेकांना वाटलें. पण ती ९० वर्षांपेक्षां निश्चित अधिक होती.

तिच्यासंबंधीं अनेक पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत. १८६९ मध्यें आरा एच्. ब्रॅडफर्ड हिचें 'सीन्स इन् दि लाइफ ऑफ् हॅरियट टब्मन' हें पुस्तक प्रसिद्ध झालें आणि त्याच्या विक्रींतून हॅरियटच्या घराचे पैसे देण्यांत आले. रॉचेस्टर येथील आपल्या घरीं तिला व तिच्याबरोबर पळून येणाऱ्या गुलामांना फ्रेडरिक डग्लसनें अनेकदां आश्रय दिला होता. तीं दोघें मित्र बनलीं होतीं. आपल्याबद्दलच्या पुस्तकासंबंधीं हॅरियटनें फ्रेडरिकला लिहिलें असतां त्यानें त्या दोघांत तुलना करणारें पत्र लिहिलें आहे. तो म्हणतो,

" आपल्या दोघांतील तफावत अतिशय उठावदार आहे. मीं आपल्या कार्यासाठीं जें कांहीं केलें व हाल भोगले ते सर्व ज्ञात आहेत आणि मला प्रत्येक वेळीं प्रोत्साहनच मिळत गेलें आहे. तूं मात्र एकटी, अप्रसिद्ध राहून काम करीत होतीस. लोकांनीं मला टाळ्या दिल्या आणि लोकांच्या कौतुकाचा विषय झाल्यामुळें जें समाधान मिळतें, तें मला मिळालें होतें. आणि तूं जें केलेंस तें मात्र घाबरलेल्या, दमलेल्या, चालून जाऊन ज्यांचे पाय फुटले आहेत अशा गुलामांनीं पाहिलें आहे. तूं त्यांना गुलामगिरींतून मुक्त करून स्वातंत्र्य मिळवून दिलेंस व 'परमेश्वर तुझें भलें करो' हा जो आशीर्वाद त्यांनीं अंतःकरणपूर्वक तुला दिला, तेवढेंच तुला मिळालेलें पारितोषिक होय. स्वातंत्र्यावरील तुझी निष्ठा व तुझें शौर्य मध्यरात्रीच्या आकाशानें व ताऱ्यांनीं फक्त पाहिलें."

कांहीं वर्षांनंतर एका दुपारीं ऑबर्न येथील तिच्या घरीं 'न्यूयॉर्क हेराल्ड ट्रिब्यून'चा प्रतिनिधि तिची मुलाखत घेण्यासाठीं आला, तेव्हां त्यानें लिहिलें आहे, " मुलाखत संपवून मी जाण्यास निघालों असतां हॅरियटनें बागेकडे पाहिलें व 'सफरचंदें आवडतात का' म्हणून मला विचारलें. 'आवडतात' असें सांगितल्यावर तिनें विचारलें, " पण तूं कधीं सफरचंदांचें झाड लावलें आहेस काय ? " याला नकारात्मक उत्तर मिळालें.

तेव्हां मग ती वृद्धा म्हणाली, " नाहीं. मग दुसऱ्या कोणीं तरी लावलें असेल. मी तरुण असतां मला सफरचंद आवडत नसे. त्या वेळीं मी म्हणे, 'एक दिवस मी तरुण लोकांना सफरचंदें मिळावीं म्हणून सफरचंदांचीं झाडें लावीन' आणि मीं तसं केलंहि."

तिनें लावलेलें सफरचंदांचें झाड म्हणजेच स्वातंत्र्य होय. हॅरियट टबमन आपण लावलेल्या झाडांना आलेलीं फळें पाहण्यास जिवंत राहिली. न्यूयॉर्क येथील ऑबर्न भागांतील तिचें घर स्मारक म्हणून राखून ठेवण्यांत आलें आहे.

*दलितांचा शिक्षक*

# बुकर टी. वॉशिंग्टन

१८५८ : : १९१५

---

हॅरियट टबमन वारल्यानंतर वर्षानें तिची पुण्यतिथि ऑबर्न भागांतील निवासस्थानीं साजरी झाली, तेव्हां बुकर टी. वॉशिंग्टन एक वक्ता होता. बुकरचा जन्म गुलामगिरींत झाला, पण तो तरुण असतांनाच स्वतंत्र झाला आणि म्हणून फ्रेडरिक डग्लस वा हॅरियट टबमनप्रमाणें त्यास हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या नाहींत. त्याला स्वातंत्र्यासाठीं झगडावें लागलें नाहीं तर शिक्षणासाठीं झगडावें लागलें. तो शिक्षक बनावयाचा होता.

फ्रेडरिक डग्लसप्रमाणें बुकर टी. वॉशिंग्टनचा बाप गोरा होता व आई मळ्यावर स्वयंपाकिणीचें काम करणारी निग्रो गुलाम होती. त्याचा जन्म स्वयंपाकघरांत झाला. तेथील जमीन अस्वच्छ होती व खोलीला खिडक्या नव्हत्या. सतत शेगडी पेटलेली असल्यानें उन्हाळ्यांत भयंकर उष्मा होई आणि हिंवाळ्यांत धुरानें कोंडल्यासारखें होई. एका भिंतींत भोक होतें. त्यांतून रात्रीं मांजर येत-जात असे. खोलीच्या मध्यभागीं जमिनींत थोडें खणलेलें होतें. त्यांत रताळीं ठेवलीं जात व त्यावर फळ्या टाकलेल्या होत्या. लहान असतां या मुलाला बुकर हें एकच नांव होतें. यादवी युद्धानंतर तो शाळेंत जाऊं लागला तेव्हां आपणांस बापाचें नांव, आडनांव वगैरे हवें, हें त्याला कळलें. तोंपर्यंत त्याला हें कांहीं माहीत नव्हतें.

युद्धकाळांत त्याच्या सावत्र बापानें सैन्यांत भाग घेतला. युद्ध संपल्यावर सर्व गुलामांना मुक्त करण्यांत आलें. पश्चिम व्हर्जिनियांतील माल्डन येथें त्यास मिठागरांत नोकरी मिळाली, म्हणून त्यानें आपलें कुटुंब तेथें आणवलें. ज्या वेळेला बुकरच्या मालकानें स्वातंत्र्याचा हुकूमनामा वाचून दाखविला, तेव्हां आठ वर्षांचा बुकर इतर गुलामांच्या बरोबर त्या घराच्या पोर्चमध्यें उभा होता. गुलामांना ते स्वतंत्र झाल्याचें सांगण्यांत आलें. आनंदानें ते नाचत, ओरडत, गात असल्याचें त्यानें पाहिलें व त्यांच्या डोळ्यांतील आनंदाश्रुहि पाहिले. परंतु हा आनंद नंतर फार थोडे दिवस टिकला. बुकरनें या बाबतींत 'अप् फ्रॉम स्लेव्हरी' या आपल्या आत्मचरित्रांत लिहिलें आहे, "आपण स्वतंत्र झालों, आपले आपण मुख्त्यार बनलों, स्वतःचा व स्वतःच्या बायकामुलांचा विचार करून त्यांच्या भवितव्यासाठीं योजना आंखण्याची जबाबदारी आली, या विचारानें त्यांना घेरलें. अँग्लो-सॅक्सन लोक जे प्रश्न शेकडों वर्षें सोडवीत होते, ते एकाएकीं त्यांच्यापुढें येऊन उभे राहिले. निवासस्थान, उदरनिर्वाहाचें साधन, मुलांचें संगोपन व शिक्षण, नागरिकत्व, चर्चची स्थापना व पाठिंबा हे ते प्रश्न होत. त्यांच्या-जवळ पैसा नव्हता, जमीन नव्हती, कांहीं नव्हतें; फक्त स्वातंत्र्य होतें.

पश्चिम व्हर्जिनियांत छोट्या बुकरला मिठागरांत काम देण्यांत आलें. पहांटे चारला कामाची सुरुवात होई. रात्रीं तो व त्याची आई एका जुनाट पुस्तकाच्या आधारें धुळाक्षरें शिकत असत. त्यांना शिकविण्या-साठीं जवळपास कोणी सुशिक्षित इसम नव्हता, म्हणून त्यांचें त्यांनाच शिक्षण घ्यावें लागे. कांहीं दिवसांनीं वाचतां व लिहितां येणारा एक तरुण त्या गांवांत आला. त्याबरोबर सर्व काळ्या लोकांनीं स्वतःजवळील पैसे जमविले व शाळा काढण्यासाठीं त्यांनी ते त्याला दिले. सर्व वयाचे लोक त्याचे विद्यार्थी होते; कारण सर्व निग्रोंना शिकावयाचें होतें. म्हाताऱ्यांना मरणापूर्वी बायबल तरी वाचतां यावें, अशी इच्छा होती. जे दिवसां कामावर जात, त्यांच्यासाठीं हा शिक्षक रात्रीचे वर्ग घेई. ज्यांना केव्हांच वेळ मिळत नसे, ते रविवारीं शाळेंत जाऊन शिक्षण घेत. दिवसां, रात्रीं वा रविवारीं शाळा पूर्ण भरलेली असे. परंतु बुकरचा सावत्र बाप त्याला शाळेंत जाऊं देत नव्हता व यामुळेंच तो निराश झाला होता. मिठागरांत काम करून त्याला

मिळणारे पैसे कुटुंबासाठीं लागत होते. अखेरीस रात्रीच्या वेळीं कांहीं धडे गिरवतां येतील, अशी व्यवस्था झाली. पुढें या सावत्र बापाला दया आली. जर बुकरनें पहांटेपासून सकाळीं शाळा सुरू होईपर्यंत काम केलें, तर सकाळच्या शाळेंत त्याला जाऊं देण्यास तो तयार झाला.

तो शाळेंत आला तेव्हां पुढील प्रसंग घडला : शिक्षकानें प्रत्येक विद्यार्थ्याला नांव विचारलें. कारण तें त्याला नोंदवावयाचें होतें. शिक्षक प्रत्येक रांगेंतून नांवें टिपून घेत फिरूं लागला. त्याबरोबर बुकरच्या हृदयांत धडकी भरली. कारण प्रत्येकाला दोन वा तीन नांवें होतीं, तर त्याला एकच होतें! लाजेनें तो लाल झाला व त्यानें खालीं मान घातली. तो भांबावून गेला व काय करावें, हेंच त्याला कळेना. जेव्हां त्याची पाळी आली, तेव्हां तो एकदम ओरडला : "बुकर वॉशिंग्टन". एकाएकीं वॉशिंग्टन हें नांव त्याच्या तोंडीं कसें आलें, हें त्याला कळलेंच नाहीं. पण तें आलें आणि तेंच त्यानें कायम केलें. नंतर टेलियाफेरो हें आणखी नांव त्यानें मध्यें घातलें. पण हें नांव उच्चारायला व लिहायला कठीण होतें, म्हणून लहानपणापासूनच या मधल्या नांवाचें आद्याक्षरच फक्त उच्चारलें जाई. लोक बुकर टी. या नांवानें त्याला संबोधीत.

तो मोठा झाला व मिठागरांत केवळ भट्टीशीं काम करण्याऐवजीं इतर कामें करणें त्याला शक्य झालें आणि त्याच्या कुटुंबास तो मिळवील तेवढ्या पैशाची गरज असल्यानें तो शाळेंत फार काळ राहूं शकला नाहीं. मिठागरांतून नंतर तो कोळशाच्या खाणींत काम करूं लागला. कोळशाच्या खाणींतील काम केवळ कष्टाचेंच नव्हतें तर धोक्याचेंहि होतें. स्फोट झाल्यास तुकडे होण्याचा धोका होता, त्याचप्रमाणें दगड वगैरे कोसळल्यास कपाळ-मोक्षहि होण्याचा संभव होता. कांहीं वेळां खाणींतील दिवे जात व मग बुकरला अंधारांत चांचपडावें लागे. पण खाणींत काम करीत असतांनाच व्हर्जिनियांतील हॅम्प्टन येथील शाळेंत काम करून शिक्षण घेणें शक्य आहे, असें त्यानें ऐकलें. बुकर टी. नें तिकडे जाण्याचा विचार केला. हळूहळू तो थोडे पैसे सांठवूं लागला. शाळेंत शिक्षण घेण्यासाठीं बाहेरगांवीं जाण्याचा त्याचा निर्धार पाहून आजूबाजूच्या प्रौढांना व म्हाताऱ्यांना कौतुक वाटे. त्यांनीं त्याला मोजे, हातरुमाल, पैसे वगैरे दिले. कुठून तरी त्याला एक

मोडकळलेली बॅग मिळाली. बुकर टी. या वेळीं पंधरा वर्षांचा झाला होता. हॅम्प्टन पांचशें मैल दूर होतें. एक दिवस तो एका जुनाट गाडींतून तिकडे जाण्यास निघाला. गाडींतून जितकें जाण्यास पैसे पुरतील, तेथवर गाडींतून तो जाणार होता. रात्रीं एका जुनाट खानावळीशीं ही गाडी थांबली. उतारूंनीं रात्रीं तेथें जेवण व विश्रांति घ्यावयाची होती. बुकर टी. सोडल्यास बाकीचे उतारू गोरे होते. जेव्हां बुकर टी. टेबलाशीं बसला तेव्हां खानावळीचा मालक भडकला व त्यानें या तरुणाला बाहेर जाण्यास सांगितलें. तो त्याला अन्न वा निवारा देण्यास तयार नव्हता. रात्रभर थंडीनें गारठलेला व भुकेनें व्याकूळ झालेला हा मुलगा रस्त्यावर फिरून अंग गरम ठेवण्याचा प्रयत्न करीत होता. हें सकाळीं गाडी सुरू होईपर्यंत चाललें होतें. आपल्या आत्मचरित्रांत त्यानें नंतर लिहिलें आहे : "माझ्या काळ्या कातडीचा अर्थ काय, हें मला त्या वेळीं प्रथम कळलें. पण हॅम्प्टनला जाण्यास मी इतका अधीर झालों होतों कीं, त्या खानावळवाल्याविषयीं राग धरण्यास मला अवसरच नव्हता."

बुकर टी. रिचमंड येथें पोहोंचला तेव्हां त्याच्याजवळची सर्व पुंजी संपली व म्हणून लाकडी पुलावर त्याला रात्रभर झोपावें लागलें. सकाळीं जेव्हां त्याला पावलांचा आवाज ऐकूं आला तेव्हां तो जागा झाला. त्यानें उठून पाहिलें तेव्हां शेजारींच नदी असून एका बोटींतून सामान उतरत असल्याचें त्यानें पाहिलें. बोटीच्या कप्तानानें त्याला सामान उतरविण्याचें काम दिलें. त्यासाठीं त्याला अनेक दिवस तेथें रहावें लागलें. पण आपल्या पुढल्या प्रवासासाठीं पैसे रहावेत म्हणून तो फूटपाथवरच रात्रीं झोपत होता. त्याच्याजवळ थोडेसे पैसे सांठतांच तो हॅम्प्टनला गेला. वाटेंत कांहीं अंतर तो चालतच गेला. हॅम्प्टन येथें तो आला तेव्हां त्याचें शिक्षण सुरू करण्यास त्याच्याजवळ बरोबर पन्नास सेंट होते. तो शाळेच्या आवारांत शिरला व त्यानें ती तीन मजली भव्य इमारत पाहिली तेव्हां आपण सर्वांत मोठी इमारत पहात असून आपण नंदनवनांतच आहोंत, अशी त्याची भावना झाली. पण मुख्य शिक्षिका मेरी एफ्. मॅकी हिच्यापुढें मळलेल्या कपड्यांनीं, भुकेनें व श्रमानें दमलेल्या अवस्थेंत तो उभा राहिला तेव्हां सर्वच पालटलें. तो कोणी तरी लबाड माणूस आहे, असें तिला वाटूं लागलें व त्याला

शाळेंत घ्यावें कीं नाहीं, याबद्दल तिला विचार पडला. पण तिनें त्याला निश्चित नकार दिला नसल्यानें तो तिच्या कचेरीच्या बाहेर ताटकळत राहिला. इतर विद्यार्थ्यांना त्यांचे वर्ग ठरवून देण्यांत येत असलेले पाहून तो निराश होऊं लागला. अखेरीस मॅकी बाहेर आली व ती म्हणाली, "शेजारची खोली झाडण्याची जरूर आहे. हा झाडू घे व ती स्वच्छ कर."

ही प्रवेश परीक्षा आहे हें बुकर टी.नें ओळखलें. त्यानें ती खोली एकदांच नव्हे तर तीनदां झाडून स्वच्छ केली. सर्व सामान हलवून त्यानें ती झाडली होती. नंतर त्यानें तें सामान जेथल्या तेथें लावून ठेवलें. काम संपल्यावर त्यानें शिक्षिकेला तसें सांगितलें. ती आली व तिनें आपला पांढरा स्वच्छ रुमाल तेथील साहित्यावरून फिरविला. रुमालाला धुळीचा कणहि लागला नव्हता. त्या उत्सुक तरुण निग्रोकडे तिनें पाहिलें व "या संस्थेंत प्रवेश देण्यास तूं योग्य आहेस." असें ती म्हणाली. मुख्य शिक्षिकेनें त्याला द्वारपाळाचें काम दिलें. रात्रीं बऱ्याच उशीरापर्यंत त्याला शाळा स्वच्छ ठेवण्याचें काम करावें लागे व सकाळीं शेगड्या पेटवून उबेची व्यवस्था करावी लागे. हें चालू असतांच बुकर टी.ला शिक्षण मिळूं लागलें व गवंड्याचें कामहि तो शिकला. त्याला चांगलें वाचतां येऊं लागलें. तो चांगला बोलूं लागला व स्नान करूं लागला; आणि गादीवर झोपूं लागला. इतर सात मुलांच्याबरोबर त्याला एका खोलींत रहावें लागत असे. आपण गादीवर चादर वगैरे घालून कधीं झोंपलों नाहीं हें त्या मुलांना कळूं नये, असें तर त्याला वाटत होतेंच; पण त्या चादरींचें काय करावें, हेंहि त्याला ठाऊक नव्हतें. पहिल्या रात्रीं त्यानें दोन्ही चादरी अंगावर घेतल्या. दुसऱ्या रात्रीं त्या त्यानें दोन्ही अंगाखालीं घेतल्या. मग एक अंगाखालीं व एक अंगावर घ्यावयाची असते, हें त्याला कळलें. १८७५ मध्यें हॅम्प्टन शाळेंतून तो सन्मानपूर्वक पदवी घेऊन बाहेर पडला.

या संस्थेचा संस्थापक जनरल आर्मस्ट्रॉंग व इतर गोरे शिक्षक दक्षिणेंत मुक्त झालेल्या निग्रोंना शिक्षण देण्याच्या कामीं मदत करण्यास आलेले होते. त्या सर्वांचा बुकर टी.च्या मनावर परिणाम झाला होता. त्यांचा त्याग, कष्ट, सहानुभूतिपूर्वक वागणूक व विद्यार्थ्यांच्या प्रश्नांची जाणीव यांचा त्याच्या मनावर प्रभाव पडला होता. कांहीं विद्यार्थी शिक्षकांपेक्षांहि वयानें

मोठे होते. मिस् मॅकीं ही न्यू इंग्लंडची होती. तिची आपल्या कार्यावर अतिशय निष्ठा होती. जेव्हां शिक्षणाचें काम चालू नसे, तेव्हां ती बुकर टी.-बरोबर शाळा स्वच्छ करण्याचें काम करी. या सर्व शिक्षकांबद्दल त्यानें नंतर लिहिलें आहे : " हीं किती विलक्षण माणसें होतीं ! रात्रंदिवस, बारा महिने-तेरा काळ हे शिक्षक विद्यार्थ्यांसाठीं झटत होते. युद्धानंतर निग्रोंच्या शिक्षणासाठीं गोऱ्या अमेरिकन शिक्षकांनीं किती कष्ट केले, याची हकीगत जेव्हां लिहिली जाईल—व ती लवकर लिहिली जाईल अशी अपेक्षा आहे—तेव्हां आपल्या या देशाच्या इतिहासांतील तो अत्यंत रोमांचकारक भाग ठरेल."

शाळेची इमारत अपुरी पडूं लागली आणि संस्थापक आर्मस्ट्रॉंग यांना तर कोणाहि प्रवेश मिळवूं पाहणाऱ्या विद्यार्थ्याला परत धाडावयाचें नव्हतें. तेव्हां त्यांनीं तंबू ठोकले. आणि हिंवाळ्यांतहि या तंबूंत आपखुषीनें झोपण्यास कोण तयार आहेत म्हणून विचारलें. तेव्हां एकजात सर्व विद्यार्थी तयार झाले. इतकें विद्यार्थ्यांचें त्यांच्यावर प्रेम होतें. बुकरहि त्या वर्षी थंडीमध्यें तंबूंत झोपणारांपैकीं एक होता. कधीं कधीं रात्रीं हे तंबू उडूनहि जात. पण अगदीं सकाळीं जनरल आर्मस्ट्रॉंग येत आणि त्यांचा आनंदी चेहरा पाहून विद्यार्थ्यांची निराशा पार निघून जाई. बुकर टी.ला जनरल आर्मस्ट्रॉंगप्रमाणें व्हावयाचें होतें, म्हणून तोहि पुढें दलितांचा शिक्षक झाला.

शिक्षणक्रम पुरा झाल्यावर तो आपल्या माल्डन गांवीं परत गेला. आणि सकाळीं आठपासून कधीं कधी रात्रीं दहापर्यंतहि तो शिकवूं लागला. ज्या तरुणानें त्याला पहिले धडे दिले होते, तो निघून गेला होता. तेव्हां तरुण बुकर टी. हा एकटाच शिक्षक उरला होता. दिवसांइतकेच रात्रीच्या वर्गांतहि विद्यार्थी येत, कारण अनेक कामगारांना शिक्षणाची ओढ लागली होती. रविवारीं तो एक शहरांत व एक ग्रामीण भागांत अशा दोन शाळा चालवी. त्यांतच त्याच्याप्रमाणें ज्यांना हॅम्प्टनला जावेंसें वाटत होतें, त्यांना खाजगी रीत्या शिक्षण देण्यासहि त्यानें आरंभ केला. त्याचा मोठा भाऊ खाणींत काम करीत होता. त्यानें शिक्षण घ्यावें, असें बुकर टी.ला वाटत होतें. म्हणून त्यानें त्याला शिकविण्यास सुरुवात केली व त्यानें हॅम्प्टनला जावें, म्हणून त्यानें त्याला प्रोत्साहन दिलें. माल्डन येथून जे जे विद्यार्थी

बुकर टी. हॅम्प्टनला पाठवी, त्यांच्या बाबतींत जनरल आर्मूस्ट्रॉंग यांचा अतिशय चांगला ग्रह झाला होता. या विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षक मिळाल्या-बद्दल त्यांची खात्री झाली. म्हणून मग त्यांनीं बुकर टी.ला हॅम्प्टन येथें शिक्षकाचें काम करण्यासाठीं व शेजघरावर देखरेख ठेवण्यासाठीं बोलाविलें. त्या वेळी आणखी शंभर इंडियन तेथें शिक्षण घेण्यासाठीं यावयाचे होते. या इंडियनांची व बुकर टी.ची चांगली गट्टी जमली. निग्रो विद्यार्थ्यांनीं या रेड इंडियनांना आपल्या खोलींत सहाध्यायी म्हणून आनंदानें घेतलें व त्यांना इंग्रजी शिकण्यास मदत केली. बरींच वर्षें निग्रो व इंडियनांना शिक्षण देणारी हॅम्प्टन ही अमेरिकेंतील सर्वांत पुढारलेली संस्था होती. बुकर टी. हा या रेड इंडियनांचा 'पिता' होता.

परंतु १८८१ मध्यें अल्बामांतील टस्केजी येथील निग्रो वसाहतींत शाळा चालविण्यासाठीं त्याला बोलावणें आलें. एक निग्रो चांभार व गोरा बॅंक-नोकर या दोघांनीं मिळून जनरल आर्मूस्ट्रॉंग यांना पत्र लिहून, हें काम करण्यासाठीं लायक माणूस पाठविण्याची विनंती केली होती. तेव्हां आर्मूस्ट्रॉंगनीं बुकर टी.ला पाठविलें. टस्केजीला तो गेला व तेथें एका मोडकळीस आलेल्या चर्चमध्यें शाळा सुरू झाली. या शाळेंत पंधरा वर्षांपासून चाळीस वर्षांपर्यंतचे विद्यार्थी येत व तो एकटाच शिक्षक होता. शाळेंत कांहीं साधनसामुग्री नव्हती. पण 'ते शेंकडों प्रामाणिक व ज्ञानपिपासू विद्यार्थी' घेऊन बुकर टी.नें आपलें कार्य सुरू केलें. प्रथम या शाळेच्या छपराला अनेक भोकें होतीं. एकदां पाऊस आला तेव्हां एका विद्यार्थ्यानें बुकर टी.च्या डोक्यावर छत्री धरली व अशा रीतीनें वर्ग चालू झाला. अल्बामाच्या विधिमंडळानें शाळेची इमारत वा मैदान यासाठीं एक पैसुद्धां मंजूर न करतां शिक्षकांच्या पगारासाठीं दोन हजार डॉलर्स मंजूर केले, तेव्हां बुकर टी. व त्याचे विद्यार्थी यांनीं निधि गोळा करून जमीन खरेदी करण्याचा व शाळागृह उभारण्याचा निर्णय घेतला. त्यांचा हा निश्चय प्रत्यक्षांतहि उतरला. त्यांनीं स्वतःच पाया घातला व शाळा बांधली. एकच व तीहि गळकी खोली असतां टस्केजींत कालांतरानें डझनावारी उत्तम शाळागृहें उभीं राहिलीं. एकच शिक्षक जेथें होता, तेथें शंभर शिक्षक आले आणि तीस विद्यार्थी जेथें होते, तेथें ही संख्या तीन

हजारांवर गेली. टस्केजीची अशी भरभराट होऊन जगांतील एक अत्यंत नामवंत अशी मूलोद्योगी शिक्षणसंस्था असा लौकिक झाला आणि बुकर टी. वॉशिंग्टन हा अमेरिकेंतील एक प्रख्यात नागरिक बनला.

बुकर टी.नें आपली शाळा सुरू केल्यानंतर वर्षभरानें दक्षिणेंत सुमारें शंभर निग्रोंना जबर शिक्षा ठोठावण्यांत आल्या. कुक्लक्स क्लान या टोळीनें लोकांच्या मनांत धडकी भरविणारीं कृत्यें सुरू केलीं. संघराज्याच्या घटनेनें स्वतंत्र झालेल्या काळ्या लोकांना मतदानाचा हक्क दिला होता; पण घटक राज्यांनीं कायदे करून तो रद्द केला. पूर्वग्रह व दारिद्र्य, अज्ञान व निराशा यांचेंच राज्य या स्वतंत्र नागरिकांच्या जीवनांत सुरू झालें. अशा स्थितींत अल्बामामधील एक तरुण शिक्षक काय करणार? प्रथम निग्रो लोकांना काम चांगल्या रीतीनें कसें करावें, स्वच्छ व आरोग्यसंपन्न कसें व्हावें, स्वतःचा मान कसा राखावा, स्वतःचें घर व आवार कसें स्वच्छ ठेवावें आणि जमीन कशी लागवडीस आणावी, हें शिकवावयास हवें होतें. म्हणून आपल्या विद्यार्थ्यांनीं स्वहस्तानें शाळागृह बांधावें, अशी बुकर टी.नें योजना काढली. म्हणजे इतर कोणावर अवलंबून न राहतां स्वतःच घरबांधणी करण्याचें शिक्षण त्यांना मिळेल, असा त्याचा हेतु होता. म्हणून त्याच्या शाळेनें प्रथम जी जमीन खरेदी केली, तीमधील कांहीं भाग त्यानें शेतीची लागवड करण्यासाठीं राखून ठेवला. लवकरच त्यानें जनावरें खरेदिलीं व विद्यार्थ्यांना त्यांच्या संगोपनाचें कार्य शिकविलें. या सर्वांमागें स्वतःच्या हातानें काम करण्याचा आणि 'अगदीं साधी गोष्टहि अलौकिक रीतीनें करण्याचा' अभिमान होता. त्यानें ताबडतोब त्या गरीब, अशिक्षित, गांवढळ लोकांच्या गरजांनुसार आपली शाळा बनविण्याचा प्रयत्न सुरू केला. शेतांत व मळ्यांत जाऊन लागवडीच्या या कामांत नवीन पद्धति आणि कल्पना कशा उपयोगांत आणतां येतील, तें लोकांना दाखवितां यावें, इतकेंच नव्हे तर नैतिक व धार्मिक जीवनांतहि या कल्पनांचा उपयोग करण्याचें प्रात्यक्षिक दाखवितां यावें, या दिशेनें त्यानें आपल्या विद्यार्थ्यांना तयार करण्यास प्रारंभ केला. गृहकृत्यें व शेतीचीं प्रात्याक्षिकें दाखविणारी टस्केजीची संस्था ही तशी पहिलीच संस्था होय. पुस्तकें, साधनसामुग्री व शिक्षकांना

...लय, ठाणें. स्थळप्रत
22760 दि:
...२८६ नों: दि: ३०।१।१९..

मोटरमधून ग्रामीण भागांत नेऊन त्यांच्याकरवीं हीं प्रात्यक्षिकें दाखविणारी ही फिरती शाळा, ही सुद्धां अभिनव होती.

प्रथमपासूनच ग्रामीण भागांतील गोऱ्या व काळ्या लोकांपैकीं बहुतेक सर्वांचें साहाय्य व सल्ला बुकर टी.ला मिळत होता. ज्यांनीं बरेच दिवस गुलामगिरींत घालविले होते, अशीं अगदीं गरीब आणि म्हातारीं माणसें-सुद्धां पैसे, ऊंस, रजया, कापूस वगैरेंची भेट आणून देत. एकदां एक सत्तर वर्षांहून अधिक वयाची, फाटकेतुटके कपडे घातलेली बाई काठी टेकीत प्रिन्सिपॉलच्या खोलींत आली. तिच्या हातांत एक टोपली होती. आंत आल्यावर ती म्हणाली, "श्रीयुत वॉशिंग्टन, माझें बहुतेक आयुष्य गुलामगिरींत गेलें आहे, हें एक परमेश्वराला माहीत. मी अज्ञानी व गरीब आहें, हें तो जाणतो. पण तुम्ही काळ्या लोकांतून चांगले स्त्री-पुरुष तयार करतां आहांत, हें मला कळलें आहे. माझ्याजवळ पैसे नाहींत, पण हीं सहा अंडीं आहेत. तीं मीं जपून ठेवलीं होतीं. तुम्ही तीं या मुलांमुलींच्या शिक्षणासाठीं वापरा!" यानंतर अनेक मोठमोठ्या देणग्या श्रीमंत आणि कीर्तिमान् लोकांकडून टस्केजीच्या संस्थेला मिळाल्या. अॅन्ड्र्यू कार्नेजीनें तर या संस्थेला पांच लाखांवर डॉलर्सची देणगी एकदम दिली. पण या म्हातारीनें दिलेल्या सहा अंड्यांच्या देणगीनें बुकर टी. वॉशिंग्टनला जेवढी कृतज्ञता वाटली, तितकी इतर देणग्यांनीं वाटली नाहीं.

बुकर टी. नंतर आंतरराष्ट्रीय ख्यातीचा गृहस्थ झाला. पण आयुष्यभर तो ज्या लोकांत राहिला व ज्यांना त्यानें शिकविलें, त्यांच्याशीं त्यानें कधीं संबंध तोडला नाहीं. अध्यक्ष मॉकर्नले व त्यांचे मंत्री यांनीं टस्केजीला भेट दिली. अध्यक्ष थिओडोर रूझवेल्ट यांनीं व्हाइट हाउसमध्यें बुकर टी.ला भोजनासाठीं बोलावलें होतें. इंग्लंडला त्याने भेट दिली, तेव्हां विंडसर राजवाड्यांत तो व्हिक्टोरिया राणीचा पाहुणा म्हणून राहिला होता. पण तो मरेपर्यंत टस्केजी शाळेचा प्रिन्सिपॉल म्हणूनच राहिला आणि या काळ्या लोकांची सभा असली व तो तेथें असला तर तो त्यांच्यांत जाऊन मिसळत असे; त्यांच्याशीं गप्पागोष्टी, थट्टा-विनोद करी; त्यांच्याबरोबर भोजन करी आणि त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठीं मदत करी. वॉशिंग्टन हा अगदीं सामान्य काळ्या लोकांच्या घरींहि मोकळेपणानें वागे आणि गोऱ्या

१९२८



लोकांच्या शाही घरांतहि तो तसाच वागत असे. त्यामुळेंच अमेरिकेच्या गोऱ्या व काळ्या लोकांतील तो एक दुवा होऊन बसला होता. टस्केजी येथील शिक्षणतज्ज्ञ यापेक्षां वांशिक प्रश्नावरील एक अधिकारी मुत्सद्दी म्हणूनच तो ओळखला जाऊं लागला होता. त्याच्या प्रौढावस्थेंतील कांहीं वर्षे अमेरिकन समाजांतील वांशिक संबंधाच्या दृष्टीनें मोठीं कठीण होतीं. नव्यानें मुक्त झालेल्या निग्रोंनीं प्रगति करण्याच्या दृष्टीनें पुढें पावलें टाकण्याचा निर्धार केला होता; पण या काळ्या लोकांनीं प्रगति करतां कामां नये, असा आग्रह धरणारे कांहीं गोरे अमेरिकन होते. दक्षिणेंतील संस्थानांत निग्रोंसाठीं शाळा चालवून आपलें जीवित या शिक्षणकार्यांत खर्च करण्यासहि कांहीं गोरे तयार होते. पण कुक्लस क्लानवाले शाळा जाळून शिक्षकांना पळवून लावण्याचे उद्योग करीत. हे टोळीवाले रात्रीं भटकत आणि निग्रोंना व त्यांच्या गोऱ्या मित्रांना धमक्या देत.

दक्षिणेंत गोऱ्या व काळ्या वंशाच्या लोकांत शांतता व सहकार्य नांदावें म्हणून बुकर टी. वॉशिंग्टननें एक मार्ग काढला होता. तो म्हणत असे, " दक्षिणेंतील निग्रोंच्या उद्धाराची कोणतीहि चळवळ यशस्वी व्हावयाची असेल, तर दक्षिणेंतील गोऱ्या लोकांचें कांहीं ना कांहीं सहकार्य या चळवळीला मिळालें पाहिजे." याच हेतूनें त्यानें १८९५ मध्यें अटलांटा येथें त्याचें तें प्रसिद्ध भाषण केलें. हजारों लोकांच्या श्रोतृसमुदायापुढें भाषण करतांना वॉशिंग्टन सुरुवातीसच म्हणाला, " या दक्षिणेंतील लोकसंख्येच्या एक-तृतीयांश लोकसंख्या निग्रोंची आहे." नंतर एका बोटीवरचें पाणी संपलें म्हणून त्या बोटीनें समुद्रांतून जाणाऱ्या दुसऱ्या बोटीला कशी खूण केली, यासंबंधींची त्याची प्रख्यात गोष्ट त्यानें याहि सभेंत कथन केली. दुसऱ्या बोटीनें बादल्या देण्याची खूण केली. शेवटीं बादल्या देण्यांत आल्या. तेव्हां पहिल्या बोटीवरील लोकांना आपण ताज्या पाण्याच्या प्रदेशांत आलों आहोंत असें वाटलें. हें सांगून झाल्यावर वॉशिंग्टन म्हणाला, " माझ्या वंशांतील ज्या लोकांना दक्षिणेंतील गोऱ्या लोकांच्याबरोबर मैत्रीचे संबंध वाढविण्याचें महत्त्व पटत नाहीं, त्यांना मी सांगतों कीं, तुम्ही जेथें असाल तेथें तुमच्या बादल्या खालीं सोडा. आपण ज्या लोकांकडून वेढलों गेलों आहोंत, त्यांच्याशीं मैत्री करण्यासाठीं त्या खालीं ठेवा. शेती, यंत्रविद्या,

व्यापार, घरगुती काम आणि इतर व्यवसायांत हेंच करा. कविता करण्याप्रमाणेंच शेती करण्यांतहि प्रतिष्ठा आहे, हें ज्या वंशाच्या लोकांना पटत नाहीं त्यांची भरभराट होऊं शकणार नाहीं. माझ्या वंशबांधवांना मी जें सांगतों, तेंच मी गोऱ्या लोकांनाहि सांगूं शकतों. त्या बोटीवरील लोकांप्रमाणें तुम्हीहि बादल्या खालीं सोडा. या ८० लाख निग्रोंसाठीं तुम्ही त्या खालीं सोडा. ज्या या लोकांनीं संप वा झगडा न करतां तुमची शेती केली, जंगलें साफ केलीं, रेल्वेमार्ग बांधले व शहरें उभारलीं आणि जमिनीच्या पोटांत शिरून संपत्ति आणली, त्यांच्यासाठीं तुम्ही हें करा." आणि नंतर त्याची ती प्रख्यात उक्ति बाहेर पडली. तो म्हणाला, "सामाजिक गोष्टी असतील त्या बाबतींत हाताच्या बोटांप्रमाणें आपण अलग होऊं या; पण परस्परांची प्रगति करण्याच्या बाबतींत एका हातासारखे बनूं या. सर्वांची बौद्धिक शक्ति वाढल्याशिवाय व आपला विकास झाल्याखेरीज आपलें संरक्षण होणें शक्य नाहीं."

त्यानंतर पुढें वीस वर्षेपर्यंत म्हणजे १९१५ मध्यें तो मरण पावेपर्यंत निग्रो नागरिकांच्या बाबतींत कोणताहि प्रश्न उद्‌भवला, तर समाजनेते वा राजकारणा नेते बुकर टी. वॉशिंग्टनचा सल्ला घेत. निग्रो व काळ्या लोकांच्या संबंधांत तो अधिकारी पुरुष गणला जाई. देशभर त्याला व्याख्यानांचीं शेंकडों आमंत्रणें येत. अटलांटा येथें बुकर टी. नें केलेलें भाषण व त्यांत स्पष्ट केलेला कार्यक्रम यांच्याशीं कांहीं जण सहमत होते, तर त्यानें अमेरिकन जीवनांतील प्रत्येक क्षेत्रांत निग्रोंचे हक्क काय, हें स्पष्ट केलें नाहीं, अशी टीका कांहीं करीत. या दोघांत म्हणूनच बराच काळ वाद चालला होता. मोठमोठ्या महत्त्वाकांक्षा बाळगण्याऐवजीं छोट्यामोठ्या संधींचा फायदा घ्यावा, अशी त्याची धारणा असल्यानें कांहीं लोक त्याला संधिसाधू मानीत. वंशवादावर वा वंशद्वेषावर तो फारसा भर देत नसे, तर प्राप्त परिस्थितींत जें उत्कृष्ट असेल तें करावें, असें सांगत असे. त्यामुळ कांहीं त्याला 'टॉम काका' म्हणत असत. त्याच्या उत्तर आयुष्यांत तर तो वादाचा मोठाच विषय होऊन बसला.

पण या वादामुळें त्याची कीर्ति कमी झाली नाहीं. टस्केजी येथील शाळा वाढत गेली व तें एक छोटें शहरच बनलें. हॉर्वर्ड विद्यापीठानें त्याला 'मास्टर ऑफ आर्ट्स्' ही पदवी दिली, तर डॉर्टमाउथ कॉलेजनें त्याला

'डॉक्टर ऑफ लॉज्' ही पदवी बहाल केली. प्रख्यात निग्रो शिल्पकार रिचमंड बार्थे यानें केलेला त्याचा अर्धपुतळा न्यूयॉर्क विद्यापीठाच्या 'हॉल ऑफ फेम'मध्यें अजूनहि आहे. टस्केजी येथेंच बुकर टी. वॉशिंग्टनचें थडगें आहे. या टस्केजींत त्याला प्रिय असलेल्या ग्रामीण भागांतील मुलें व मुली शिक्षण घेण्यासाठीं येत असतात. कॉँग्रेसच्या ग्रंथालयांत त्याचीं पत्रें व भाषणें यांचा संग्रह आहे. 'अप् फ्रॉम् स्लेव्हरी' या नांवानें त्याचें आत्मचरित्र प्रसिद्ध असून त्याचें अनेक भाषांत भाषांतर झालें आहे व तें जगांतील अनेक ग्रंथालयांत आहे.

झुंझार पत्रकार

# रॉबर्ट एस्. अबॉट

१८७० : : १९४०

---

जॉर्जियाच्या किनाऱ्याच्या बाजूस असलेल्या सेंट सायमन्सच्या बेटावर रॉबर्ट सेंग्स्टॅक अबॉट याचा जन्म १८७० मध्यें झाला. त्याचा बाप धर्मगुरु होता. रॉबर्ट सावान्हा येथें प्रथम कांहीं दिवस होता. तेथील बीच इन्स्टिटयूटमध्यें तो जात असे. नंतर दक्षिण कॅरोलिनामधील ऑरनूबर्ग येथील क्लाफिन इन्स्टिटयूटमध्यें त्यानें शिक्षण घेतलें. पुढें तो हॅम्प्टन येथें गेला व मुद्रण-व्यवसाय शिकून त्याची पदवी त्यानें घेतली. लहानपणापासूनच त्याला वाचनाची आवड होती आणि सुदैवानें त्याच्या घरींच चांगला ग्रंथसंग्रह होता. 'साव्हाना न्यूज' या पत्राच्या छापखान्यांत तो शिकाऊ मुद्रक म्हणून प्रथम काम करीत होता व म्हणून त्याला वृत्तपत्रीय व्यवसायाची माहिती झाली होती. परंतु मुद्रणव्यवसायांत पुढें येण्यास दक्षिणेंत निग्रोंना वाव नसल्यामुळें अबॉट तरुणपणींच शिकागो येथें स्थायिक झाला. १८९६ मध्यें मुद्रक संघटनेचा सदस्य होण्यासाठीं त्यानें अर्ज केला; पण निग्रोंना सभासद करून घेण्यास ही संघटना उत्सुक नसल्यानें निष्कारण वेळ दवडण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असा त्याला सल्ला मिळाला. तथापि या संघटनेंत शिकागोमधील सर्वच मोठे छापखाने सामील झाल्यामुळें तींत सामील होण्याचा त्यानें निश्चय केला. निग्रो असल्यामुळें त्याला काम मिळणें मात्र कठीण झालें. इतकेंच नव्हे तर निग्रोंना काम देऊं नये, असें ही संघटनाच छापखानेवाल्यांना सांगत असल्याचें अबॉटला आढळलें.

या व्यवसायांत कांहीं शिरकाव होत नाहीं, असें पाहून निराश होऊन त्यानें केंट कॉलेजांत कायद्याचा अभ्यास करून पदवी घेतली आणि शिकागो व गॅरी येथें तो वकिली करूं लागला. परंतु मुद्रणव्यवसाय त्याला अतिशय आवडत असे; छापखान्याला लागणाऱ्या शाईचा वासमुद्धां त्याला प्रिय होता. तेव्हां एक वृत्तपत्र सुरू करावें व मग कालांतरानें छापखाना विकत घ्यावा, असा त्यानें विचार केला. शिवाय निग्रोंच्या पुढें अनेक प्रश्न असल्यानें त्यांच्या तक्रारींना वाचा फोडण्यासाठीं निग्रोंचें एक मुखपत्र असणें जरूर आहे, असें त्याला वाटलें. रोजगार मिळविण्याच्या बाबतींत निग्रोंना लोकशाही हक्कांचा उपभोग घेतां यावा, तसेंच नागरी हक्क व शिक्षणहि मिळवितां यावें, यासाठीं प्रयत्न करण्याकरितां वृत्तपत्र असणें जरूर आहे, असें त्याचें मत झालें. ज्या दिवशीं त्यानें आपलें वृत्तपत्र सुरू केलें तेव्हां त्याच्याजवळ पंचवीस सेंट्स्, एक टेबल व एक खुर्ची एवढेंच भांडवल होतें. स्टेट स्ट्रीटवरील एका घराच्या तळघरांत एका बाईनें त्याला भाड्यानें जागा दिली. हें तळघर तिचें स्वयंपाक घर म्हणूनहि उपयोगी पडत होतें. अबॉट जाहिराती मिळविणें, अग्रलेख लिहिणें, बातम्या मिळवणें वगैरे कामें स्वतःच करी. इतकेंच नव्हे तर या पत्राची छपाई व विक्रीचें काम तोच करीत होता. त्याच्या 'शिकागो डिफेन्डर' या पत्राचा पहिला अंक ५ मे १९०५ ला निघाला व त्याच्या ३०० प्रती छापण्यांत आल्या होत्या. त्यासाठीं कागद-छपाईचा खर्च १३·७५ डॉलर्स इतका आला. एक डॉलर देऊन त्याचे तीन मित्र वार्षिक वर्गणीदार झाले. साप्ताहिक काढून प्रत्येक अंकाला पांच सेंट्स् किंमत ठेवण्याचें ठरलें. पण पहिला अंक बाहेर पडल्यापासूनच मागणी वाढत गेली व त्यामुळें अधिकाधिक प्रती छापाव्या लागत. हळूहळू या साप्ताहिकाचा आकारहि वाढत गेला आणि वर्गणीदारांची संख्याहि वाढत चालली. पुढें तर ही संख्या अडीच लाखांवर जाऊन 'शिकागो डिफेन्डर' हें अमेरिकेंतील एक प्रभावी व वजनदार वृत्तपत्र बनलें.

दक्षिणेंत असतां लहानपणीं तो वृत्तपत्रें चाळत असे. तेव्हां निग्रोंनीं केलेले गुन्हे, त्यांना बेदम मार मिळाल्याचे प्रसंग, यांचींच वर्णनें वृत्तपत्रांत येत असल्याचें त्यानें पाहिलें होतें. जेव्हां सान्हानामधील कोणा निग्रोचा मृत्यु होई, किंवा कोणाचा विवाह होई वा कोणी एखादें चर्च बांधून देई,

तेव्हां त्याचा उल्लेखहि वृत्तपत्रांत येत नसे. कोणत्याहि निग्रोचें, अगदीं बुकर टी. वॉशिंग्टनचेंहि छायाचित्र न छापण्याचा नियमच बहुतेक वृत्त-पत्रांनीं केला होता. निग्रो स्त्री-पुरुषांबद्दल लिहितांना त्यांच्यामागें श्रीमती व श्री. ते लावीत नसत. उत्तरेंतसुद्धां इतर बातम्यांपुढें निग्रोंच्या चळवळी-हालचालींना कांहीं प्राधान्य मिळत नसे. पण जर त्यांच्याकडून गुन्हा झाला, तर मात्र त्याचा वृत्तान्त ठळकपणें येत होता. निग्रो विद्यार्थी-विद्यार्थिनी शाळा-कॉलेजांतील परीक्षांत उत्तीर्ण होत, पारितोषिकें मिळवीत किंवा खाना वगैरे देत, तेव्हां त्यांनाहि आपलीं छायाचित्रें वृत्तपत्रांत यावींत, असें वाटे. म्हणून शिकागो येथील निग्रोंना त्यांच्या हालचालींचा वृत्तान्त कळावा आणि त्याचबरोबर संपादकीय स्तंभांतून त्यांचें लोकशाही नेतृत्व करावें या दुहेरी हिशोबानें अबॉटनें 'शिकागो डिफेन्डर' सुरू केलें. हळूहळू त्याचा प्रसार वाढून देशाच्या कानाकोपऱ्यांत त्याची विक्री होऊं लागली व एक राष्ट्रीय पत्र म्हणून त्याचा लौकिक झाला. परंतु सर्वांना समान हक्क देण्या-बाबत या पत्राचा अतिशय आग्रह असल्यामुळें दक्षिणेंतील कांहीं लोक त्याच्या विक्रीस प्रतिबंध करीत. मतपेटी हाच लोकशाहीचा पाया आहे, असें या पत्राचें मत होतें; आणि जॉर्जियांत तर निग्रोंना मतदानाचा हक्कच नव्हता. त्यामुळें हें पत्र जवळ बाळगणें म्हणजे गुन्हा करणें वा दंग्याला चिथावणी देणें, असें मानलें जाई.

अबॉटनें 'डिफेन्डर' पत्र सुरू केलें, तेव्हां शिकागोमधील निग्रोंची लोकसंख्या सुमारें ४० हजार होती. परंतु पहिल्या महायुद्धाच्या वेळीं अनेक युद्धोपयोगी कारखाने सुरू झाले व म्हणून उत्तरेंत निग्रोंचे लोंढेच्या लोंढे आले आणि १९२० च्या सुमारास शिकागोमध्यें निग्रोंची संख्या एक लाखावर गेली. हजारों लोक सैन्यांत गेले होते. म्हणून मजुरांचा तुटवडाच निर्माण झाला होता. तेव्हां ज्या कारखान्यांपासून व फौन्ड्रीपासून काळ्या लोकांना खड्यासारखें बाजूला टेवले जात होतें, त्यांना तेथें नोकऱ्या मिळूं लागल्या. अधिकाधिक काळ्या लोकांना नोकऱ्या मिळाव्या असा 'डिफेन्डर'चा आग्रह चालू होताच. याच काळांत अबॉटनें एकदां लिहिलें आहे : "असा कोणताहि व्यवसाय नाहीं कीं, जेथें आम्ही आमचा जम बसवूं शकत नाहीं. जे कारखाने, गिरण्या, वगैरे आपणांस बंद होत्या, त्यांचे दरवाजे आत

गरज उत्पन्न झाल्यामुळें आपणांसाठीं उघडले आहेत. आपल्याला ही संधि दिली जात आहे ती कांहीं मनापासून नाहीं, तर परिस्थितीनें तशी निकडच निर्माण केली म्हणून होय. जेव्हां सर्वसमर्थ असा पैसा हातचा जाण्याचा प्रसंग येतो, तेव्हां सर्व पूर्वग्रह आपोआप वितळतात......हळूहळू पण निश्चितपणें एकेका व्यवसायांत एकेकाचा शिरकाव होत आहे व त्याचा पाय रोवूं लागला आहे; आणि तो आपल्या बंधूला जागा करून देऊं लागला आहे. याचमुळें वंशभेदाचा हा प्रश्न सुटेल. निरनिराळ्या वंशांची एकमेकांना चांगली ओळख होण्याचाच हा प्रश्न आहे. आपण सर्व अमेरिकन आहोंत व आपणांला एकत्रच राहिलें पाहिजे. मग आपण सुखासमाधानानें कां राहूं नये ?"

मतदानावर 'शिकागो डिफेन्डर'चा दृढविश्वास होता, म्हणून मतदारांच्या यादींत नांवें नोंदवून निग्रोंनीं आपले स्वतःचे प्रतिनिधि सत्तापदासाठीं निवडण्याचा उपदेश हें पत्र सतत करीत असे. लवकरच शिकागो येथील नगरपालिकेंत निग्रो नगराध्यक्ष झाला. इलिऑनिस विधिमंडळांत निग्रो प्रतिनिधि बसूं लागले. आणि वॉशिंग्टन येथील कॉंग्रेससाठींहि ऑस्कर व प्रिस्ट येथून एक निग्रो प्रतिनिधि निवडला गेला. राजकीय दृष्ट्या निग्रोंनीं जी ही कमाई केली, त्यास संपादक अबॉटनें केलेली कामगिरी बरीचशी कारणीभूत झाली आहे. आपल्या लोकशाही हक्कांचा उपभोग घेण्याचा तो नेहमींच उपदेश करी. पण त्याचबरोबर निग्रोंना त्यांचीं नागरिक व राष्ट्रीय कर्तव्यें पार पाडण्याचाहि तो उपदेश करी. आपल्या घराच्या आसपासची जागा स्वच्छ ठेवावी, उगाच भरमसाट पैसा उधळूं नये, स्वाभिमानानें रहावें, सरकारी कर्जरोखे विकत घ्यावे, युद्धासाठीं चाललेल्या तयारीला साहाय्य करावें आणि चांगले नागरिक बनावें, असें तो आपल्या बांधवांना वारंवार सांगत असे.

मोटरीचे कारखानदार किंवा सकाळच्या न्याहरीचे पदार्थ बनविणारे मोटे जाहिरातदार आपल्या जाहिराती निग्रोंच्या वृत्तपत्रांत देत नसत, म्हणून किरकोळ खप आणि वर्गणीदारांची वर्गणी यांवर त्याला अवलंबून रहावें लागत असे. हें लक्षांत घेऊन 'डिफेन्डर'मधील बातम्या चटकदारपणें लिहिण्यास अबॉटनें सुरुवात केली. बातम्यांचे मथळे तो लाल रंगांत

देई. लोकांचें लक्ष वेधण्याचे इतर अनेक उपाय तो योजीत असे. सर्वसाधारण लोकांशीं तो निकट संबंध ठेवीत असे, त्यामुळें त्यांच्या गरजा व अपेक्षा त्याला कळत. आणि नंतर जरी तो श्रीमंत झाला तरी लाकडाच्या वखारी, पोलादाचे कारखाने वगैरे ठिकाणीं काम करणाऱ्या शिकागोमधील कामगारांत तो मिसळे आणि चांगलीं निवासस्थानें, बढती मिळण्यास आड येणारा वंशद्वेष किंवा कामगार संघटनेंतहि मिळणारी भेदभावाची वागणूक इत्यादि त्यांचे प्रश्न तो समजावून घेई. निग्रो जनतेचें ' डिफेन्डर ' हें बरींच वर्षें अग्रेसर वृत्तपत्र असल्यानें लोकशाही वृत्तीच्या लोकांवर त्याचा प्रभाव पडत असे.

अबॉट याच्या मृत्यूनंतर ' दि शिकागो डिफेन्डर ' हें पत्र अबॉट याचा पुतण्या जॉन एच्. सेंग्स्टॅक याच्या संपादकत्वाखालीं चालू राहिलें. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत लष्कर वा उद्योगधंदे वगैरेंतील वर्णभिन्नता व भेदभावाची वागणूक पूर्णतः नष्ट करण्यांत यावी, अशी या पत्रानें सतत मागणी चालविली. पण त्याचबरोबर युद्धाला पाठिंबा देणारे अनेक देशभक्तिपर अग्रलेख लिहिले आणि युद्ध-कर्जरोखे खपावेण्याबाबत जोरदार प्रचार केला. १९४४ मधील एका अग्रलेखांत या पत्रानें म्हटलें आहे :

" आमच्यावर कितीहि घोर अन्याय होत असो व त्याविरुद्ध आमचा निकराचा झगडा चाललेला असो, पण आपण हें कबूल केलेंच पाहिजे कीं, हें युद्ध आपलेंहि आहे. परदेशांत आपले जवान लढत आहेत. धोकादायक आणि खुनी शत्रूशीं ते मुकाबला करीत आहेत. हा शत्रु जितक्या लवकर आपल्या गोऱ्या बांधवांना नाहींसा करील, तितक्याच लवकर तो आपलाहि निःपात करील. तेव्हां युद्धकार्यार्थ हें जें चौथ्यांदा कर्ज उभारलें गेलें आहे, त्यांत पैसे गुंतविणें हें केवळ देशभक्तीचेंच द्योतक नाहीं, तर तें आपल्या हिताचेंहि आहे."

शिकागोच्या निग्रोंनीं त्या काळांत वीस लाखांचे कर्जरोखे घेतले. या वृत्तपत्रानें या मोहिमेला जें हें साहाय्य केलें, त्याचें स्मरण म्हणून अमेरिकेच्या मॅरीटाइम कमिशननें सान्फ्रान्सिस्को येथून सोडलेल्या एका बोटीला यू. एस्. एस्. रॉबर्ट एस्. अबॉट हें नांव दिलें व या पत्राचा सन्मान केला.

अबॉट आपल्या हयातींत हॅम्प्टन ॲल्युम्नी असोसिएशनचा अध्यक्ष, वाय्. एम्. सी. ए. चा विश्वस्त, नॅशनल अर्बन लीगच्या डायरेक्टर मंडळाचा सभासद व फील्ड म्युझियमचा तहहयात सभासद बनला होता. आतां अमेरिकेंत निरनिराळ्या वंशांतील संबंध सुधारावे म्हणून ज्यानें कोणीं मोलाची कामगिरी बजावली असेल, त्याला दरवर्षी पारितोषिक देण्याची प्रथा शिकागोंत पडली आहे. लिंकन स्कूल ऑफ जर्नॅलिझममध्यें रॉबर्ट एम्. अबॉटच्या नांवानें एक शिष्यवृत्ति १९४५ पासून ' दि शिकागो डिफेन्डर 'नें सुरू केली. याच काळांत न्यूयॉर्कपासून मेम्फिसपर्यंत सात वृत्त-पत्रांची सांखळी ' दि शिकागो डिफेन्डर 'मार्फत सुरू झाली.

*जगांतील सर्वांत मोठ्या निग्रो कंपनीचा प्रमुख*

# चार्लस् स्पॉल्डिंग

१८७४ : : १९५२

---

यादवी युद्धानंतर निग्रोंची गुलामगिरींतून मुक्तता झाली, पण मुक्ततेनंतरचा लगतचा काळ या नव्यानें स्वतंत्र झालेल्या पण निर्वासित अशा निग्रोंना मोटा कठीण वाटत होता. कित्येक वेळां आजारी कुटुंबियांस ते औषधोपचार करूं शकत नसत; इतकेंच नव्हे तर मृताचा दफनविधिहि त्यांच्या आवाक्याबाहेर जाई. तेव्हां हें सर्व करतां यावें म्हणून त्यांना संघटित होणें आवश्यकच होतें. अनेक गट, परस्पर साहाय्य संस्था, दफन-संस्था स्थापन झाल्या. यांपैकीं बऱ्याच संस्थांचा जन्म चर्चमधून झाला, तर कांहीं चर्चशीं निगडित होत्या. यादवी युद्धापूर्वी उत्तरेंतील संस्थानांत अशा प्रकारचे गट निग्रोंनीं स्थापन केले होते. १७८७ मध्यें फिलाडेल्फियांत 'दि फ्री आफ्रिकन सोसायटी' नांवाची संस्था स्थापन झाली. "आजारांत एकमेकांना मदत करावी, विधवांना व अनाथ मुलांना साहाय्य करावें" हा या संस्थेचा उद्देश होता. मेसस, इल्क, ऑड् फेलोज् वगैरे वसतिगृहें आणि नव्यानें स्वतंत्र झालेल्या स्त्रीनें १८६७ मध्यें स्थापन केलेली इंडिपेंडंट ऑर्डर ऑफ सेंट ल्यूक ही संस्था अजूनहि चालू आहे. या संस्थांचाहि उद्देश हाच होता. आफ्रिकन इन्शुअरन्स कंपनी ही निग्रोंच्या मालकीची पहिली विमा कंपनी १८१० मध्यें स्थापन झाली. त्या वेळीं पांच हजार डॉलर्स एवढेंच तिचें भांडवल होतें. आज विमा व्यवसायांत अमेरिकन निग्रो फार मोठ्या प्रमाणावर आहेत. दोनशेंपेक्षां अधिक विमा कंपन्या निव्वळ

त्यांच्या मालकीच्या आहेत व त्या तेच चालवीत असतात. या कंपन्यांचा अब्जावधि डॉलर्सचा व्यवसाय चालतो.

उत्तर कॅलिफोर्नियांतील डरहॅम येथील नॉर्थ कॅरोलिना म्युच्युअल लाइफ इन्शुअन्रस कंपनी ही जगांतील सर्वांत मोठी निग्रो विमा कंपनी आहे. चार्लस् क्लिन्टन स्पॉल्डिंग हा १९५२ पर्यंत तिचा प्रमुख होता. १८९८ मध्यें तो तिचा पहिला मॅनेजर बनला आणि त्यानें ही कंपनी वाढविली. जेव्हां ही कंपनी स्थापन करण्यांत आली, तेव्हां स्पॉल्डिंगला विमा व्यवसायाची कांहीं माहिती नव्हती. त्याला मुळापासून सर्व शिकावें लागलें. त्याचें शिक्षणहि आठव्या इयत्तेपर्यंत झालें होतें. तो श्रीमंत झाला आणि विमा व्यवसायांत नांवाजला, तेव्हां " कॉलिज सुरू होण्याच्या वेळीं जीं भाषणें मी करीत होतों तेवढाच माझा कॉलेजशीं संबंध आला आहे." असें तो सांगत असे.

अब्राहाम लिंकनच्या खुनानंतर नऊ वर्षांनीं उत्तर कॅरोलिनांतील परगण्यामधील एका मळ्यावर स्पॉल्डिंगचा जन्म झाला. तीं एकंदर १४ भावंडें होतीं व त्यांत याचा तिसरा क्रमांक होता. तो मोठा असल्यानें शेतीचें काम त्याच्यावर पडे. शाळेंत तो अनियमितपणें जाई. जेव्हां तो मोठा झाला, तेव्हां शेती सोडून डरहॅम येथें जाण्याचा व निदान शालेय शिक्षण तरी पुरें करण्याचा निर्धार त्यानें केला. डरहॅम येथें एका हॉटेलांत बशा विसळण्याच्या कामासाठीं त्याला महिन्याला १० डॉलर्स मिळत. नंतर त्याला निराळें काम मिळालें. त्यामुळें दिवसां तो शिक्षण घेऊं शकत असे. तो त्या वेळीं एकवीस वर्षांचा होता. त्याच्या शाळेंतील मुलांपेक्षां तो फारच मोठा वाटे. पण सर्व अभिमान वगैरे बाजूला सारून तो तेविसाव्या वर्षी आठव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण संपवून बाहेर पडला. डरहॅममध्यें निग्रोंना एवढेंच शिक्षण घेण्याची व्यवस्था होती. त्या सुमाराला प्रत्येकीं २५ डॉलर्स देऊन कांहीं निग्रोंनीं एक किराणा मालाचें दुकान घातलें होतें. त्यांनीं चार्लस् स्पॉल्डिंगला तेथें कारकून व व्यवस्थापक म्हणून काम करण्यास सांगितलें. कोणालाच धंद्याची माहिती नव्हती, तेव्हां लवकरच या दुकानाचें दिवाळें वाजलें. दिवाळें वाजतांच प्रत्येकानें अंग काढून घेतलें व स्पॉल्डिंगच्या डोक्यावर त्यांनीं ३०० डॉलर्सचा बोजा ठेवला. हें कर्ज फेडण्यास त्याला पांच वर्षें लागलीं, पण त्यानें एक कपर्दिकहि बुडवली नाहीं.

स्पॉल्डिंगच्या प्रामाणिकपणामुळें आणि उद्योगशीलतेमुळें जॉन मेरिक या यशस्वी निग्रो न्हाव्याचें त्याच्याकडे लक्ष गेलें. डरहॅम येथें त्याचीं गोऱ्या लोकांसाठीं तीन व निग्रोंसाठीं दोन अशीं पांच सलून्स होतीं. अमेरिकन टोबॅको कंपनीचा संस्थापक वॉशिंग्टन ड्यूक याचा मेरिक हा न्हावी होता. स्पॉल्डिंगचा चुलता डॉ. ए. एम्. मूर यालाहि चार्लस्‌बद्दल आत्मीयता वाटूं लागली होती. हे दोघेहि अतिशय कामांत असत व म्हणून त्या दोघांनींहि त्याला व्यवस्थापक बनण्याची सूचना केली. हिशोब ठेवणें, टाइपिंग करणें, शिपाई, द्वारपाळ, एजंट वगैरे सर्व कामें त्यालाच करावीं लागत. डॉ. मूरच्या कचेरीच्या मागच्या खोलींत तो राहत असे. “ मी जेव्हां सकाळीं कचेरींत येई तेव्हां शर्टचे हात वर करून द्वारपाळाप्रमाणें जागा झाडून काढी. नंतर बाह्या खालीं करून मी एजंटाचें काम सुरू करीं. थोड्या वेळानें मी कोट वगैरे चढवून व्यवस्थापक म्हणून काम करीं.” असें त्यानें त्या काळांतील आपल्या जीवनाचें वर्णन केलें आहे. तो खरोखरच सर्व प्रकारचीं कामें करीत असे.

त्याच्या विमा कंपनीच्या पहिल्या विमेदारानें ४० डॉलर्सची पॉलिसी घेतली व ६५ सेंटचा हप्ता त्यानें भरला. पण या कंपनीजवळ कांहीं थोडा-फार निधि जमण्यापूर्वीच हा विमेदार लगेच वारला. जेव्हां त्याची विधवा विम्याचे पैसे घेण्यास आली, तेव्हां या सर्व लोकांना आपल्या खिशांतून ४० डॉलर्स काढून द्यावे लागले. पण त्यांनीं ते सर्व भरले. ताबडतोब या कंपनीच्या सुस्थितीची व त्वरित पैसे देण्याच्या पद्धतीची माहिती सर्वत्र पसरली. तेव्हां या तरुण स्पॉल्डिंगला भराभर आणखी विमेदार मिळत गेले. पहिल्या आठवड्यांत २९ डॉलर्स ४० सेंट जमले. वर्षअखेरीस ८४० डॉलर्स त्यानें घेतले. वर्षभरांत एक हजार डॉलर्सहि जमले नाहींत, तरीहि तो हताश झाला नाहीं. कारण दर आठवड्याला विमेदारांची संख्या हळूहळू पण निश्चितपणें वाढत होती. तो शेजारच्या छोट्या गांवांत, मळ्यांवर जाई आणि ज्या लोकांनीं पूर्वी विम्याचें नांवहि ऐकलें नव्हतें, त्यांना विम्याचे फायदे समजावून सांगे. वीस वर्षांनीं तो त्याच्या कंपनीचा सेक्रेटरी व खजिनदार बनला, तेव्हां त्याचे एजंट वर्षाला लाखों डॉलर्सचा व्यवसाय करूं लागले.

जॉन मेरिक हा न्हावी या कंपनीचा एकवीस वर्षें अध्यक्ष होता.

तो वारल्यावर डॉ. मूर त्या जागीं आला. या दोघांनीं डरहॅमच्या निग्रो नागरिकांसाठीं अनेक चांगल्या गोष्टी केल्या. सार्वजनिक वाचनालयांतून काळ्या लोकांना पुस्तकें मिळत नसत, तेव्हां काळ्या लोकांसाठीं एक सार्वजनिक ग्रंथालय स्थापन करण्याकरितां या दोघांनीं बराच पैसा खर्च केला आणि या ग्रंथालयांतील पहिले बरेचसे ग्रंथ डॉ. मूरनें दिले. सिटी हॉस्पिटलमध्यें निग्रो डॉक्टर्स व परिचारिका यांना नोकरी मिळत नव्हती, तेव्हां काळ्या लोकांसाठीं लिंकन हॉस्पिटल उभारण्याची त्यांनीं श्रीमान् अशा ड्यूक कुटुंबाला गळ घातली. या हॉस्पिटलांत काळ्या डॉक्टरांना काम करतां येऊं लागलें व परिचारिकांना शिक्षण मिळूं लागलें. ग्रामीण भागांतील शाळेमध्यें भोगाव्या लागणाऱ्या अडचणींचा अनुभव असल्यानें डॉ. मूरनें एक वर्षभर निग्रो शाळेसाठीं एक इन्स्पेक्टर नेमला व त्याचा पगार स्वतःच्या खिशांतून दिला. संस्थानच्या विधानसभेंत या शाळांच्या सुधारणेसाठीं योग्य त्या शिफारशी करतां याव्या, म्हणून हा इन्स्पेक्टर नेमला होता. या इन्स्पेक्टरचें काम इतकें यशस्वी ठरलें कीं, विधानसभेनें त्याची जागा कायम करून टाकली.

उत्तर कॅरोलिना म्युच्युअल इन्शुरन्स कंपनीचे हे दोन सज्जन संस्थापक मरण पावले, तेव्हां चार्लस् स्पॉल्डिंग त्यांच्या जागीं आला व समाजाच्या हितासाठीं चालविलेलें कार्य त्यानेंहि चालू ठेवून आपल्यालाहि सामाजिक कर्तव्याची जाणीव असल्याचें दाखवून दिलें. त्यानें आपली विमा कंपनी अमेरिकेंतील प्रतिष्ठित कंपनी तर बनवलीच, पण त्याचबरोबर अनेक क्षेत्रांत कार्य चालू ठेवलें. १९२१ मध्यें नॅशनल निग्रो इन्शुरन्स असोसिएशन ही संस्था स्थापन करण्यांत त्यानें पुढाकार घेतला व तो या संस्थेचा पहिला अध्यक्ष झाला. १९२६ मध्यें तो नॅशनल निग्रो बिझिनेस लीगचा अध्यक्ष झाला. हॉर्वर्ड, शॉ या विद्यापीठांचा आणि नॉर्थ कॅरोलिना स्टेट कॉलेजचा विश्वस्त म्हणूनहि त्यानें काम केलें. नॅशनल कौन्सिल ऑफ यंग मेन्स खिश्चन असोसिएशन व डरहॅम चेंबर ऑफ कॉमर्सचा तो सभासद होता. त्याला अनेक सन्माननीय पदव्या बहाल करण्यांत आल्या होत्या. त्यानें केलेल्या उल्लेखनीय अशा कामागिरीबद्दल १९२६ मध्यें त्याला हार्मॉन हें सुवर्णपदक देण्यांत आलें.

नॉर्थ कॅरोलिना म्युच्युअल कंपनींतूनच डरहॅम येथें मेकॅनिक्स अॅन्ड फार्मर्स बॅंक आणि म्युच्युअल बिल्डिंग अॅन्ड लोन असोसिएशन या संस्थांची निर्मिति झाली. १९२० मध्यें या दोन्ही संस्थांचा चार्लस् सी. स्पॉल्डिंग अध्यक्ष झाला. मेरिक व मूर यांनीं जेव्हां विमा कंपनी स्थापन केली, तेव्हां तरुण निग्रोंना व्यापारधंद्याचें शिक्षण घेण्यास वाव मिळवून द्यावा, असा त्यांचा एक उद्देश होता. दक्षिणेंत निग्रो स्त्री-पुरुषांना ज्या प्रतिष्ठित नोकऱ्या सहसा मिळत नसत, त्या त्यांना मिळवतां याव्या, म्हणून अनेक व्यवसाय सुरू करण्याचा त्यांचा उद्देश होता. मालमत्तेवर कर्जाऊ रक्कम मिळणें किंवा घरें बांधण्यासाठीं कर्ज मिळणें निग्रोंच्या बाबतींत फार कठीण होतें, हेंहि त्यांना माहीत होतें. तेव्हां असें कर्ज मिळवून देतां यावें, म्हणून त्यांनीं एक बॅंक व आर्थिक मदत देण्यासाठीं पतपेढी स्थापन केली.

१९५२ मध्यें चार्लस् सी. स्पॉल्डिंग मरण पावला. तेव्हां 'न्यूयॉर्क हेरल्ड ट्रिब्यून 'नें लिहिलें कीं, नॉर्थ कॅरोलिना म्युच्युअल लाइफ इन्शुरन्स ही जगांतील सर्वांत मोठी कंपनी होय. तिची मालमत्ता वगैरे ३ कोटी ३० लक्ष डॉलर्सची आहे, तर आठ राज्यांत तिचे विमेदार पसरले असून विम्याची एकंदर रक्कम साडे सोळा कोटी डॉलर्स इतकी आहे. स्पॉल्डिंग हा अगदीं सौम्य वृत्तीचा माणूस होता. जेथें असाल तेथें आपले गुण उपयोगांत आणा, हा बुकर टी. वॉशिंग्टनचा उपदेश त्यानें हृदयाशीं बाळगला होता. आपलें यश हें कष्टाचें फळ आहे, असें तो म्हणत असे. वैयक्तिक उपक्रमशीलतेवर त्याचा फार विश्वास होता. तरुणांना उपदेश करतांना तो नेहमीं म्हणे : "तुम्हांला जर डोंगरावरील स्वच्छ झऱ्याचें पाणी प्यावयाचें असेल, तर तुम्हांला डोंगर चढून जाणें भाग आहे. त्याशिवाय तें पाणी पितां येणार नाहीं."

*प्रख्यात मजूर-नेता*

# ए. फिलिप रॅन्डॉल्फ

१८८९ :

---

अमेरिकेंतील पहिल्या पुल्मन रेल्वे गाडीला ' पायोनियर ' असें नांव देण्यांत आलें होतें. या गाडीवरचा पहिला हमाल निग्रो होता. १८६७ पासून अमेरिकेंतील सर्व रेल्वेवर झोपण्यासाठीं ज्या गाड्यांत सोय केली होती, त्यांवर निग्रो काम करूं लागले होते. आज त्यांची संख्या १८ हजारांपर्यंत आहे. त्यांपैकीं बहुतेक ' ब्रदरहूड ऑफ स्लीपिंग कार पोर्टर्स ' या संस्थेचे सभासद आहेत. जगांतील ही सर्वांत मोठी मजूर संघटना म्हणावी लागेल. ही संघटना ॲसा फिलिप रॅन्डॉल्फ यानें उभारली.

१५ एप्रिल १८८९ रोजीं फ्लॉरिडांतील क्रिसेंट सिटीमध्यें त्याचा जन्म झाला. त्याचा बाप मेथॉडिस्ट पंथाचा फिरता धर्म-प्रचारक होता. ग्रामीण भागांतील अनेक चर्चेस् त्याच्या स्वाधीन होतीं. घरांत धार्मिक ग्रंथ बरेच होते. रॅन्डॉल्फ मोठा झाल्यावर तो आपल्या वडलांच्या प्रार्थना-भाष्याच्या पुस्तकांचें व शेक्सपियरच्या नाटकांचें मोठ्यानें वाचन करूं लागला. शाळेंत एक चांगला विद्यार्थी म्हणून त्याची गणना होत असली तरी अतिशय बुद्धिमान् म्हणून तो ओळखला जात नव्हता. जॅक्सन्‌व्हिल येथील कुकमन इन्स्टिटयूट या शाळेंतून त्यानें डिप्लोमा घेतला व त्यानंतर त्याचें शालेय शिक्षण संपुष्टांत आलें. तें झाल्यावर उत्तरेंत जाऊन नशिबाची परीक्षा पहावयाचा विचार त्यानें केला. फिलिप मग न्यूयॉर्क येथें आला व बसमध्यें

कंडक्टरचें वगैरे काम करूं लागला. त्यानंतर लिफ्टमन म्हणून त्यास काम मिळालें. सिटी कॉलेजांत तो त्याच काळांत रात्रीं शिक्षणहि घेऊं लागला. हडसन नदीवरील बोटींत त्याला एका उन्हाळ्यांत पर्यवेक्षकाचें काम मिळालें. पण बोटीवरच्या नोकरवर्गास रहाण्यासाठीं दिलेल्या जागा अतिशय उष्ण व गर्दीच्या असल्याबद्दल त्यानें निषेध व्यक्त केला, म्हणून त्याची हकालपट्टी झाली. निग्रोंची परिस्थिति सुधारावी, विशेषतः त्यांच्या कामाची परिस्थिति सुधारावी, असें त्याला प्रथमपासून वाटे व हार्लेमच्या चौकाचौकांतून त्यानें यासंबंधीं भाषणें करण्यास सुरुवात केली. कांहीं वेळां रस्त्यांनीं जाणाऱ्या लोकसमुदायापुढें तो शेक्सपियरच्या नाटकांतील कांहीं भाग बोलून दाखवी.

गाड्या व मोटारींत निग्रोंसाठीं निराळी व्यवस्था केलेली असे. फ्लॉरिडामध्यें तो असतां त्याच्या लहानपणापासूनच त्याच्या आईनें त्याला या असल्या गाड्या व मोटारींतून प्रवास करण्यास बंदी केली होती. असा प्रवास करण्यापेक्षां पायीं चाललेलें बरें, असें ती त्याला सांगत असे. अशा प्रकारें रॅन्डॉल्फला लहानपणापासूनच वंशभेदाबद्दल तिरस्कार निर्माण झाला होता. निग्रो नागरिकांना सर्व लोकशाही हक्क मिळावे म्हणून मोहीम करण्यासाठीं त्यानें १९१७ मध्यें न्यूयॉर्कमधून ‘ दि मेसेंजर ’ हें मासिक सुरू करण्यासाठीं साहाय्य केलें. ‘ अमेरिकेंतील एकमेव क्रांतिकारक निग्रो मासिक ’ असें त्यावर छापलेलें असे. या मासिकांतील संपादकीय लेखांत तत्कालीन परिस्थितीवर कडक टीका केलेली असे. पहिल्या महायुद्धाच्या काळांत ‘ जगांत लोकशाही सुरक्षित राहिली पाहिजे ’ ही सरकारी घोषणा होती. ‘ दि मेसेंजर ’ यावर टीका करी. दक्षिणेंत निग्रोंना मतदानाचा हक्क नाकारलेला असतां, त्यांची वस्ती निराळी केलेली असतां व त्यांना मारहाण होत असतां ही घोषणा निव्वळ दांभिकपणाची आहे, अशी या पत्रांत टीका यावयाची. अनेक शहरांतून रॅन्डॉल्फनें जहाल भाषणें केलीं. ‘ अमेरिकेंतील सर्वांत मोठा धोकादायक निग्रो ’ अशी त्याची संभावना १९१८ मध्यें कांहीं वृत्तपत्रांनीं केली होती; आणि क्लीव्हलॅन्डमधील एका भाषणाबद्दल त्याला अटकहि झाली होती. परंतु त्याच्यावर खटला न भरतांच त्याला नंतर कांहीं दिवसांनीं सोडून देण्यांत आलें. घटनेनें जीं आश्वासनें दिलीं आहेत, तीं सर्वच नागरिकांना मिळावींत आणि कायद्याचें संरक्षणहि सर्वांना

मिळावें यासाठीं आपण झगडत आहोंत, असें तो भाषणांतून व संपादकीय लेखांतून सांगत असे. "जर हक्क राबवितां येत नसतील तर त्या हक्कांना कांहींच अर्थ नाहीं" हें त्याच्या भाषणाचें एक सूत्र होतें.

युद्धानंतर रॅन्डॉल्फ राजकारणांत भाग घेऊं लागला व समाजवादी पक्षाच्या तिकिटावर अनेक निवडणुकींसाठीं उभा राहूं लागला. त्याला यांत अर्थातच यश आलें नाहीं. परंतु निग्रो समाजापुढें भाषण करण्यास त्याला सारखीं आमंत्रणें येत. एकदां पुल्नन पोर्ट्स् ॲथ्लेटिक असोसिएशन या संस्थेतर्फे त्याला भाषणाचें आमंत्रण आलें, तेव्हां अमेरिकन जीवनांत मजूर संघटनेला कसें वाढतें महत्त्व येत आहे, याविषयीं त्यानें विवेचन केलें. या भाषणाचा परिणाम होऊन रेल्वेचे कांहीं पुरुष व महिला नोकर यांनीं संघटना स्थापन करण्यासाटीं त्याची मदत मागितली. यापूर्वी देशांत निरनिराळ्या भागांत संघटना स्थापन करण्याचे प्रयत्न या लोकांनीं चार वेळां केले होते, पण ते विफल ठरले. रेल्वे कंपनीच्या नियंत्रणाखालीं लहान प्रमाणावरील विम्याची व्यवस्था फक्त ते करवून घेऊं शकले. पण यामुळें त्यांच्या कामाचे तास कमी झाले नाहींत, कीं गाडींत झोपण्याची व्यवस्था झाली नाहीं किंवा त्यांच्या तुटपुंज्या मजुरींत वाढ झाली नाहीं. रात्रीं झोपण्याची व्यवस्था असलेल्या गाडींतील नोकरांना प्रायः बक्षिसीवर गुजराण करणें भाग पडे. घरापासून दूर राहून रहाण्याजेवण्यासाठीं स्वतःच्या खिशांतून पैसे मोजावे लागत असत, इतकेंच नव्हे तर उतारूंच्या बुटांना लागणारें पॉलिश त्यांना स्वतःला विकत घ्यावें लागे.

रॅन्डॉल्फ हा कधींच या रेल्वेवर नोकर नव्हता. पण मजूर संघटनेबद्दल त्याला आस्था होती आणि मजूर संघटनेचें तत्त्वज्ञान व प्रत्यक्ष व्यवहार याबद्दलहि त्याला आत्मीयता वाटत होती. देशांतील निग्रो मजुरांच्या मोठ्या गटानें आतां संघटित होण्याची वेळ आलेली आहे, असें त्याला वाटत होतें; म्हणून न्यूयॉर्क भागांतील नोकर वर्गानें जेव्हां त्याला आपल्या संघटनेचा संघटक म्हणून काम करण्याची विनंति केली, तेव्हां प्रथम पगारहि न घेतां तो हें काम करूं लागला. १९२५ मध्यें हार्लेम येथील एल्कस सभागृहांत एक सभा भरविण्यांत आली आणि रात्रीं झोपण्याची व्यवस्था असलेल्या गाड्यांतील नोकरांची संघटना अधिकृत रीत्या स्थापन

झाली. ' ब्रदरहूड ऑफ स्लीपिंग कार पोर्टर्स ' असें या संघटनेचें नांव ठेवण्यांत आलें. प्रथमतः संघटनेच्या कार्यांत बऱ्याच अडचणी आल्या. या संघटनेंत सामील झाल्याबद्दल अनेक नोकरांच्या नोकऱ्या गेल्या. बरेचसे नोकर संघटनेंत सामील होण्यास घाबरत होते. अनेक मजूर संघटनांनीं निग्रोंना सभासद करून घेण्यास विरोध केला होता व म्हणून संघटनेचा कांहीं उपयोग नाहीं, अशी कांहींची धारणा झाली होती. मजूर संघटनेची कल्पना प्रसृत व्हावी, म्हणून देशांत सर्वत्र संस्था स्थापन करण्यांत आल्या. या काळांत रॅन्डॉल्फनें बराच प्रवास केला. प्रवासांत त्यानें नव्या संघटनेचे अनेक सभासद केले. या संघटनेबद्दल सद्भाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला आणि मजूर संघटनेचें वाढतें महत्त्व काळ्या लोकांना पटवून दिलें. तो धर्मगुरु, धर्मप्रचारक वगैरेंच्या गटांपुढें भाषणें करी. येशू ख्रिस्त हा स्वतः सुतार होता व त्याचे अनुयायी कामगार होते, तेव्हां धर्मगुरूंनीं जर मजुरांची बाजू घेऊन त्यांची सेवा केली, तर त्यामुळें ख्रिस्ती धर्मपीठाची परंपरा मोडली जाणार नाहीं; उलट या धर्मपीठाची उज्ज्वल सेवा केल्याचें पुण्य पदरीं पडेल, असें तो या भाषणांत सांगत असे. ' दि मेसेंजर ' हें त्याचें मासिक या नव्या मजूर संघटनेचें मुखपत्र बनलें. दोन वर्षांच्या अवधींत या संघटनेचे दोन हजारांवर सभासद झाले. परंतु संघटित न झालेले मजूर कांहीं हजारांनीं मोजण्यासारखे होते. मंदीची लाट येऊं लागली होती आणि बरेचसे लोक बेकार झाले होते. तेव्हां रेल्वेचे बरेचसे नोकर, संघटनेंत सामील झाल्याबद्दल नोकरीला मुकावें लागेल, या भीतीनें तिच्यापासून दूर रहात. परंतु तिची सभासद-संख्या वाढतच गेली आणि १९२९ पर्यंत या नोकर-वर्गापैकीं जवळ जवळ निम्मे पुरुष व स्त्री नोकर संघटनेंत सामील झाले ! नंतर अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर या देशव्यापी मजूर संघटनेनें या ब्रदरहूडला एक जाहीरनामा बहाल केला. अमेरिकेंतील निग्रो संघटनेला मिळालेला हा पहिलाच मान होय. ए. फिलिप रॅन्डॉल्फ हा तिचा पहिला अध्यक्ष बनला.

मंदीचा काळ या नवजात संघटनेला मोठा कठीण गेला. रेल्वेंतील अनेक नोकर बेकार झाले. बऱ्याच सभासदांना वर्गणी भरणेंहि अशक्य होतें. यामुळें या मजूर संस्थेला विजेचीं बिलेंसुद्धां भरणें अशक्य होऊन

बसलें. न्यूयॉर्क येथील मुख्य कचेरींत अधिकारी व नोकरवर्ग यांना अनेकदां अंधारांत काम करावें लागे. परंतु नोकरवर्गाच्या कामाची परिस्थिति सुधारावी, यासाठीं ते सतत वाटाघाटी करीत होते. अखेरीस १९३७ मध्यें पुल्मन रेल्वे कंपनी व ब्रदरहूड यांच्यांत करार झाला आणि कंपनीनें सर्व पुरुष व महिला नोकरांना मिळून दहा लाख डॉलर इतकी पगारवाढ दिली. कामाचे तास व प्रवासाचें अंतर कमी करण्यांत आलें आणि जादा कामाबद्दल बऱ्यापैकीं भत्ता देण्याचें तिनें कबूल केलें. विशेष हें कीं, हें सर्व संप वगैरे न करतां पदरांत पडलें होतें. आज ब्रदरहूड ही संघटना देशांतील एक प्रभावी व सामर्थ्यशाली मजूर संघटना म्हणून मानली जाते. कोलंबिया विद्यापीठांतील अर्थशास्त्राचे प्राध्यापक लिओ वुलमन् यांनीं या संस्थेबद्दल लिहिलें आहे : "निग्रो लोक प्रचंड संघटना लोकशाही पद्धतीनें चालवूं शकतात आणि मालकवर्गाशीं समजूतदारपणानें संबंध ठेवूं शकतात, यासंबंधीं कांहीं पुरावा हवाच असेल तर तो या संघटनेच्या कार्यावरून मिळण्यासारखा आहे."

आतां अमेरिकन फेडरेशन ऑफ लेबर या देशव्यापी संघटनेच्या कार्यांत भाग घेऊन ए. फिलिप रॅन्डॉल्फ हा मजूर-नेता म्हणून अधिकाधिक पुढें येऊं लागला. ज्या मजूर संघटना निग्रो मजुरांना सभासद करून घेण्यास बंदी घालीत होत्या, त्यांनीं ही बंदी उठवावी म्हणून या लेबर फेडरेशनच्या वार्षिक अधिवेशनांतून तो सतत मागणी करी. "जोंपर्यंत मजूर संघटना आपलीं दारें सर्वांना खुलीं करीत नाहींत, तोंपर्यंत मजुरांचा विजय होणें शक्य नाहीं." असें तो म्हणे. मग दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत अमेरिकन संघराज्य सरकारनें या क्षेत्रांत हस्तक्षेप करीपर्यंत या बाबतींत प्रगति होऊं शकली नाहीं. संरक्षणविषयक अनेक उद्योगधंद्यांत निग्रो कामगारांना मज्जाव होता, त्याप्रमाणें दुकानें व कारखाने यांत काम करणाऱ्या निग्रोंना बऱ्याचशा मजूर संघटना दूर ठेवीत. म्हणून युद्धापूर्वींच या बाबतींत कडक उपाय योजावे, असें रॅन्डॉल्फ सांगत असे. आपल्या तक्रारी दूर करून घेण्यासाठीं निवेदन देण्याचा हक्क अमेरिकेंत फार जुना आहे. त्याच हक्काचा वापर करण्याचा विचार रॅन्डॉल्फनें केला. वॉशिंग्टन येथें जाऊन युद्धविषयक साहित्यनिर्मितीच्या कारखान्यांत इतरांप्रमाणें

निग्रोंनाहि कामकाज मिळावें, अशी मागणी अध्यक्ष व कॉंग्रेस यांच्यापुढें करण्यासाठीं निदर्शनें करण्याची तयारी त्यानें केली.

अनेक संस्था, चर्चेस् व वृत्तपत्रें यांना ही कल्पना पसंत पडली. वॉशिंग्टनवर मोर्चा नेण्याच्या या मोहिमेच्या प्रचारार्थ देशभर मोठमोठ्या सभा होऊं लागल्या. शेंकडों गटांनीं आपले प्रतिनिधि पाठविण्याचें ठरविलें. राष्ट्रीय संरक्षणांत सहभागी करून घ्या व नोकऱ्या द्या, अशी मागणी करणारें निवेदन देण्यासाठीं 'व्हाइट हाउस'वर जो मोर्चा यावयाचा होता, त्यांत सुमारें पन्नास हजार लोक सामील होतील, असें १९४१ च्या जूनमध्यें वाटूं लागलें. विमानाचे आणि लोकशाहीच्या रक्षणार्थ तयार होणाऱ्या दारूगोळ्यांचे अनेक कारखाने निग्रोंना काम देत नाहींत. त्यामुळें निग्रो समाज क्षुब्ध झाला आहे, आग्रही बनला आहे, याची जाणीव कांहीं सरकारी अधिकाऱ्यांना या सुमारास होऊं लागली होती. तेव्हां वॉशिंग्टनचा मोर्चा नेण्याच्या कांहीं दिवस अगोदर अध्यक्ष रूझवेल्ट यांनीं एक फर्मान काढलें आणि युद्धविषयक साहित्याचा पुरवठा करण्याचें कंत्राट घेतलेल्या कारखान्यांनी व कंपन्यांनी नोकऱ्या देतांना वंशभेद करूं नये, असा हुकूम त्यांनीं दिला. या ऐतिहासिक हुकमांत असें स्पष्टपणें म्हटलें आहे : "वंश, धर्म, रंग वा राष्ट्रीयता या कारणांस्तव कोणत्याहि प्रकारचा भेदभाव न करतां संरक्षणविषयक उद्योगधंद्यांत सर्व कामगारांना सारख्याच पद्धतीनें काम मिळेल असें पाहणें हें मालक आणि मजूर संघटना यांचें कर्तव्य आहे." त्यानंतर राष्ट्रीय संरक्षणाच्या कार्यांत सहभागी होण्याचा हक्क सर्व नागरिकांना बजावतां यावा म्हणून 'ए कमिटी ऑफ् फेअर एम्प्लॉयमेंट प्रॅक्टिस्' या नांवाची एक संस्था स्थापन करण्यांत आली. संरक्षणविषयक साहित्य पुरविण्यासंबंधीं सरकार व कारखानदार यांच्यांत जे करार होऊं लागले, त्यांत नोकरीच्या बाबतीत वंशभेदाचें तत्त्वज्ञान लागू करतां कामा नये, असें एक कलम घालण्यांत आलें.

आपल्या 'फ्रॉम स्लेव्हरी टू फ्रीडम' या ग्रंथांत जॉन होप् फ्रॅन्कलिन या इतिहासकारानें म्हटलें आहे, "गुलामगिरींतून मुक्त झाल्याचा जाहीरनामा निघाल्यानंतर इतकें महत्त्वाचें फर्मान निघालें नाहीं, अशी निग्रोंची भावना झाली होती." पण कांहीं कंपन्या या हुकमाचा भंग करीत, असेंहि

त्यानें नमूद केलें आहे. तथापि निग्रो कामगारांना भोगाव्या लागणाऱ्या अडचणी सरकारनेंच मान्य केल्या व या अडचणींचा निषेधहि केला, त्यामुळें वॉशिंग्टनवर मोर्चा नेण्याचा कार्यक्रम रद्द करण्यांत आला. त्याऐवजीं न्यूयॉर्कच्या मेडिसन स्क्वेअर गार्डनमध्यें २० हजारांची सभा भरली व रॅन्डॉल्फच्या नेतृत्वाला पाठिंबा देण्यांत आला आणि वंशभेद न करतां पूर्ण रोजगारी मिळवून देण्यासाठीं जे प्रयत्न होतील, त्यांस पाठिंबा देण्याचें जाहीर करण्यांत आलें. उद्योगधंदे व कारखाने यांचे दरवाजे फार मोठ्या प्रमाणांत निग्रो लोकांना खुले झाले. आणि ए. फिलिप रॅन्डॉल्फ हा निग्रोंच्या दृष्टीनं केवळ मजूर-पुढारी न राहतां राष्ट्रीय नेता बनला.

*बेसबॉल लीगमधील पहिला निग्रो*

# जॅकी रॉबिन्सन

१९१९ :

---

फ्लॉरिडाच्या रेल्वे मार्गापासून जवळच दक्षिण जॉर्जियाचा भाग लागतो, तेथें कैरो नांवाचें एक खेडेगांव आहे. या गांवांतील एका गरीब कुटुंबांत ३१ जानेवारी १९१९ रोजीं जॉन रुझवेल्ट रॉबिन्सन याचा जन्म झाला. या कुटुंबांत एकंदर मुलें पांच व त्यांतला जॉन हा सर्वांत लहान होय. त्याला त्याच्या बापाची आठवण राहण्याइतकी समज येण्यापूर्वींच त्यांचा बाप वारला. यामुळें मुलांचा सांभाळ करण्याची जबाबदारी केवळ आईवर पडली. जॉन या वेळीं चौदा महिन्यांचा होता आणि इतर चार मुलांचीं वयें अडीच वर्षांपासून दहा वर्षांपर्यंतचीं होतीं. अशा या मुलांना घेऊन ती कॅलिफोर्नियांत गेली. तेथें परिस्थिति बरी आहे आणि निग्रोंसाठीं स्वतंत्र शाळा नसून सर्वांना एकत्रच शिकविण्यांत येतें, असें तिनें ऐकलें होतें. सौ. रॉबिन्सन हिचा एक नातेवाईक पॅसाडेना येथें राहत होता. त्यानें या लोकांना राहण्यासाठीं जागा देण्याचें कबूल केलें होतें. हीं मुलें त्याला बर्टनकाका म्हणत. चार मुलगे व एक मुलगी एवढ्यांना तो वडलांसारखा वाटे. आपल्या दोन खोल्यांत त्यानें या सर्वांनाच जागा करून दिली होती.

लहानग्या जॉनला या सर्वांनीं जॅकी असें नांव ठेवलें. कॅलिफोर्नियाच्या उत्तम हवेंत जॅकी चांगला धष्टपुष्ट होऊं लागला. त्याची आई कधीं घरकाम करून तर कधीं धोबीकाम करून पैसे मिळवी आणि मुलांना नीटनेटकें ठेवी

व त्यांचा विद्याभ्यास चालू ठेवी. परंतु हीं पांच मुलें होतीं, त्यामुळें कांहीं वेळां सर्वांना पोटभर खातांपितां येत नसे. जॅकी शाळेंत जाऊं लागला तेव्हां एक शिक्षिका आपल्या जेवणांत त्यालाहि सहभागी करून घ्यावयाची. या शिक्षिकेची त्याला विशेष आठवण राहिली आहे. कांहीं वेळां तो एका डब्यांतून वाटाणे आणी व पोट भरण्यासाठीं तो दाण्यांबरोबर टरफलेंहि खाई. त्यांची आई या मुलांचे कपडे शनिवारीं रात्रीं स्वच्छ धुऊन काढी व त्यांना इस्त्री करी. रविवारीं शाळेंत चांगले कपडे घालून या मुलांना जातां येत असे. या मुलांचें जितकें चांगल्या प्रकारें संगोपन करतां येईल, तितकें करण्याची ती कोशीस करी. पण अन्नधान्य, कपडे व ज्या मोठ्या घरांत ही मंडळी राहूं लागली होती त्या घराचें भाडें या सर्वांसाठीं लागणारा पैसा मिळविण्यासाठीं तिला कामाच्या निमित्तानें बराच वेळ घराबाहेर राहावें लागत असे. परंतु पांची जणांना पोटभर अन्न मिळण्याइतकी वा या सर्वांना चांगले कपडे व पादत्राणें मिळण्याइतकी कमाई या बाईला करतां येत नसे. तिच्या प्रेमाइतकी तिची मिळकत नव्हती, यांत तिचा अर्थातच कांहीं दोष नव्हता.

१९४० सालांतील मंदीमुळें परिस्थिति फार कठीण झाली. परंतु सौ. मौली रॉबिन्सनच्या पांचहि मुलांपैकीं कोणी क्लीव्हलँडमधील प्राथमिक शाळेंत तर कोणी म्युइर तांत्रिक शाळेंत शिकत होतीं. जॅकीचा एक भाऊ मॅक हा या तांत्रिक शाळेंतील चांगला खेळाडू होता. लांब उड्या मारण्यांत वगैरे तो पटाईत होता. मजबूत बांध्याचा जॅकीसुद्धां शाळेंतील फूटबॉल संघांत खेळत असे आणि सर्वांवर मात करीत असे. रॉबिन्सन कुटुंबांतील हीं दोन मुलें लहानपणापासूनच खेळाडू म्हणून ओळखलीं जाऊं लागलीं होतीं.

जॅकी चौदा वर्षांचा झाल्यावर तो हायस्कूलमध्यें जाऊं लागला व आपल्या भावाप्रमाणेंच फूटबॉल, बास्केटगॉल, बेसबॉल वगैरे खेळांत व धांवण्याच्या कार्यक्रमांत भाग घेऊं लागला. ज्या वेळेला त्याचें हें शालेय शिक्षण संपलें, तेव्हां तो सहा फूट उंचीचा व १७५ पौंडांचा तरणाबांड झाला होता आणि तरीहि त्याची वाढ होतच होती. पॅसाडेना ज्युनियर कॉलेजांतील क्रीडाशिक्षकांनीं त्याचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. या कॉलेजांत खेळाडू म्हणून त्याचा नांवलौकिक होऊं लागला होता. या कॉलेजांत २५ फूट ६१/३ इंचांवर उडी मारून त्यानें एक नवा उच्चांक प्रस्थापित केला.

बेसबॉलमध्येंहि त्यानें असाच उच्चांक प्रस्थापित केला. बास्केटबॉलमध्यें त्यानें एका डावांत २८ गुण मिळवून आतांपर्यंत एकाच डावांत एकानेंच मिळलेल्या गुणांवर ताण केली. तो लोकप्रिय विद्यार्थी होता. मोकळ्या व खिलाडू वृत्तीचा आणि निरहंकारी म्हणून तो सर्वांना प्रिय होता. प्राथमिक शाळेंत तिसऱ्या इयत्तेपासूनच तो फूटबॉल खेळूं लागला होता आणि तेव्हांपासूनच त्याच्या खेळाचें त्याच्या वर्गबंधूंकडून स्वागत होत असे. त्यामुळें कॉलेजांत गेल्यावर त्याच्या खेळाचें जेव्हां कौतुक होऊं लागलें, तेव्हां त्याला त्यांत कांहींच विलक्षण वा अलौकिक वाटलें नाहीं.

कॉलेजांतील पहिलीं दोन वर्षें संपल्यावर १९३८ मध्यें जॅकी लॉस एजंल्स येथें कॅलिफोर्निया विद्यापीठांत जाऊं लागला. पॅसाडेना येथून रोज त्याला एक तासाहून अधिक बसचा प्रवास करावा लागत असे. १९३६ सालीं बर्लिन येथील ऑलिम्पिक सामन्यांत त्याचा भाऊ मॅक यानें भाग घेतला होता आणि २०० मीटर्सच्या धांवण्याच्या शर्यतींत जेसी ओवेन पहिला, तर मॅक दुसरा आला. कांहीं आठवड्यांनंतर पॅरिस येथें एवढेंच अंतर थोड्या वेळांत धांवून जाऊन त्यानें एक नवा उच्चांक प्रस्थापित केला. जॅकीला आपल्या या भावाबद्दल बराच आदर वाटे आणि त्याच्याप्रमाणें वागण्याचा प्रयत्न तो करीत राही. लगेच तो कॅलिफोर्निया विद्यापीठाच्या फूटबॉल संघांत सामील झाला; आणि पहिल्याच हंगामांत त्यानें नांव काढलें. वॉशिंग्टन विद्यापीठ संघाविरुद्ध झालेल्या सामन्यांत जॅकीनें चांगलीच कामगिरी बजावली व विद्यापीठाच्या संघास विजय मिळवून दिला. या हंगामाच्या अखेरीअखेरीस जॅकीच्या घोट्याला दुखापत झाली होती. पण तत्पूर्वींच्या त्याच्या संघाच्या १२७ गुणांपैकीं त्यानें २६ गुण आपल्या गांठीला बांधले होते. ज्या ज्या वेळीं त्याच्याकडे चेंडू येई, त्या त्या वेळीं साधारणतः बारा यार्ड दूर तो चेंडू उडवून देई. १४ वेळां त्यानें चेंडू लाथाळला व दर वेळेला २० फूट लांब तो नेला; आणि अशा प्रकारें कॉलेजच्या फूटबॉल खेळांत नवा उच्चांक स्थापन झाला. यामुळें जॅकीचा नांवलौकिक सर्वत्र झाला.

बास्केटबॉलमध्येंहि हाच प्रकार घडला. १२ डावांत जॅकीनें भाग घेतला; आणि पॅसिफिक कोस्ट सामन्यांत त्या हंगामामध्यें १४८ गुण

मिळवून तो पहिला आला. लांब उडी मारण्याच्या शर्यतींतहि त्यानें तत्पूर्वीचा उच्चांक मोडला आणि नॉर्थ वेस्टर्न येथें त्यानें प्रतिस्पर्धी संघाचा पराभव केला. याच सुमारास विद्यापीठांतील एका मुलीच्या प्रेमपाशांत तो पडला आणि मग लग्नाचे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. या वेळेला बर्टनकाका आजारी झाला, तेव्हां सर्व कुटुंबाचा भार आपल्या आईवर टाकणें जॅकीला अप्रशस्त वाटलें. १९४१ सालीं विद्यापीठांतील त्याचें शेवटचें वर्ष चालू असतां त्यानें कॉलेजला रामराम ठोकला व तो सरकारच्या सिव्हिलियन कॉन्झर्वेशन कोअर छावणींत क्रीडा-शिक्षक म्हणून काम करूं लागला.

ही छावणी संपली तेव्हां शिकागो ट्रिब्यूनतर्फे शिकागोंत होणाऱ्या फूटबॉलच्या सामन्यांत भाग घेण्याचें त्याला आमंत्रण आलें. यांतूनच पुढें त्याला लॉस एंजलसच्या बुल्डॉग फूटबॉल संघांत फूटबॉल खेळण्याची नोकरी मिळाली व पगारहि चांगला मिळूं लागला; पण होनोलुलूंत बरेच सामने झाल्यावर जॅकी बोटीनें परत येत असतां पर्ल हार्बरवर जपाननें बॉम्बफेक केली आणि मग अमेरिका दुसऱ्या महायुद्धांत उतरली. जॅकी सैन्यांत शिरला. त्याला कान्सासमधील फोर्ट रिले येथें पाठविण्यांत आलें. तेथें जो लुईहि होता व मग ते दोघे मित्र बनले. त्याला घोडदळांत सामील करण्यांत आलें होतें. जॅकी घोड्यांना लस टोचण्यांत वेळ घालवी. जेव्हां त्याचें प्राथमिक शिक्षण संपलें, तेव्हां अधिकाऱ्यांच्या विद्यालयांत प्रवेश मिळावा म्हणून त्यानें अर्ज केला. १९४३ मध्यें त्याला सेकंड लेफ्टनंट म्हणून नेमण्यांत आलें व टेक्सासमध्यें कॅम्प हूड येथील ७६१ व्या टँकदळांत त्याला धाडण्यांत आलें. आपल्या हाताखालील लोकांना उत्तम शिक्षण दिल्याबद्दल रॉबिन्सनची थोड्याच महिन्यांत त्याच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं प्रशंसा केली. पण फूटबॉलमुळें त्याच्या घोट्याला पूर्वीं जी जखम झाली होती, ती पुन्हां त्रास देऊं लागली व मग ३१ महिन्यांची सैन्यांतील नोकरी संपुष्टांत आली. जॅकीला सन्मानपूर्वक सैन्यांतून रजा देण्यांत आली.

पॅसाडेना येथें ज्या चर्चमध्यें त्याची आई जात असे, तेथील धर्मोपदेशक टेक्सासमधील ऑस्टिन येथें चाललेल्या सॅम्युअल हौस्टन या निग्रो कॉलेजचा अध्यक्ष झाला होता. म्हणून जॅकी जेव्हां सैन्यांतील नोकरी संपवून घरीं

आला, तेव्हां या कॉलेजच्या क्रीडा विभागाचा प्रमुख म्हणून काम करण्याची विनंति करणारें पत्र त्याच्या हातीं पडलें. तरुणांच्या बरोबर काम करणें त्याला मनापासून आवडत असल्यामुळें त्यानें हें काम पत्करलें. पण तेथें त्याचें वास्तव्य फार काळ झालें नाहीं. याचें एक कारण म्हणजे थोडा पगार. दुसरें कारण म्हणजे बर्टनकाकाचा वाढलेला आजार हें होय. आजार वाढल्यावर बर्टनकाका अंथरुणाला खिळला होता आणि त्यामुळें जॅकीच्या आईला कामासाठीं बाहेर जाणेंहि कठीण झालें होतें. याच वेळेला कान्सास सिटी मोनाकर्स या निग्रो बेसबॉल पथकांत खेळण्याबद्दल त्याला महिना ४०० डॉलर्स देऊं करण्यांत आले, तेव्हां ही नोकरी त्यानें पत्करली; आणि मग तो या पथकाबरोबर दक्षिण-उत्तर प्रवास करूं लागला. त्याला वाईट हॉटेलांत रहावें लागे; निग्रोंसाठीं वेगळ्या जेवणाची व्यवस्था असे ती पत्करावी लागे; दूर दूर धूळ खात बस-प्रवास करावा लागत असे आणि कांहीं वेळां आठवड्यांत थोडीहि विश्रांति न घेतां सहा-सात सामन्यांत भाग घ्यावा लागे. पण घरीं पैसे पाठविणें आणि विवाहासाठीं पैसे सांठविणें या दोन्ही गोष्टी जमत होत्या. अखेरीस १९४६ मध्यें जॅकी व त्याला कॉलेजांत भेटलेली रॅचेल इसम या दोघांचा विवाह झाला.

शिकागो येथें एकदां एक सामना झाल्यानंतर ब्रुक्लीन डॉजर्स बेसबॉल संघाच्या क्लाइड सक्फोर्थ यानें जॅकीला, न्यूयॉर्कला जाऊन डॉजर्स बेसबॉल संघाचा अध्यक्ष ब्रांच रिकी यास भेटण्याची सूचना केली; तेव्हां जॅकी त्याच्याशीं जरा उद्धटपणेंच वागला. सक्फोर्थच्या सूचनेमुळें जॅकी हंसला कीं रागावला, हें कांहीं माहीत नाहीं. मोठमोठ्या संघांत खेळण्याची संधि मिळेल, अशी आशा लावलेली जॅकीला इतर निग्रोंप्रमाणेंच आवडत नसे. अमेरिकेंतील गोऱ्यांचा खेळ हाच खरा अमेरिकेचा प्रतिष्ठित खेळ हा निग्रोंचा समज झालेला आहे. कारण मोठमोठ्या संघांत त्यांना मज्जाव आहे. सॅचेल पेज व जोश गिब्सन यांसारख्या नामवंत निग्रो खेळाडूंना-सुद्धां मोठमोठ्या संघांत कधीं प्रवेश मिळाला नाहीं; त्यांना निग्रोंबरोबरच खेळावें लागलें. म्हणून ब्रुक्लीन डॉजर्स संघाच्या प्रमुखाबरोबर वाटाघाटी करण्यासाठीं गाडी पकडण्याची सूचना सक्फोर्थनें केली, तेव्हां तो थट्टा वगैरे करतो कीं काय, असें जॅकीला वाटलें. अखेरीस आपण चेष्टा करीत नाहीं,

पहिल्यापासून जॅकीचा खेळ पाहूनच अशी सूचना करीत असल्याचें सक्फोर्थनें त्यास पटविलें. जॅकीचा खांदा दुखावला होताच; तेव्हां तो रजा घेऊं शकला. रजा घेऊन तो ब्रुक्लीनला गेला. त्यानंतर जें घडलें तो इतिहास सर्वश्रुतच आहे.

अमेरिकेंतील वंशसंबंधांत दुसऱ्या महायुद्धानें अनेक बदल घडवून आणले. ए. फिलिप रॅन्डॉल्फ वॉशिंग्टनवर मोर्चा नेणार होता व म्हणून सर्व युद्धसाहित्य उत्पादन करणाऱ्या कारखान्यांत कुशल निग्रो कामगारांना प्रवेश देण्याचा हुकूम सरकारनें काढला होता. काळ्या लोकांच्या प्रगतीसाठीं स्थापन झालेल्या राष्ट्रीय संघटनेंत निग्रो व गोऱ्या उदारमतवादी प्रवृत्तीच्या लोकांचा प्रभाव पडूं लागला होता व त्यामुळें नौदल, हवाईदल व सैन्याच्या इतर शाखांत जेथें पूर्वी निग्रोंना बंदी होती, तेथें त्यांना आतां प्रवेश मिळूं लागला होता. भारतापासून संयुक्त राष्ट्रांपर्यंत जगांत सर्वत्र काळ्या लोकांना समानतेची वागणूक मिळवून देण्याची एक लाटच उसळली होती. मतदान, निवासस्थानें, शिक्षण व बेसबॉलसारखे खेळ यांतून वंशभेदाचें उच्चाटन व्हावें म्हणून अमेरिकेंतील निग्रो मागणी करूं लागले होते व सरकारमधील व सरकारबाहेरील उदारमतवादी अमेरिकनांच्या सद्भावना त्यांच्या पाठीशीं उभ्या होत्या. मोठमोठ्या संघांत निग्रोंना प्रवेश देण्याची वेळ हीच होती. शिवाय युद्धानें या मोठ्या संघांचे चांगले खेळाडू हिरावून नेले होते; आणि त्यांना चांगल्या खेळाडूंची गरज होती. या तरुण निग्रो खेळाडूंत जॅकी हा चांगला बेसबॉल खेळाडू होता. त्याचें कॉलेजचें शिक्षण झालें होतें व तो सभ्य गृहस्थ होता ब्रुक्लीन डॉजर्स या मोठ्या संघाची मॉन्ट्रियल रॉयल्स ही एक शाखा होती. तींत जॅकी रॉबिन्सनला सामील करून घेण्याची सर्व व्यवस्था ब्रांच रिकी यानें केली होती.

या संघांत सामील झाल्यावर पहिल्याच हंगामांत मॉन्ट्रियल येथें जॅकी फारच चांगला खेळला. न्यूयॉर्क बेअर्स संघाविरुद्ध झालेल्या सामन्यांत त्यानें असेच विक्रम केले. या हंगामाच्या अखेरीस लुइस्व्हिल कर्नल्सच्या विरुद्ध मॉन्ट्रियलनें सामना जिंकला. यांत जॅकीचें बॅटिंगचें व क्षेत्ररक्षणाचें सर्वसाधारण प्रमाण ३४९ व ९८५ असें पडून तें सर्वांत अधिक भरलें.

१९४ डावांत १५१ फटके व ११३ धांवा त्यानें केल्या. अशा प्रकारें उच्चांक स्थापन केला असतांहि डॉजर्समध्यें त्याला घेण्यास बेसबॉल संघांतील व संघाबाहेरील लोकांचा विरोध होता. खेळाडू व प्रेक्षक हे दोघेहि जॅकीचा अंतर्भाव करण्यास विरोध करतील आणि सेंट लुईसारख्या ठिकाणीं जॅकी खेळत आहे असें पाहून निग्रो व गोरे यांच्यांत मारामारी होईल, अशी भीति कांहींनीं व्यक्त केली. एका मोठ्या सामन्यांत खेळण्यासाठीं पहिल्याच निग्रोला घेण्यापूर्वीं ब्रांच रिकीला या सर्व गोष्टींचा विचार करावा लागला. पण १० एप्रिल १९४७ रोजीं डॉजर्समध्यें रॉबिन्सनला रिकीनें दाखल करून घेतलें व हंगामाला ५ हजार डॉलर्स एवढा पगार देण्याचें ठरलें.

जॅकी खेळला पण वांशिक दंगे झाले नाहींत. प्रत्येक ठिकाणीं प्रेक्षकांची संख्या वाढलेलीच होती व त्यामुळें मिळकतहि वाढली. जॅकीचा खेळ अप्रतिम होत होता. त्याची टिंगल झाली, वंशावरून कांहीं टीका झाली व वाईट वर्तणूक कोणीं केली तर उत्कृष्ट खेळून या सर्वांस तोंड देण्याची सूचना रिकीनें रॉबिन्सनला केली होती. बऱ्याच प्रेक्षकांनीं व त्याच्या आणि प्रतिस्पर्धी संघांतील बऱ्याच खेळाडूंनीं जॅकीला चांगलें वागविलें. तरी पहिल्या दोन हंगामांत कोणी कोणी नीट वागत नसत. कोणी त्याची थट्टा करण्यासाठीं मैदानावर काळें मांजर सोडीत. पण रॉबिन्सननें आपलें डोकें शांत ठेवलें व तो चांगला खेळत राहिला. नॅशनल लीगचा एक आधारस्तंभ असा लौकिक त्यानें मिळवला व १९४९ मध्यें तो याच संघाचा चॅंपियन बनला. तो संघांत दाखल झाल्यानंतर पहिल्याच हंगामांत डॉजर्सला विजय प्राप्त झाला; व जॅकीला ' रुकी ऑफ दि इयर ' असें संबोधण्यांत येऊं लागलें. कांहीं काळ अमेरिकेंतील इतर कोणत्याहि खेळाडूंपेक्षां जॅकी-संबंधींच बराच मजकूर अमेरिकन वृत्तपत्रांत येत होता. जो लुई मुष्टियुद्धांत व जॅकी रॉबिन्सन बेसबॉलमध्यें आघाडीवर राहूं लागले. युद्धोत्तर काळांत तरुण निग्रोंनीं किती प्रगति केली, याचींच हीं प्रतीकें आहेत.

डॉजर्समुळें मोठमोठ्या सामन्यांत व लाखों प्रेक्षकांपुढें खेळण्याची संधि त्याला मिळाली. एकदां वंशभेदाचा हा अडसर कोसळून पडल्यानंतर इतर संघहि डॉजर्सप्रमाणें निग्रो खेळाडूंना प्रवेश देऊं लागले. थोड्याच

दिवसांनंतर डॉन न्यूकोंब, रॉय कॅम्पानेला व डॅन बॅंकहेड या निग्रो खेळाडूंना डॉजर्स संघानें समाविष्ट करून घेतलें. आणि अशा प्रकारें सर्वश्रेष्ठ अमेरिकन खेळ हा खरोखरीचा अमेरिकन खेळ बनला. एबेट्स् फील्डवर जॅकी रॉबिन्सन जेव्हां प्रथम खेळवयास गेला, तेव्हां त्यानें लोकशाहीची उज्ज्वल ज्योतच पेटाविली, असें म्हटलें पाहिजे.

RFFBK-0009498